



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १२ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# बांधकामासाठी जमिनीच्या 'एन.ए.'ची गरज नाही

## ■ जमीन महसूल कायद्यात महत्त्वाची सुधारणा ■ बांधकाम आराखडा हीच परवानगी

**मुंबई/प्रतिनिधी :**शेतीच्या जमिनीवर घर किंवा अन्य बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडून अकृषिक (NA) परवानगी घेण्याची अट रद्द करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. यापुढे बांधकाम आराखडा मंजूर झाल्यानंतर जिल्हाधिका-यांकडून स्वतंत्र 'एनए' परवानगी घेण्याची गरज लागणार नाही. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत महत्त्वाची सुधारणा करणारा शासननिर्णय आणि राजपत्र जारी करण्यात आले आहे. जमीन महसूल संहितेतील नवीन सुधारणेनुसार शेतजमिनीवर बांधकामासाठी नगर रचना विभाग तसेच स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी किंवा मंजुरी हीच आता 'एनए' परवानगी असणार आहे.



आतापर्यंत नागरिकांना नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम नकाशाला मंजुरी घेतल्यानंतर पुन्हा जिल्हाधिका-यांकडे अकृषक परवानगीसाठी चकरा माराव्या लागत होत्या. नव्या नियमानुसार, जर एखाद्या जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल, तर नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच अकृषक परवानगी मानली जाईल. यासाठी जिल्हाधिका-यांच्या स्वतंत्र परवानगीची किंवा सनदेची गरज राहणार नाही.

**बँकांनाही सूचना-**अनेक बँका कर्ज देताना एनए परवानगीचा आग्रह धरतात. मात्र नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यावर बँकांनी एन परवानगीचा आग्रह धरू नये. जिल्हाधिका-यांनी हे आदेश सर्व बँकांच्या निदर्शनास आणून द्यावेत, असेही निर्देश शासनाने दिले आहेत.

बिनशेती झालेल्या मिळकतींवर दरवर्षी आकारला जाणारा अकृषिक कर आकारण्यात येवू नये. सदर सुधारणेच्या दिनांकापर्यंत दरवर्षी आकारला जाणारा थकीत अकृषिक

*दरवर्षी भरावा लागणारा अकृषक कर रद्द करून त्याऐवजी जमिनीच्या बाजारमूल्यानुसार टप्पा निहाय एकरकमी रुपांतरण अधिमूल्य (कन्व्हर्जन प्रीमीयम) आकारले जाईल. त्याचे दर खालीलप्रमाणे;*

**भूखंडाचे क्षेत्रफळ एकरकमी अधिमूल्य दर**

- १००० चौ.मी. पर्यंत - चालू बाजार मूल्याच्या ०.१० टक्के
- १००१ ते ४००० चौ.मी. - चालू बाजार मूल्याच्या ०.२५ टक्के
- ४००० चौ.मी. पेक्षा जास्त - चालू बाजार मूल्याच्या ०.५० टक्के

कराच्या वसुलीतून सूट देण्यात आली आहे. ज्या मिळकती दिनांक ३१ डिसेंबर २००१ रोजी किंवा त्यापूर्वी बिनशेती झाल्या, त्या मिळकतींवर दरवर्षी आकारल्या जाणा-या अकृषिक कराऐवजी, २००१ च्या चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४७ मध्ये नमूद टप्प्यांनुसार व दराने अधिमूल्याची रक्कम शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून एक वर्षाच्या आत भरणे संबंधित मिळकतधारक यांना अनिवार्य राहणार आहे. त्यानंतर सदर रक्कम दंड आणि व्याजासह वसूल करण्यात यावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

**७/१२ मध्ये नोंद होणार (७/१२ Online NA Entry)**

संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून जमिनीवर विकास/बांधकाम परवानगी दिल्यानंतर इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणाली (MBPS) किंवा विकास नियंत्रण नियमावलीत (Auto DCR) तसेच डिजिटल ७/१२ मध्ये अकृषिक नोंद करण्यात येणार आहे. ज्याठिकाणी ऑनलाइन संगणकीय प्रणाली नसेल त्या ठिकाणी तेथील तहसीलदारांनी ही नोंद करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. केवळ बांधकाम परवानगी मिळाली म्हणून भोगवटादार वर्ग-२ (कमी श्रमाच्या जमिनी) च्या दर्जा मध्ये बदल होणार नाही; त्यांच्यासाठी आवश्यक असलेले नजराणा शुल्क भरावेच लागेल.

नवीन सुधारणेमुळे सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मी हा निर्णय घेतला. यासाठी आवश्यक त्या सर्व सुधारणा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत करण्यात आल्या. हिवाळी अधिवेशनातच याबाबतची रूपरेषा ठरली होती. फडणवीस सरकार जनतेच्या कल्याणासाठी काम करते, याचे प्रत्यंतर देणारा हा निर्णय आहे. आता वार्षिक अकृषक कर देखील रद्द करण्यात आला आहे. असे चंद्रशेखर बावनकुळे, म्हणाले.

## राहुल गांधींनी मोदींसह अनिल अंबानींचा उल्लेख करीत सरकारला घेरले

# 'एपस्टीन'वरून लोकसभेत गदारोळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**लोकसभेमध्ये आज केंद्रीय अर्थसंकल्पावर झालेल्या चर्चेवेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी घणाघाती भाषण करत केंद्र सरकारची चौफेर कोंडी केली. यावेळी राहुल गांधी यांनी जगभरात गाजत असलेल्या एपस्टीन फाईल्सचा मुद्दाही लोकसभेत उपस्थित केला. तसेच एपस्टीन फाईल्समध्ये नाव आले असल्याचा दावा करण्यात येत असलेले उद्योगपती अनिल अंबानी आणि केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांचे नाव घेत सरकारवर प्रश्नांची बरसात केली.



यावेळी राहुल गांधी म्हणाले की, अनिल अंबानी नावाचे एक उद्योगपती आहेत. माझा प्रश्न आहे की ते अद्याप तुरुंगात का गेलेले नाहीत. याचे कारण आहे हे म्हणजे एपस्टाईन फाईल्स. त्याबरोबरच मला केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांनाही विचारायचे आहे की, त्यांची एपस्टाईनशी ओळख कुणी करून दिली. हरदीप सिंग पुरी यांची एपस्टाईन याच्याशी ओळख कुणी करून दिली याची माहिती माझ्याकडे आहे आणि ते पुरी यांनाही माहिती आहे, असा दावाही राहुल गांधी यांनी केला. दरम्यान, राहुल गांधी यांच्या या आरोपांना सत्ताधारी बाकावरील सदस्यांनी तीव्र आक्षेप घेतला. दरम्यान, एपस्टाईन फाईलवरून राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले की, मला पंतप्रधानांच्या डोळ्यांत भीती दिसत आहे. त्याची दोन कारणे आहेत. त्यातील एक कारण म्हणजे एपस्टाईन. राहुल गांधी यांनी केलेल्या या उल्लेखानंतर पीठासीन अधिका-यांनी त्यांना ताकिद दिली. मात्र राहुल गांधी थांबले नाहीत. ते पुढे म्हणाले की, केंद्राच्या संरक्षण क्षेत्रासाठीच्या अर्थसंकल्पावर कुणाचे तरी नियंत्रण दिसत आहे आणि ते आहेत मिस्टर अदानी. अदानी एक सर्वसामान्य उद्योगपती नाहीत. तसेच त्यांची कंपनीही सर्वसामान्य नाही. त्यांच्या कंपनीवर अमेरिकेमध्ये एक खटला दाखल झालेला आहे. तसेच त्यांचे लक्ष्य अदानी नव्हे तर पंतप्रधान आहेत. ही कंपनी भाजपचा आर्थिक आधार आहे, असा आरोपही राहुल गांधी यांनी केला.

# वांगचुक यांची सुटका अशक्य

## केंद्राचा सुप्रीम कोर्टात स्पष्ट नकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**लडाखचे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या सुटकेबाबत केंद्र सरकारने आपली भूमिका सुप्रीम कोर्टात स्पष्ट केली आहे.



वांगचुक यांची तब्येत उत्तम असून केवळ प्रकृतीचे कारण देउन त्यांची सुटका करणे शक्य नाही असे केंद्र सरकारने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले. वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली यांनी त्यांच्या अटकेला आव्हान देणारी याचिका दाखल केली असून त्यावर आज महत्त्वपूर्ण सुनावणी झाली.केंद्र सरकारच्या वतीने सालिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयात बाजू मांडली. ते म्हणाले, सोनम वांगचुक यांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणी केली जात आहे. आतापर्यंत एकूण २४ वेळा त्यांची डाक्टरांनी तपासणी केली असून ते पूर्णपणे तंदुरुस्त आहेत. त्यांना केवळ पचनाचा थोडा त्रास होता, ज्यावर योग्य उपचार सुरू आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता करण्याचे कोणतेही कारण नाही. यापूर्वी सोमवारी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने वांगचुक यांचे वाढते वय आणि आरोग्य लक्षात घेता त्यांच्या अटकेबाबत फेरविचार करावा, असा सल्ला सरकारला दिला होता. मात्र, सरकारने त्यावर विचार करून आज स्पष्ट केले की, राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव त्यांची सुटका करणे सध्या शक्य नाही. वांगचुक सध्या जोधपूर मध्यवर्ती कारागृहात असून त्यांना एम्स जोधपूरच्या डाक्टरांकडून सर्वोत्तम उपचार मिळत असल्याचा दावाही केंद्राने केला.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजीत पवार यांनी घेतली मोदी, शाह यांची भेट



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला, या अपघातामध्ये त्यांचं निधन झालं, दरम्यान अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, त्यानंतर त्यांनी मंगळवारी उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारला. उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारल्यानंतर आज सुनेत्रा पवार या दिल्ली दौ-यावर आहेत. त्यांनी दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. सुनेत्रा पवार यांच्यासोबत राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे, प्रफुल पटेल, जय पवार आणि पार्थ पवार हे सुद्धा दिल्ली दौ-यावर आहेत. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारल्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत ४० मिनिटं चर्चा केली, तर अमित शाह यांच्यासोबत अर्धातास चर्चा केली. सुनेत्रा पवार यांनी संसदेतील पंतप्रधान कार्यालयात मोदींची भेट घेतली आहे. एनडीएचा घटक पक्ष म्हणून आम्ही कायम एनसीपी सोबत आहोत अशी ग्वाही यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अजित पवार यांच्या निधनावर शोक देखील व्यक्त केला आहे.

महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट झाली. आपल्या सर्वांचे प्रिय असलेले अजित पवार यांच्या अचानक जाण्याने महाराष्ट्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अजित पवार यांच्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरुन काढणं सोपं नाहीये, मात्र लोकांचं कल्याण आणि राज्याचा विकास हे आपल्या सर्वांचं कर्तव्य आहे, त्यामध्ये सुनेत्रा पवार यांचा संकल्प महत्त्वाचा असेल असं अमित शाह यांनी म्हटलं आहे.

# आम्ही एनडीएमध्ये आहोत आणि राहणार -सुनील तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सांभाळली आहे. काल पदभार स्वीकारल्यानंतर आज सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दरम्यान राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी या भेटीबद्दल, तसेच दोन्ही राष्ट्रवादी गटाच्या विलीनीकरणाबाबत महत्त्वाचे भाष्य केले आहे. आज राजकीय चर्चेचा विषय नव्हताच, आज फक्त दादांच्या दुर्दैवी अकाली निधनानंतर जी जबाबदारी धिरोदत्तपणे वहिनींनी सांभाळली आहे, त्याबद्दलच्याच संवेदना व्यक्त करण्यात आल्या असे सुनील तटकरे म्हणाले.



विलीनीकरणाबाबत तुमच्या पक्षाची भूमिका का असणार आहे? असा प्रश्न तटकरे यांना विचारण्यात आला होता. यावर बोलताना तटकरे यांनी आमच्या पक्षाच्या भूमिकेचा प्रश्न येतोच कुठे? असे उत्तर दिले. पुढे बोलताना तटकरे म्हणाले की, आम्ही एनडीएमध्ये आहोत. दादा असतानाच मी वारंवार भूमिका स्पष्ट केली की, आम्ही दादांच्या नेतृत्वाखाली सामूहिकरित्या एनडीए सोबत जाण्याचा निर्णय घेतला. तो कालही होता, आजही आहे आणि उद्या भविष्यामध्येही राहिल. त्यामुळे एनडीएमध्ये येण्याबाबतची स्पष्टता कोणीतरी करणे आवश्यक आहे, असे तटकरे म्हणाले.

# अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण करू नका!-मुख्यमंत्र्यांचा सल्ला

## कोणाकडे पुरावे असतील तर त्यांनी तपास यंत्रणांकडे द्यावेत

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत तर्कवितर्क न लढवता, सखोल चौकशी पूर्ण होउ द्यावी. कोणीही या दुर्दैवी घटनेचे राजकारण करू नये, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी व्यक्त केले. या अपघाताबाबत कोणाकडे काही पुरावे किंवा मुद्दे असतील, तर त्यांनी ते संबंधित तपास यंत्रणांकडे सादर करावेत, असेही त्यांनी नमूद केले.



मुंबई महापालिका मुख्यालयाबाहेर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केलेल्या संशयावर मुख्यमंत्र्यांनी भाष्य केले. ते म्हणाले, रोहित पवार यांनी काय वक्तव्य केले, हे मी थेट ऐकले नसले तरी त्यांनी काही प्रेझेंटेशन केले असल्याची माहिती आहे. विविध माध्यमे व नागरिकांनी उपस्थित केलेल्या शंकाच त्यांनी मांडल्या असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

अजित पवार हे महाराष्ट्राचे लाडके व वरिष्ठ नेतृत्व होते. त्यामुळे त्यांच्या अपघाताची पूर्ण, सखोल व निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, ही मागणी रास्त असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मीच सर्वप्रथम केंद्र सरकारला पत्र लिहून योग्य चौकशीची मागणी केली होती. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्र्यांनी विशेष चौकशी समिती स्थापन केल्याचे पत्रही पाठवले असून सध्या तपास सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

चौकशी पूर्ण होण्यापूर्वी तर्कवितर्क मांडल्यास लोकांमध्ये संभ्रम निर्माण होउ शकतो, असे सांगत त्यांनी भारतीय तपास यंत्रणांवर अविश्वास दाखवू नये, असे आवाहन केले. देशातील डीजी एव्हिएशन सेफ्टी हे सर्वोच्च कार्यालय असून आतापर्यंतच्या सर्व विमान अपघातांची चौकशी त्यांनीच केली आहे. याशिवाय सीआयडीचा समांतर तपास सुरू असून डीजीसीएचीही चौकशी सुरू आहे. अपघातग्रस्त विमानातील ब्लॅकबाक्स सापडला आहे. शिवाय (पान २ वर)

# मुंबई महापालिकेत पहिल्याच दिवशी भाजप-ठाकरे आमने-सामने

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेत भाजप-एकनाथ शिंदे शिवसेना युतीने महापौर-उपमहापौरपदाचा पदभार स्वीकारला. या वेळी भाजप-शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नगरसेवक आमने-सामने आल्याने गोंधळ उडाला. भाजप नगरसेवकांनी मोदी-मोदीच्या घोषणा देताच, ठाकरे सेनेच्या नगरसेवकांनी चोर है चोर हैच्या घोषणा दिल्या. पुढे देवाभाउ-देवाभाउ नावाच्या घोषणा सुरू होताच, ठाकरे सेनेच्या नगरसेवकांनी ठाकरे-ठाकरे, अशी जोरदार घोषणाबाजी केली. या घोषणाबाजीने मुंबई महापालिकेच्या सभागृहातील वातावरण चांगलेच तापले होते.मुंबई महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच पालिकेची सत्ता भाजपने हस्तगत केली. भाजपचा महापौर आज विराजमान झाला. रितू तावडे यांनी पदभार स्वीकारला. मुंबई महापालिकेतील



प्रशासक राजवट संपुष्टात आली. मात्र, सत्तारोहणाच्या पहिल्याच दिवशी भाजप आणि ठाकरे सेनेच्या नगरसेवकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.मुंबई पालिका सभागृहात महायुतीचे नगरसेवक आल्यानंतर जोरदार शंखनाद करण्यात आला. भाजपच्या महापौरांच्या सत्तारोहणाच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यामुळे भाजपच्या नगरसेवकांच्या अंगात प्रचंड उत्साह होता. यातून भाजपच्या नगरसेवकांनी जय श्रीराम आणि मोदी-मोदीच्या घोषणा देण्यास सुरुवात केली. भाजपच्या नगरसेवकांकडून मोदी-मोदीचा जयघोष थांबतच नव्हता. तेव्हा समोर उभ्या असलेल्या ठाकरे सेनेच्या नगरसेवकांनी भाजपच्या मोदी-मोदी पाठोपाठ अचानक चोर है, चोर है, अशा घोषणा सुरू केल्या. ठाकरेसेनेच्या या नगरसेवकांच्या आक्रमकतेपुढे भाजप नगरसेवकांनी मोदी-मोदीच्या घोषणा थांबवल्या. मोदी-मोदीच्या घोषणा थांबवल्यानंतर भाजपच्या नगरसेवकांनी देवाभाउ-देवाभाउ नावाने घोषणा सुरू केल्या. ठाकरे सेनेच्या नगरसेवकांनी चोर है, चोर है घोषणा लगेच थांबवून, ठाकरे-ठाकरे नावाचा जयघोष सुरू केला. दोन्ही बाजूंच्या घोषणांमुळे पालिकेचे सभागृह दणाणून गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम महापालिकेतील सभागृहाच्या गॅलरीत बसून हा सर्व प्रकार शांतपणे पाहत होते. पहिल्याच दिवशी ठाकरे सेना आणि भाजप नगरसेवक आमने-सामने आल्याने, खडाजंगी झाल्याने, आगामी काळातही मुंबईतील राजकारण, महापालिकेभोवती फिरत राहणार अशी चिन्हं आहेत.

# रितू तावडे यांनी स्वीकारला महापौरपदाचा पदभार

**मुंबई/प्रतिनिधी-** संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या मुंबईला आज अखेर महापौर मिळाला आहे. भाजपच्या रितू तावडे यांनी महापौरपदाची आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या संजय घाडी यांनी उपमहापौरपदाची सूत्रे हाती घेतली आहे. महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत विरोधात कोणताही उमेदवार नसल्याने रितू तावडे आणि संजय घाडी यांची बिनविरोध निवड झाली होती. आज त्यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या हातून पदभार स्वीकारला. त्यामुळे मुंबईतील प्रशासक राज संपुष्टात आले असून आता मुंबईत मेयर राज सुरू झाले आहे.



# व्यापारी करारातून डाळी वगळल्या

**नवी दिल्ली :** भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा केल्यानंतर गेल्या आठवड्यात त्यासंदर्भातील एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली होती. त्यानंतर अमेरिकेने जारी केलेल्या तथ्यपत्रकातही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सुधारणा भारतासाठी दिलासादायक मानल्या जात आहेत. यातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे या कराराअंतर्गत भारताने ५०० अब्ज डॉलर्स किमतीच्या अमेरिकन वस्तू खरेदी करण्याची अट आता बदलण्यात आली आहे. (पान २ वर)

# दावोसमधील ७५ टक्के करारांचे उद्योगात रूपांतर-मुख्यमंत्री

## ● महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक ● विद्यार्थ्यांसाठी वर्तमानपत्र वाचनाचा उपक्रम सुरू करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील सर्वात जास्त थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होत असते. मात्र आता ही गुंतवणूक देशात जास्तच नाही, तर रेकार्ड मोडणारी ठरत आहे. आर्थिक व्यवस्थेला उत्सवाचे स्वरूप दिल्यामुळेच उद्योगस्नेही वातावरण राज्यात तयार झाले आहे. यामुळेच महाराष्ट्रात 'रेकार्ड तोड' गुंतवणूक होत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

एका मराठी वृत्तपत्राच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, स्वित्झर्लंड मधील दावोस येथे जागतिक अर्थ परिषदेत ३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच १२ लाख कोटींचे करार अंतिम करण्यात आले आहे. या जागतिक परिषदेत परकीय गुंतवणूक असेल तेच करार करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यामुळे प्रत्येक करारातून राज्यात थेट परकीय गुंतवणूक येणार आहे. दावोस येथे महाराष्ट्राच्या दालनाला गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तेथे १० राज्यांपैकी महाराष्ट्राचाच बोलबाला होता. या परिषदेत झालेल्या करारांचे प्रत्यक्षात उद्योगात रूपांतर होण्याचे राज्याचे प्रमाण ७५ टक्के आहे.

राज्यात 'इज ऑफ डूइंग बिझनेस' करण्यासाठी 'हंड्रेड रिफार्म्स इन टू मंथ' असा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध १०० सुधारणांनी उद्योगस्नेही वातावरण गुंतवणूकदारांना अधिकाधिक आकर्षित करणार आहे. तसेच मैत्री पोर्टलच्या माध्यमातून उद्योगांसाठी सिंगल विंडो सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्यात येत आहे. राज्याच्या सर्व दूर भागात गुंतवणूक होत आहे. गडचिरोली 'स्टील सिटी ऑफ इंडिया' म्हणून समोर येत आहे. ऑटोमोबाईल उद्योगांमध्ये नागपूर नाव ठळकपणे पुढे आले आहे. महिंद्रा कंपनीने १५ हजार कोटींची गुंतवणूक नागपूर येथे केली आहे. या ठिकाणी भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा ऑटोमोबाईल प्रकल्प महिंद्रा कंपनी उभारत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



देशात विजेवर चालणा-या वाहनांच्या निर्मितीची सर्वात मोठी क्षमता छत्रपती संभाजीनगरमध्ये तयार होत आहे. पुढील पिढीची विद्युत वाहने संभाजीनगरमध्ये उत्पादित केल्या जाणार आहे. दावोसमध्ये उत्तर महाराष्ट्रातील पाचही जिल्ह्यात गुंतवणूक आली आहे. धुळे जिल्ह्यातील नरडाणा औद्योगिक वसाहत भविष्यातील उद्योगांचे मॅग्नेट ठरणार आहे. नंदुरबारसारख्या मागासलेल्या जिल्ह्यात उद्योग येत आहेत. केवळ औद्योगिकीकरणावर शासनाचा भर नाही तर त्यामुळे एक चांगली परिसंस्था निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. राज्यात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक वर्तमानपत्र वाचले पाहिजे. याकरिता वर्तमानपत्र वाचनावर आधारित उपक्रम सुरू करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, १ मे २०२६ पर्यंत आपले सरकार पोर्टलचा टप्पा दोन कार्यान्वित करण्यात येणार आहे. राज्यात सध्या १ हजार सेवा ऑनलाइन स्वरूपात देण्यात येत आहेत. मात्र यापैकी २९ सेवा या ९९ टक्के नागरिकांना लागत असतात. या २९ सेवा सुलभ, जबाबदारीने आणि गतिशीलपणे नागरिकांना दिल्या तर नागरिकांना शासनाकडे येण्याचे काम पडणार नाही त्यांचे समाधान होउ शकेल. ई- गव्हर्नन्स मुळे शासकीय सेवेमध्ये निश्चितच गतिशीलता आली आहे. अधिक गतिशीलता आणण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचापण उपयोग केल्या जाणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकसत्ता वर्षवेध २०२५ विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला वरिष्ठ सनदी अधिकारी, मराठी चित्रपट सृष्टीतील मान्यवर उपस्थित होते.



# पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी

## प्रकाश पोहरे, विलास बडे यांच्यासह ५ पत्रकारांचा होणार सन्मान

**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित असलेल्या अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने भव्य पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १४ फेब्रुवारी २०२६ शनिवार रोजी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व.सोमेश्वर पुसदकर ऑडिटोरियम येथे सायंकाळी ४.३० वाजता हा सोहळा पार पडणार आहे. राज्य, विभागीय तसेच जिल्हास्तरावरील विविध पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार असून या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती लोकसभा खासदार बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्यासह अतिथी







म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, सकाळचे समुह संपादक राहुल गडपाले यांची देखील उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमातून स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या नावाने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार ३० वर्षांची प्रदीर्घ पत्रकारिता सेवा तसेच राजकीय, पर्यावरण आणि शेतकऱ्यांच्या विषयावर लिखाण करण्यासाठी राज्यभर ख्याती असलेले दै.देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांना दिला जाणार आहे. ४१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. तसेच स्व.जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार यावर्षी ३० वर्षांची पत्रकारिता सेवा आणि बातमीकडे पाहण्याचा सखोल दृष्टीकोण, अभ्यासू आणि अचूक विश्लेषण, प्रसंगावधान असलेले आयबीएन १८ चे वृत्त निवेदक विलास बडे यांना दिला जाणार आहे. ३१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच विभागीय पत्रकारिता पुरस्कार यवतमाळ जिल्ह्यात नमो महाराष्ट्र या दैनिकाचे संपादक असलेले आणि ३० वर्षांचा पत्रकारिता क्षेत्राचा अनुभव असलेले वसंतराव घुईखेडकर यांना दिला जाणार आहे. दै.सकाळचे समुह संपादक राहुल गडपाले पुरस्कृत हा पुरस्कार २१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ अशा स्वरूपाचा आहे.

अमरावती जिल्हा आणि ग्रामीण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना देखील जिल्हास्तरीय पुरस्कार संघटनेच्या वतीने दिले जातात. यामध्ये जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार दै. प्रतिदिन अखबारचे वृत्त संपादक प्रवीण आहुजा यांना त्यांच्या ३० वर्षांच्या प्रदीर्घ पत्रकारितेच्या सेवेसाठी दिला जाणार आहे. दै. विदर्भ मतदार पुरस्कृत या पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रूपये रोख सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे असणार आहे. तसेच जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कार दै.आपली मातृभूमीचे वरूड तालुका प्रतिनिधी असलेले चंद्रकांत भड यांना वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, शोषित समाजाचे प्रश्न या विषयावरील सातत्यपूर्ण लिखाणासाठी दिला जाणार असून पी.आर.पोटे एज्युकेशनल गृप ऑफ अमरावती यांच्याकडून पुरस्कृत असलेला हा पुरस्कार देखील ११ हजार रूपये रोख सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ अशा स्वरूपाचा असणार आहे.

### -अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे आयोजन

या पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्याला अमरावती जिल्ह्यातील शहर तसेच ग्रामीण क्षेत्रात कार्य करणारे समस्त पत्रकार बांधव, राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे मान्यवर, नागरिक बंधू आणि भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अमरावती जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शाहनुर गावात आढळला अर्धवट जळालेला मृतदेह

**पथ्रोट/प्रतिनिधीः-** शाहनुर गावाजवळ एक अर्धवट जळालेला मृतदेह आढळल्याने आज बुधवार ११ फेब्रुवारीला सकाळी एकच खळबळ उडाली. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहे. मृतकाची ओळख सध्यातरी पटलेली नाही.पोलीस तपास करत आहे.



माहितीनुसार शहानुर बांधाकडून खोडगाव कडे जाणाऱ्या कॅनल जवळ बुधवारी सकाळी तिथून जात असलेल्या नागरिकांना एक अर्धवट जळालेला मृतदेह दिसला. याची माहिती त्यांनी तात्काळ पोलिसांना दिली. माहिती मिळताच पथ्रोट पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसराचा पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला. फॉरेन्सिक पथकालाही घटनास्थळी बोलविण्यात आले होते. अजून पर्यंत हा मृतदेह नेमका कोणाचा आहे हे स्पष्ट झाले नाही. ओळख पटविण्याचे प्रयत्न पोलीस करत आहे. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक चर्चांना देखील उधाण आले आहे. प्रकरणाचा तपास एसडीपीओ मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनात नवनियुक्त ठाणेदार अभय चौथंनकर आणि त्यांची टीम करत आहे.

# उपविभागीय अधिकारी कार्यालयावर दिव्यांगाचा घेराव

## प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी आंदोलन

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर, चांदुर रेल्वे, धामणगांव रेल्वे या तालुक्यातील अपंगांच्या जीवनावश्यक मागण्यासाठी अपंग जनता दल संघटनेचो जिल्हाध्यक्ष मयूर मेश्राम यांच्या नेतृवात उपविभागीय कार्यालयात घेराव आंदोलन करण्यात आले.

संजय गांधी निराधार योजनेचे मानधन दिव्यांगाना २५०० रुपये देण्यात यावे. अंत्योदय योजनेचा लाभ सर्व दिव्यांगाना देण्यात यावा, दिव्यांग यु डी आयडी प्रमाणपत्र दुसऱ्या जिल्ह्यातील असेल तरी त्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देण्यात यावा, दिव्यांगांना स्वयंरोजगारा करिता १०/१० ची जागा देण्यात यावी,नगर पंचायात,पंचायात समिती,ग्रामपंचायत कार्यालया अतर्गत५% दिव्यांग निधी



सरसकट सर्व दिव्यांगांना वाटप करण्यात यावा,दिव्यांग बीज भांडवल योजनेच्या कर्ज प्रकरणांना बँकांनी लवकरात लवकर मंजुरी द्यावी. अंथरुणावर पडून असलेल्या दिव्यांगांना आधार कार्ड,व संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देण्यात यावा. घरकुल योजनेमध्ये दिव्यांगाना जागा उपलब्ध नसल्यास शासकीय जागा त्यांना उपलब्ध करून देण्यात यावी.दिव्यांगांना ड्रायव्हिंग लायसन्स देण्याकरिता नवीन नियमावली तयार करावी अशी मागणी उपविभागीय अधिकारी श्रध्दा उदावंत यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.सर्व मागण्यांवर उपविभागीय अधिकारी यांनी सकारात्मक चर्चा करत काही विषय तत्काळ निकाली काढले,व उर्वरित विषयावर संबंधित विभागाशी चर्चा करून उपाययोजना करून आपल्या मागण्या मार्गी लाऊ असे आश्वासन दिले. या आंदोलनात शेख शकील,राहुल वानखडे, करामत शहा,प्रमोद शेबे,सरोज पुनसे,ज्योती देवकर,भाग्यश्री कुणबीथोप, जोशना खडसे , सुमिता बावनखेडे,सुनीता मोकळे,पूजा बावनखडे,सीमा पसलाने सुलोचना सुलोचना गिरा,मनीषा टाक, मधुकर राऊत, रशीद अहमद, प्रतीक्षा मडावी ,सुरेश लांडे ,अनिकेत वालेकर, शेख शेरू, प्रियंका बेबी,डांगे ,अनुसया वानखडे, पंचफुला चौधरी, नरेंद्र सवाई ,सचिन पवार, केशव फुंडे ,प्रफुल राऊत ,रामेश्वर टेंभुरने, अरुण देवगिरकर ,गोपाल साधनकर ,सुधाकर बनसोड, शेख जावेद ,नुवी परवीन, अजय बारबुद्धे ,मुकिंदा गेडाम ,रवींद्र नेवारे, सुनीता खंडारे ,वैष्णवी गिरडकर, पंचशीला सूर्यवंशी ,अरविंद घाबरडे, निरंजन घोडेश्वर, देवानंद गवई ,शारदा वांदिले इत्यादी दिव्यांग उपस्थित होते.

# पोलीस भरती प्रक्रिया जोग स्टेडियमवर सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलीस शिपाई पदाच्या २१४ जागेसाठी आज बुधवार ११ फेब्रुवारी पासून जोग स्टेडियमवर भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. पहिल्या दिवशी ८०० उमेदवारांना शारीरिक आणि कागदपत्राच्या तपासणीसाठी बोलविण्यात आले होते. ८०० पैकी ५७५ उमेदवार भरतीसाठी पोहोचले. २२५ उमेदवार गैरहजर होते. हजर उमेदवारांपैकी ५२६ उमेदवारांची शारीरिक तपासणी घेण्यात आली असून उर्वरित ४९ उमेदवार शारीरिक मोजमाप व कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरले आहे. ग्रामीण पोलीस दलात शिपाई संवर्गाच्या २१४ रिक्त जागेसाठी आजपासून भरती प्रक्रिया सुरू झालेली आहे. २१४ जागेसाठी २१ हजार २०६ अर्ज आले आहे.



आजपासून २६ फेब्रुवारी पर्यंत भरती प्रक्रिया सुरू राहणार आहे. यामध्ये १६,२८६ पुरुष व ४९२० महिला उमेदवार आहे. २३ फेब्रुवारी पर्यंत पुरुषांची चाचणी होणार आहे. त्यानंतर २४ ते २६ पर्यंत महिला उमेदवारांच्या कागदपत्राची पडताळणी व शारीरिक चाचणी करण्यात येणार आहे. भरतीसाठी आवश्यक कागदपत्रांसह उमेदवारांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भरती करिता बाहेर गावावरून येणाऱ्या उमेदवारांच्या राहण्याची व्यवस्था मालटेकडी जवळील वसंत हॉल येथे करण्यात आली आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण

विमानाचे आवश्यक भाग जप्त करण्यात आले असून पायलट व एटीसीमधील संवाद डिजिटाईज स्वरूपात उपलब्ध आहे. अपघातस्थळावरील नमुने न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**देशातील तपास यंत्रणांवर शंका नको -** फडणवीस

भारताच्या तपास यंत्रणा आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असून अनेक देशांकडून भारतीय अधिका-यांना चौकशीसाठी निमंत्रित केले जाते. त्यामुळे त्यांच्यावर अविश्वास दाखवण्याचे कारण नाही. भावनेच्या भरात काही विधाने झाली असतील; मात्र देशाच्या यंत्रणांवर शंका घेउ नये, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

- अजित पवार यांच्या दुर्दैवी मृत्यूचे राजकारण करू नये, असे आवाहन करत मुख्यमंत्री म्हणाले की, त्यांच्या अपघाती निधनाचे सत्य बाहेर यावे, अशी सर्वांचीच इच्छा आहे आणि ते निश्चितपणे समोर येईल, असा मला विश्वास आहे. कोणाकडे काही मुद्दे किंवा शंका असतील, तर त्यांनी ते डीजी सेफ्टीकडे पाठवावेत.

### व्यापारी करारातून डाळी वगळल्या

म्हणजेच ही खरेदी आता बंधनकारक राहिलेली नाही.व्हाईट हाउसने भारत-अमेरिका व्यापार कराराचे तथ्यपत्रक प्रसिद्ध केल्यानंतर अवघ्या एका दिवसात कराराच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

### वडाळी व कॉंग्रेस नगरात

धनादेश, संपत्तीची खरेदीखत जप्त केली. तसेच चांदुर रेल्वे येथील सहाय्यक निबंध किशोर इंगळेंच्या नेतृत्वात अविनाश महल्ले, चेतना कुचे, नरेंद्र आगरकर यांनी फ्रेजरपुरा पोलीस आणि पंचा समक्ष कॉंग्रेस नगर येथील सुमंत पाटील यांच्या घरी सकाळी कारवाई केली. तेथून अवैध सावकारासंबंधी १४ संशयित कागदपत्र जप्त करण्यात आले. यामध्ये दोन धनादेश, संपत्ती खरेदी खतचा समावेश आहे. कागदपत्रांच्या तपासणीनंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

### जुन्या वैमनस्यातून तरुणावर

माहिती मिळताच नागपूर गेट पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला. पोलिसांनी अजयचा जबाब नोंदवून त्या आधारावर तिन्ही आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

### लग्न पत्रिका वाटण्यासाठी

देण्यासाठी ते अकोटचे पळसानिया ट्रेडर्स जवळ थांबून नातेवाईकांची वाट पाहत होते. त्याचवेळी पोपटखेड मार्गावरून भरधाव वेगाने येणाऱ्या टिप्परने रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या दोघांना जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत मधुकरराव मेसरकर यांचा जागीच मृत्यू झाला तर नेहाल मेश्राम गंभीर जखमी झाला. अपघातानंतर टिप्पर चालक घटनास्थळावरून पसार झाला. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला असून जखमीवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. या प्रकरणी अकोट शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार टिप्पर चालकाचा शोध घेण्यात येत आहे. मुलीच्या लग्नाची पत्रिका वाटताना पिताच्या दुर्दैवी मृत्यूमुळे मेसरकर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरात या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

### जिल्ह्याच्या विकासासाठी

माहिती सादरीकरणाव्दारे सविस्तर दिली. अमरावती जिल्ह्यात १४ तालुके आहेत. यामुळे विकास कामांसाठी अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत जिल्ह्याला अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. सन २०२५ -२६ जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यानुसार ५२७ कोटी रुपयांची विकास कामे सुरु आहेत. सन २०२६ -२७ साठी ४३४. ७१ कोटी रुपयांचे स्पिलिंग दिले आहेत. त्यानुसार आराखड्याचे काम करण्यात आले आहे. परंतु यामध्ये अतिरिक्त ३०० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे येरेकर यांनी यावेळी मागणी केली. जिल्ह्याच्या विकासासाठी तालुका हा घटक महत्त्वपूर्ण आहे.जिल्ह्यातील लोकसंख्या, तालुक्यांची संख्या, भौगोलिक क्षेत्रफळ याचा विचार करून अतिरिक्त निधीच्या आवश्यकतेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी आग्रही भूमिका मांडली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून जिल्ह्याच्या विकासासाठी अधिक उत्तम काम करणाऱ्यास निधीची कमतरता पडणार नसल्याचा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकारी येरेकर यांच्या मागणीनुसार जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये वाढीव निधी प्राप्त होणार आहे. यामुळे जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागातील प्रलंबित विकासकामांना आता नवी उभारी मिळणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे आमदार खोडके यांनी सन २०२६ -२७ साठी मनपा अंतर्गत विविध विकास कामांसाठी १०० कोटी रुपये अतिरिक्त निधीची विशेष मागणी केली. जिल्ह्यामध्ये मनपाच्या ६३ शाळा आहेत. मनपा शाळेच्या दुरुस्ती व देखभालीसाठी जिल्हा नियोजन समिती आराखड्यात नवीन लेखाशीर्ष समाविष्ट करण्याबाबतची मागणीही त्यांनी यावेळी केली.

### महसूल विभागाची अवैध गौण

रचून ही धडक कारवाई केली.या कारवाईत रेती सह ट्रॅक्टर क्रमांक MH २९ BC ३७६३ जप्त करण्यात आला.तसेच वाहन मालक दुर्योधन तायडे रा. थुगांव पिपरी यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाई महसूल पथकातील विलास ढोले, जगदीश पानसे,प्रतिक चव्हाण,पद्माकर झळके यांनी पार पाडली.

### २२ वी महाराष्ट्र राज्य

आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे अमरावती केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे- दिग्दर्शनः प्रथम पारितोषिक प्रतिभा कोकमारे (नाटक- दप्तर), द्वितीय पारितोषिक कल्याणी गेडाम (नाटक- बी पॉजीटिव्ह), तृतीय पारितोषिक रितेश महल्ले (नाटक झाडवाली झुंबी), प्रकाश योजना प्रथम पारितोषिक प्रतिभा फोकमारे (नाटक-वाढदिवस), द्वितीय पारितोषिक दीपक नांदगावकर (नाटक-आदिबांच्या बेटावर), तृतीय पारितोषिक परियल बंड (नाटक झाडावली झुंबी), नेपथ्यः प्रथम पारितोषिक अनिकेत देशमुख (नाटक-बी पॉजिटीव्ह) द्वितीय पारितोषिक रविंद्र काळपांडे (नाटक- आनंदाचे झाड), तृतीय पारितोषिक शांता झाडे (नाटक-तळमळ एका अडगळीची), रंगभूषा प्रथम पारितोषिक स्नेहशील गणविर (नाटक-तळमळ एका अडगळीची), द्वितीय पारितोषिक प्राची गायकवाड (नाटक-शेपूट राहिल), तृतीय पारितोषिक संदिप शिंदे (नाटक-अबोलांचे बोल), वेशभूषा प्रथम पारितोषिक जया शिरभाते (नाटक-उजबोगा), द्वितीय पारितोषिक रेयांश बाभुळकर (नाटक-डमी), तृतीय पारितोषिक पल्लवी कपिले (नाटक-आदिबांच्या बेटावर), संगीत दिग्दर्शन : प्रथम पारितोषिक प्राची गायकवाड (नाटक-ती एका की का ?), द्वितीय पारितोषिक अनुराग वानखडे (नाटक-अनाथ), तृतीय पारितोषिक देवाशीष खोपे (नाटक- शेपूट राहिलं), उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक अंकुश जैन (नाटक-दप्तर), अन्वी वाहाने (नाटक-ती एकाकी का ?) अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे सृष्टी कटारे (नाटक-दप्तर), राखी मिना (नाटक-जाईच्या कळ्या), परि ढोले (नाटक-क्षितीज्या पलीकडे), अनुष्का ढोंबळे (नाटक-वाढदिवस), पारुल लोखंडे (नाटक-देवाला पत्र), आयांश कपिले (नाटक-आदिबांच्या बेटावर), अद्वैत तराळ (नाटक-अनाथ), अनय तिळकीट (नाटक-बुध्दाची गोष्ट) अन्वेश भुजाडे (नाटक-स्वयंपूर्ण) अर्नव जैसस्वाल (नाटक-डमी). दि. २५ जानेवारी, ते ०७ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह मेडिकल कॉलेज, अमरावती येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण ६७ बालनाट्य प्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुधीर देशपांडे, हेमराज भगत आणि मिनाक्षी बोरकर यांनी काम पाहिले.सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या बालनाटकांच्या संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले.ब

# दुचाकीला कट लागल्याच्या वादातून खून

### तिघांचा दोन भावांवर प्राणघातक हल्ला, मोठ्या भावाचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हयातील नांदगाव पेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत दुचाकीला कट लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात तीन अज्ञात आरोपींनी दोन सख्ख्या भावांवर चाकूने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात मोठ्या भावाचा जागीच मृत्यू झाला असून, लहान भाऊ गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतक गौरव सुधाकर घोटेकर (वय ३३) आणि त्यांचा लहान भाऊ सौरभ सुधाकर घोटेकर (वय ३०), दोन्ही राहणार अंजनगाव सुर्जी, हे नांदगाव पेठ येथील एमआयडीसीमध्ये कार्यरत होते. नांदगाव पेठ बस स्टॅन्ड जवळ त्यांच्या दुचाकीला एका ट्रिपल सीट आलेल्या दुचाकीचा कट लागला.

या कारणावरून दोन्ही बाजूंनी शाब्दिक चकमक झाली. मात्र, वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि अज्ञात तीन आरोपींनी घोटेकर बंधूंवर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला चढवला.

या हल्ल्यात गौरव घोटेकर यांचा जागीच मृत्यू झाला. तर, धाकटा भाऊ सौरभ घोटेकर हा या हल्ल्यात गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन) उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५५/२०२६ ने.ता.२०.०३.२०२६

**अर्जदार :**
१. रत्नाबाई अंबरराव चव्हाण, वय ६५ धंदा - घरकाम
रा.शेगाव नाका, अमरावती, ता.जि.अमरावती
२. अनिल गोपाळराव सोळंके, वय ६० धंदा -
३. सुनील गोपाळराव सोळंके (मयत) तर्फे वारस
३अ) विमल सुनील सोळंके, वय ४८ धंदा - घरकाम
रा.जुना बायपास रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
३ब) सिमा भिमराव चव्हाण, वय ३६ धंदा - नोकरी
रा.मसमापूर-अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
३क) सुषमा विजय चव्हाण, वय ३७ धंदा - घरकाम
रा.शिमला विहार, अमरावती, ता.जि.अमरावती
३ड) अजय सुनील सोळंके, वय ३५ धंदा - नोकरी
रा.दस्तुर नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३इ) किरण हिंमत चव्हाण, वय ३२ धंदा - घरकाम
रा.रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. सुनंदा रघुनाथ चव्हाण, वय ६२ धंदा - घरकाम
अर्जदार नं.२ व ४ रा.बोराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक लक्ष्मीबाई गोपाळराव सोळंके** यांचा मृत्यू दिनांक **१०.०५.२०१६** रोजी बोराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे वृध्दापकाळाने झाला. तसेच मृतक **सुनील गोपाळराव सोळंके** यांचा मृत्यू दिनांक **०३.०३.२००५** रोजी झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**०९.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०५/२०२६
**विजय व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१०.०४.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. विजय मनोहरराव हिरुळकर, वय ५९ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त
रा.गजानन कॉलनी, कांडली सालेबाद, ता.अचलपूर, जि.अमरावती
२. अजय मनोहरराव हिरुळकर, वय ५६ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.४२, बडनेरा रोड गोपाल नगर, विजय नगर साई नगर, अमरावती
३. कु.जयश्री मनोहरराव हिरुळकर, (लग्नापुवीचे नांव)
सौ.जयश्री किशोर अनासारे (लग्नानंतरचे नांव) वय ५५ वर्षे, व्यवसाय -घरकाम
रा.प्लॉट नं.७२, गोमासे किराणा समोर, विजय नगर गोपाल नगर, साई नगर,
अमरावती
४. कु.वंदना मनोहरराव हिरुळकर, (लग्नापुर्वीचे नांव)
सौ.वंदना राजेश खांडेकर (लग्नानंतरचे नांव)वय ५३ वर्षे, व्यवसाय -घरकाम
रा.गोवर्धन विहार, कांडली, ता.अचलपूर, जि.अमरावती
५. कु.नितीशा मनोहरराव हिरुळकर (लग्नापुर्वीचे नांव)
सौ.नितीशा नितीन तारेकर (लग्नानंतरचे नांव)वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.अमर कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **उषा मनोहरराव हिरुळकर** हे दिनांक 09.12.2021 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **विजय व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विजय व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



## जाहीर नोटीस

**संजय जाधव, अपर आयुक्त (सा.प्र.) अमरावती विभाग, अमरावती, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे महसूल न्यायालय, अमरावती**

पुनरिक्षण अर्ज क्र.२९०/आरटीएस-६४/खोलापूर, जि.अमरावती/२०२४

**अर्जदार -**
१. अशोक जयराम अंबुलकर,
रा.खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती
२. सतीश जयरामजी अंबुलकर,
रा.बडनेरा रोड, गोपाल नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. जया जयवंतराव वडुरकर,
रा.असोले लेआऊट, आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा
४. रतनमाला लिलाधर इंगळे, रा.गोपाल नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
५. वंदना नामदेवराव खोपे, रा.रवि नगर, नागपूर, ता.जि.नागपूर
६. माला भाष्करराव ओलीवकर,
रा.सुतगिरणी कॉलनी, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
७. लता विलासराव धामणकर, रा.डेपो मागे, चांदूर रेल्वे, जि.अमरावती.
८. विमलाबाई जयरामजी अंबुलकर, रा.खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती
९. श्याम श्रीरामजी अंबुलकर, रा.खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार-१.** अपर जिल्हाधिकारी, अमरावती
२. उपविभागीय अधिकारी, तिवसा-भातकुली
३. तलाठी, मौजे खोलापूर भाग-२, ता.भातकुली, जि.अमरावती
४. मंडळ अधिकारी, खोलापूर , ता.भातकुली, जि.अमरावती
५. शांताबाई पांडुरंगजी नेतनवार,
रा.शिरजदा, पो.आमला, ता.दर्यापूर, जि.अमरावती
६. दिनेश दादाराव पाटील, रा.खोलापूर कसबा, ता.भातकुली, जि.अमरावती
७. सुखदेव मारोती नेतनवार, रा.खोलापूर कसबा, ता.भातकुली, जि.अमरावती
८. नदीम अहेमद अब्दुल वाहीद, रा.खोलापूर कसबा, ता.भातकुली, जि.अमरावती
९. नसीम अहेमद अब्दुल वाहीद,रा.खोलापूर कसबा, ता.भातकुली, जि.अमरावती

**प्रति**
**गैरअर्जदार नं.६** - दिनेश दादाराव पाटील, रा.खोलापूर कसबा, ता.भातकुली, जि.अमरावती

उपरोक्त नमुद पक्षकार यांचे उक्त प्रकरण अपर आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे न्यायालयामध्ये दि.१८.०२.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता सुनावणीकरीता ठेवण्यात आले आहे. तरी या जाहीर नोटीसद्वारे तुम्हास कळविण्यात येते की, तुम्ही स्वतः अथवा अधिकृत वकीलामार्फत उपरोक्त प्रकरणात तुमची बाजू मांडण्याकरीता दि.१८.०२.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता न चुकता हजर रहावे. तुम्ही या दिवशी गैरहजर राहिल्यास सदर पनरिक्षण प्रकरण तुमचे विरुध्द एकतर्फी चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण - अमरावती
दिनांक १०.०२.२०२६

शिक्का

स्वा/-
**(संजय जाधव)**
अपर आयुक्त (सा.प्र.)
अमरावती विभाग, अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# तरुणाची निर्घृण हत्या
## शिरपूर पोलिसांनी तीन जणांना ठोकल्या बेड्या

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

**शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या रिसोड रस्त्यावरील किन्ही घोडमोड फाट्याजवळील पुलाखाली एका ३५ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या झाली, यामुळे एकच खळबळ उडाली आहे. ही घटना १० फेब्रुवारी रोजी उघडकीस आली, राजू कैलास खरात वय ३५ रा दापुरी खुर्द ता रिसोड असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी शिरपूर पोलिसांनी तीन जणांना बेड्या ठोकल्या आहे.**



शिरपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोनल उर्फ साक्षी राजू खरात वय २८ रा दापुरी खुर्द ह मु वेताळबाबा, गाळेतळ हडपसर, पुणे यांचा पती राजू कैलास खरात ९ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास यांना पत्नी सोनलने फोन केला असता त्यांनी सांगितले की, मी सुनील बबन शिंदे याला मोटरसायकल मागितली असता त्यांनी मला शिवीगाळ केली म्हणून मी त्याच्या नावाचा रिपोर्ट देण्याकरिता शिरपूर पोलीस स्टेशनला आलो आहे. तेव्हा सोनलचे पती हे दारू पिलेले असल्यामुळे त्यांना चांडस येथे परत येण्यास सांगितले, परंतु सोनलचे पती हे घरी परत आले नाही. त्यानंतर सोनल पतीचा शोध घेत असताना १० फेब्रुवारी रोजी दुपारी बारा वाजता चे सुमारास सोनल हिला गावातील लोकांकडून समजले की, एका माणसाला किन्ही घोडमोड फाट्यावर मारून टाकले आहे, त्याचे फोटो मोबाईलवर आले आहे त्यामुळे सोनल हिणे मोबाईलवर फोटो पाहिले असता त्या फोटोवर ते तिची पती असल्याचे वाटत होते, त्यामुळे सोनल पोलीस स्टेशन शिरपूर येथे याबाबत चौकशी करायला आली, तेव्हा सोनल हिला शिरपूर पोलिसांनी मरण पावलेल्या इसमा चा मृत्यूदेह जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे फ्रीजरमध्ये ठेवलेला असल्याची माहिती देऊन सोनाल हीला वाशिम येथे घेऊन जाऊन तो मृतदेह दाखविला तो मृतदेह सोनालचे पती राजू कैलास खरात यांचा असल्याची खात्री झाली त्यावेळी सोनल चा पती राजू यांच्या अंगावर, हातावर, चेहऱ्यावर, डोळ्यावर, छातीवर मारहाणीच्या जखमा आणि वळ व पट्टे होते. ९ फेब्रुवारी रोजी सोनलच्या पतीने सुनील बबन शिंदे यास मोटरसायकल मागितली यावरून सुनील शिंदे आणि सोनल चे पती राजू मध्ये वाद झाला. त्या वादाचे कारणावरून सोनलचा पती यांना किन्ही घोडमोड फाटया जवळील पूला खाली सुनील बबन शिंदे त्याचा मित्र गणेश सखाराम सुरूशे आणि आरती सुनील शिंदे यांनी शिवीगाळ करून तुझा काटा काढतो अशी धमकी दिली व संगणमत करून मारहाण केली व जिवाने ठार मारले. घटनेची माहिती मिळताच शिरपूरचे ठाणेदार केशव वाघ, पीएसआय राहुल चव्हाण, पोहेकॉ संदीप निखाडे, बालाजी महाले, विजय इंगोले, हे का सतीश चव्हाण, कैलास बळी, स्थानिक गुन्हे शाखा वाशिमचे जगदीश बांगर, गजानन झगरे, फॉरेन्सिक एक्सपर्ट यांनी घटनास्थळ गाठले सोनल उर्फ साक्षी राजू खरात वय २८ दापुरी खुर्द ह मु वेताळबाबा गाळेतळ, हडपसर, पुणे यांनी १० फेब्रुवारी रोजी शिरपूर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. फिर्यादी वरून शिरपूर पोलिसांनी आरोपी सुनील बबन शिंदे, आरती सुनील शिंदे, गणेश सखाराम सुरूशे रा दापुरी खुर्द या तीन जनाविरुद्ध विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून अटक केली आहे. पुढील तपास ठाणेदार केशव वाघ यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक इम्रान पठाण हे करीत आहेत.

# निवेदनाची दखल घेत
## प्रशासनाकडून सकारात्मक पाऊल
### नगरपंचायत कार्यालयात महापुरुषांचे छायाचित्रे सन्मानाने प्रदर्शित



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

महापुरुषांच्या सन्मानासाठी देण्यात आलेल्या निवेदनाची अखेर प्रशासनाने गांभीर्याने दखल घेत मालेगाव नगरपंचायत कार्यालयात थोर महापुरुषांची छायाचित्रे सन्मानपूर्वक व दर्शनी ठिकाणी लावण्यात आली आहेत. या निर्णयामुळे सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

दि. २३ जानेवारी रोजी गणेश रामप्रसाद आहिर यांनी महापुरुषांची छायाचित्रे सप्रेम अर्पण करून ती नगरपंचायत कार्यालयात लावण्याची लेखी मागणी केली होती. त्यानंतर तहसील कार्यालयात निवेदन देत प्रशासकीय हस्तक्षेपाची मागणी करण्यात आली होती. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत नगरपंचायत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत संबंधित छायाचित्रे योग्य, स्वच्छ व सन्माननीय ठिकाणी लावली.

महापुरुषांचे विचार हे देशातील प्रचलित कायदे, राज्यघटनेतील मूल्यव्यवस्था व सामाजिक बांधिलकीचे आधारस्तंभ आहेत. अशा थोर व्यक्तिमत्त्वांची छायाचित्रे सार्वजनिक कार्यालयात झळकणे म्हणजे त्या कार्यालयाच्या कार्यसंस्कृतीची ओळख मानली जाते. अखेर प्रशासनाने सकारात्मक पाऊल उचलल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांनीही प्रशासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून, 'महापुरुषांचा सन्मान हा सर्वांचा समान विषय आहे; तो राजकारणाच्या पलीकडचा आहे,' अशी भावना व्यक्त केली आहे. या प्रकरणामुळे निवेदनाच्या माध्यमातून केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याचे स्पष्ट झाले असून, महापुरुषांचे विचार आता नगरपंचायत कार्यालयाच्या भिंतींवर झळकत राहून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना प्रेरणा देतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या शारीरिक कलागुणांना वाव देणे होय -गजानन भिसडे



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

येथील तहसील कार्यालया जवळील श्री व्यंकटेश सेवा समिती द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा येथे क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर क्रीडा सप्ताहाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष विठ्ठल कुटे ,प्रमुख उद्घाटक मालेगांव तालुका क्रीडा समन्वयक गजानन भिसडे , सामाजिक कार्यकर्ते गजानन काळे मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सर्वप्रथम सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या वतीने पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर नारळ फोडून व फीत कापून प्रत्यक्ष क्रीडा स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

# भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्याचे आवाहन

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलवर सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी (फ्रीशीप) व इतर योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

महाडीबीटी डॅशबोर्डचे अवलोकन केले असता, मागील वर्षाच्या तुलनेत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अर्ज नोंदणीचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून येत असून, महाविद्यालय स्तरावर मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. महाडीबीटी डॅशबोर्डवरील सद्यस्थिती (मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रीशीप) सन २०२५-२६ नोंदणीकृत अर्ज : ५,६६९ महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज : १,७१३



जोपर्यंत विद्यार्थ्यांकडून महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर केले जात नाहीत, तोपर्यंत महाविद्यालय व जिल्हा कार्यालय स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज मंजुरीची कोणतीही कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून विहित मुदतीत अर्ज भरून घेणे अत्यावश्यक आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अर्ज नोंदणीचे प्रमाण अत्यल्प असल्याबाबत सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी आयोजित केलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, अर्ज नोंदणी वाढविणे तसेच सन २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील सर्व प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, वाशिम कार्यालयामार्फत विविध महाविद्यालयांमध्ये शिष्यवृत्ती विषयक कार्यशाळांचे आयोजन करून महाडीबीटी प्रणालीवरील अर्ज नोंदणी वाढविणे व प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, असे निदर्शनास येत आहे की, अनेक विद्यार्थी व संबंधित महाविद्यालये अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतरही शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत अर्ज ऑनलाईन नोंदणी करून घेत नाहीत. परिणामी विद्यार्थी शिष्यवृत्ती व फ्रीशीप योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. ही बाब केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली तसेच राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे संबंधित शैक्षणिक वर्षासाठी तसेच नूतनीकरणासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज नोंदणी करणे बंधनकारक असल्याचे धोरण राज्य शासनाने निश्चित केले आहे.

सर्व महाविद्यालयांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, फ्रीशीप व इतर योजनांचे अर्ज नोंदणीचे प्रमाण वाढवावे.

# विद्यार्थ्यांची क्षेत्र भेट अंतर्गत गांडूळ खत निर्मिती प्रकल्पाला भेट



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेट उपक्रमातून दिली गांडूळ खत निर्मिती प्रकल्पाला भेट. वाशिम मालेगाव रोडवरील अक्कलवाडी फाटा जवळ सुरू झालेल्या गांडूळ खत निर्मिती प्रकल्पाला शाळेतील विद्यार्थ्यांनी भेट दिली व खत निर्मिती संदर्भात या प्रकल्पाचे मालक दिप पाटील यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली गांडूळ खत पिकांसाठी कसे योग्य आहे व एका शेतामध्ये वापरल्यामुळे नैसर्गिक शेती कशा पद्धतीने होऊ शकते अशी महत्वपूर्ण माहिती यावेळी विद्यार्थ्यांना दिली देण्यात आली.

# दिव्यांग योजनांचा बाजार!
## वाशिममध्ये बोगस प्रमाणपत्रांचा सुळसुळाट



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम जिल्ह्यात दिव्यांग कल्याण योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या दिव्यांग प्रमाणपत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप करत, बोगस, बनावट व चुकीची दिव्यांग प्रमाणपत्रे तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत ॲड. संघनायक मोरे यांनी थेट दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकारामजी मुंढे यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वाशिम जिल्ह्यात दिव्यांग प्रमाणपत्र देताना प्रशासनाने डोळ्यावर पट्टी बांधल्याप्रमाणे कामकाज सुरू ठेवले आहे. पात्रता नसतानाही अनेक व्यक्तींना दिव्यांग प्रमाणपत्रे दिली जात असून, यामध्ये आधारकार्ड एका व्यक्तीचे तर प्रमाणपत्रावर नाव दुसऱ्याच व्यक्तीचे असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून, थेट प्रशासकीय संगनमताचा संशय निर्माण करणारा आहे.

या बोगस प्रमाणपत्रांमुळे खऱ्या आणि गरजू दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नसून, त्यांच्या हक्कांवर सरळसरळ गदा आणली जात आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ अपात्र लोक लाटत असल्याने, खऱ्या दिव्यांगांची खुलेआम फसवणूक सुरू आहे, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, या सर्व प्रकारांकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. जर प्रशासनाने वेळेत कठोर कारवाई केली नाही, तर दिव्यांग कल्याण योजनांचा मूळ उद्देशच धुळीस मिळणार असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून बोगस, बनावट व चुकीची सर्व दिव्यांग प्रमाणपत्रे तात्काळ रद्द करावीत, तसेच दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करावी.

# क्रांती सूर्याच्या पुतळ्याचा तेलंगणामध्ये झालेल्या विटंबनेचा ग्रामस्थांमध्ये संताप



**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

तेलंगणातील महात्मा ज्योतिबा फुलेंच्या पुतळ्याच्या विटंबनेचे पडसाद तालुक्यातील इंझोरी येथील ग्रामस्थांमध्ये उमटून स्थानिकांनी या विरोधात निषेध सभा घेतली.

येथील गांधी चौकातील महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून ग्रामस्थांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

ज्या महापुरूषाने आम्हाला शिकवून आमच्या जाणिवा जागृत केल्या त्या महापुरुषांच्या पुतळ्याची विटंबना करणे हे फार मोठे पातक असल्याचे सांगून या घटनेचा जाहीर निषेध करत असल्याचे सरपंच ॲड. मनीषा दिघडे यांनी मत व्यक्त केले. उपरोक्त निषेधार्य घटनेकडे केवळ एक घटना म्हणून पाहता येणार नसून तो क्रांती सूर्याच्या समतेच्या विचारावर जाणीवपूर्वक केलेला हल्ला आहे.

# कुतुहल विज्ञान प्रदर्शनीने इतीहास घडविला -जिल्हाअधिकारी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

विज्ञान भारती नागपुर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय वाशिम यांच्या वतीने ६ ते ८ रोजी फेब्रुवारी यांच्या वतीने पार पडलेल्या कुतुहल विज्ञान प्रदर्शनीला जवळपास ४० हजार विद्यार्थ्यांना लाभ मीळुन त्यांचा वैज्ञानीक दृष्टीकोन विकसीत झाला आहे .सदर प्रदर्शनीने जिल्ह्यामध्ये इतीहास घडविला असे प्रतीपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.



स्थानीक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रांगनात ८ फेब्रुवारी रोजी समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून त्यानी वरील प्रतीपादन केले. मंचावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ सतीन मेश्राम, आएपी अध्यक्ष डॉ वसंत खडतकर, संघटन मंत्री विवस्वान हेंबाळकर, विज्ञान प्रदर्शनीचे उपाध्यक्ष डॉ हरीष बाहेती, वशिम अर्बन बँकेच्या अध्यक्षा श्रीमती शीलाताई राठी, कुतुहल मुख्य समन्वयक रोहित गनोरकर, विज्ञान भारतीचे नरेंद्र सातफळे ,विज्ञान भारतीचे विदर्भ कोषाध्यक्ष गीरीश जोशी, शिक्षनाधिकारी मंगलताई धुपे गायकवाड आदींची उपस्थीती होती, सर्वप्रथम भारत माता यांच्या प्रतीमेचे पुजन व दिप प्रजल्वन करण्यात आले. तदनंतर सर्व मान्यवरांचा सन्मानचीन्ह व पुस्तक भेट देउन सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्थेच्या शिक्षकांना सन्मानीत करण्यात आले. त्यामधे विजय भड, ललीत भुरे, संतोष गीऱ्हे, शैलेश चव्हान ,इमरान हुसैन, माधव ढोले, कीशोर उंडाळ, सुशील अपुर्वा, मनीश गावंडे, राजेश वाघ, यांचा समावेश आहे. सदर प्रदर्शनीच्या यशस्वीते करीता पुढाकार घेनारे राजेश गोरुले, सामाजीक कार्यकर्ते नीलेश सोमानी, सौ. भारती सोमानी, डॉ संजय तोषनीवाल, उद्योजक अभीषेक मुंदडा, उद्योजक शेखर बंग, ॲड. दिपक कलवार, राजेंद्र कलवार, नगरसेवक पुरनमल बदलानी ,शेलुबाजार अर्बनचे मोहीत कर्नावट यांचा विज्ञान भारतीच्या वतीने सन्मान चीन्ह , पुस्तक व गुलाब पुष्प देउन सत्कार करण्यात आला.

तीन दिवसोय प्रर्दशनी मध्ये शिस्त व जास्त विद्यार्थी आननाऱ्या संस्थांना लक्ष्मीबाई गोरूले, संस्थेचे अध्यक्ष राजेश गोरूले यांचा वतीने प्रत्येक संस्थेला ५ हजार रोख पारीतोशीक व सन्मान चिन्ह देउन सन्मानीत करण्यात आले, त्यामध्ये श्री शिवाजी विद्यालय वाशिम, लॉयन्स विद्यानीकेतन वाशिम, वाईगौळ मानोरा येथील तपस्वी काशीनाथबाबा माध्यमीक आश्रम शाळा यांचा समावेश आहे.

# जिल्हा पोलीस दलाच्या भरती प्रक्रियेला प्रारंभ
## ८०० पैकी ६१० उमेदवारांची हजेरी

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

अकोला पोलीस दलाच्या २०२४-२०२५ या वर्षातील पोलीस शिपाई भरती प्रक्रियेला बुधवारी पहाटेपासून प्रारंभ झाला. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ५ वाजता पोलीस मुख्यालयात ही प्रक्रिया सुरू करण्यात आली.

१६१ पोलीस शिपाई पदांसाठी तब्बल ११ हजार ७८४ अर्ज प्राप्त झाले आहेत. पहिल्या दिवशी ८०० उमेदवारांना बोलावण्यात आले होते. त्यापैकी ६१० उमेदवार उपस्थित राहिले. उपस्थितांपैकी ५४४ उमेदवार शारीरिक चाचणीस पात्र ठरले. यामधून २५ पेक्षा अधिक गुण मिळवत ३०७ उमेदवारांनी पुढील टप्प्यासाठी पात्रता मिळविली.

भरती प्रक्रियेत शारीरिक मोजमाप, मैदानी चाचणी व कागदपत्र तपासणीचा समावेश आहे. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ नुसार ही प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत राबविण्यात येत आहे. संपूर्ण भरती सीसीटीव्ही आणि व्हिडिओ चित्रीकरणाखाली होत असून डिजिटल फोटो, बायोमेट्रिक प्रणाली आणि आरएफआयडी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. कोणत्याही गैरप्रकारास कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.



उमेदवारांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिका, मोबाइल शौचालये आणि ध्वनीप्रणालीची व्यवस्था करण्यात आली आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांसाठी निमवाडी पोलीस वसाहतीतील मल्टिपर्पज हॉलमध्ये निवासाची सोय करण्यात आली असून प्रक्रिये दरम्यान केळी, बिस्कीट व ग्लुकोजचे वाटपही करण्यात आले.

भरतीसाठी उमेदवारांनी आधारकार्ड, सहा पासपोर्ट साईज फोटो, शैक्षणिक गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला किंवा एसएससी प्रमाणपत्र, अधिवास व जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमिलेअर, ईडब्ल्यूएस/एसईबीसी प्रमाणपत्र (लागू असल्यास) तसेच समांतर आरक्षणातील वैध प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. सर्व प्रमाणपत्रे ७ डिसेंबर २०२५ पूर्वीची असणे आवश्यक आहे. दरम्यान, 'पोलीस भरती करून देतो' अशा खोट्या आश्वासनांद्वारे फसवणूक करणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असून कोणतेही पैसे देण्याची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पैशांची मागणी झाल्यास नजीकच्या पोलीस ठाण्यात, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या १०६४ या मदत क्रमांकावर किंवा पोलीस अधीक्षक कार्यालय (०७२४-२४४५३०५) तसेच पोलीस नियंत्रण कक्ष (०७२४-२४३५५००) येथे तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**टिसी हरवली आहे**

मी अर्जुन दिनकर मुंढे वाशीम ते रिसोड जात असताना दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी वेळ दुपारी ३ ते ४ दरम्यान भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय केज ,डि एड ची टि सी हरवली आहे कुणाला आढळल्यास ८८८८७७१७८० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

**टिसी हरवली आहे**

मी श्रीकृष्ण माधवराव गोरे अंजनखेडा ते हिस्से बोराळा जात असताना दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी वेळ दुपारी ३ ते ४ दरम्यान राष्ट्रीय अध्यापक विद्यालय बीड ,डि एड ची टि सी हरवली आहे कुणाला आढळल्यास ७५०७५०८८३३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ७८ ■ गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यात वाढ करून द्या

## -राज्यस्तरीय बैठकीत पालकमंत्र्यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जातो. त्यातून दरवर्षी हजारो विकासाची कामे होतात. त्यामुळे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात वर्धा जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यात वाढ करून द्यावी, अशी मागणी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केली.

मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेचे आराखडे अंतिम करण्यासंदर्भात मुंबई येथे राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. पालकमंत्री डॉ.पंकज भोयर तसेच आ.सुमित वानखेडे हे देखील मुंबई येथे बैठकीस उपस्थित होते. त्यावेळी पालकमंत्र्यांनी ही मागणी केली. वर्धा येथून दुरदृष्यप्रणालीद्वारे जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुद्ध राजुरवार यांच्यासह सर्व विभागप्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्ह्याला ३५० कोटी रुपये मंजूर होते. यावर्षी यात मोठ्या संख्येने वाढ होणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील कारंजा हा आकांक्षित तालुका आहे. यावर्षी कारंजा तालुक्याने चांगली कामगिरी केली. पुढील वर्षी तालुक्याला राज्यात पहिल्या क्रमांकावर आणण्याचे उद्दिष्ट आम्ही ठेवले आहे. वर्धा शहरात नाट्यगृह, बोर अभयारण्याचा विकास, सेवाग्राम विकास आराखड्यासह आरोग्य, शिक्षण, रस्ते यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी लागणार असल्याने वार्षिक योजनेच्या आराखड्यात वाढ करून देण्याची विनंती पालकमंत्र्यांनी श्री.फडणवीस यांच्याकडे केली.



**'मित्रा'च्या माध्यमातून बोरचा विकास व्हावा-** राज्य शासनाच्यावतीने 'मित्रा' ही स्वतंत्र संस्था विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम करीत आहे. या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणकुमार परदेशी हे अभयारण्याचे जाणकार आहे. त्यामुळे बोरच्या विकासाची जबाबदारी मित्रा या संस्थेकडे देण्यात यावी, असी विनंती देखील पालकमंत्री डॉ.भोयर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

**सेवाग्राम सोलर पार्कला मंजूरी द्या-** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी सेवाग्राम विकास आराखड्याद्वारे सेवाग्राम व वर्धा येथे विविध विकासाची कामे करण्यात आली. अजून काही नाविन्यपूर्ण कामे प्रस्तावित आहे. ती कामे व त्यासाठी लागणाऱ्या निधीस मंजूरी मिळावी. तसेच सेवाग्राम येथे 'सेवाग्राम विकास पार्क' करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यास देखील मान्यता मिळावी, अशी मागणी देखील पालकमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना केली.

**विकास आराखडा ४५० कोटींचा करावा - आ. वानखेडे**

जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा वाढवून देण्यात यावा या पालकमंत्र्यांच्या मागणीला आ.सुमित वानखेडे यांनी देखील लावून धरले. यावर्षी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेत ३५० कोटी रुपये मंजूर आहे. पुढील आर्थिक वर्षात ४५० कोटीचा आराखडा करण्यात यावा. शाळा, रुग्णालये, अंगणवाड्यांना दरवर्षी निधी दिला जातो. परंतू हा निधी पुरेसा नाही. नियोजन करून या बाबींचा विषय एकदात मार्गी लावणे आवश्यक असल्याचे आ.वानखेडे म्हणाले.

**जिल्हाधिकाऱ्यांकडून आराखड्याचे सादरीकरण-** जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी शासनाने सुचविलेला नियतव्यय आणि विभागांकडून प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या पुढील आर्थिक वर्षाच्या आराखड्याचे सादरीकरण केले. यावर्षी झालेला खर्च व पुढील वर्षी आवश्यक निधीची माहिती त्यांनी सादर केली.

# विकासाच्या गप्पा बंद करा; आधी रस्ता द्या

## -बेलगाव-झाडगाव मार्गावर नरकयातना; १० किमीवर डांबर गायब, स्थानिक नेते कुठे लपले?



### -निवेदनांचा ढीग, आश्वासनांचा पाऊस... पण रस्ता अजूनही खड्डयात

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा-बेलगाव मार्गावरील झाडगाव, दिग्रस परिसर आज अक्षरशः धुळीत मिळाला आहे. अवघ्या १२ किलोमीटरच्या मुख्य रस्त्यापैकी तब्बल १० किलोमीटरवर डांबराचा थांगपत्ता नाही. उघडी गिट्टी, मोठे गोटे आणि खड्डयांची साखळी हा रस्ता नसून नागरिकांच्या सहनशीलतेची परीक्षा आहे. रोजच्या प्रवासात वाहनं पंचर होणं, गाड्या बंद पडणं, प्रवाशांचा जीव धोक्यात येणं ही आता नित्याची बाब झाली आहे. एसटीची 'लाल परी'सुद्धा या रस्त्यावर वारंवार नादुरुस्त होते, मग सामान्यांची काय कथा?

धुळीच्या प्रचंड लोंढ्यामुळे रस्त्यालगतची पिकं करपली आहेत. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असताना सत्ताधारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी मात्र विकासाच्या रंगीत पोस्टरमध्ये रमलेले दिसतात. निवडणुकीच्या वेळी घरपोच येणारे नेते आज या रस्त्यावरून एकदाही फेरफटका मारायला तयार नाहीत, अशी संतप्त भावना नागरिकांत आहे.

अनेक वेळा निवेदनं दिली, आंदोलने केली, पण प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या कानावर जूंही रांगली नाही. आता रस्ता नाही तर निवडणूकीवर बहिष्कार असा इशारा स्थानिक नागरिक स्वप्निल डंबारे यांनी दिला आहे.

प्रशासनाच्या दिरंगाईमुळे आणि लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे हा रस्ता आज 'अपघाताची वाट' ठरला आहे. प्रश्न एकच नेतेमंडळींना नागरिकांच्या जिवाची किंमत आहे का? की पुन्हा निवडणुकीच्या तोंडावरच डांबराचा पातळ थर टाकून मतांचा खेळ मांडला जाणार, बेलगाव-झाडगाव मार्गावरील संताप आता उसळण्याच्या उंबरठ्यावर आहे.

# मंगरूळच्या राखीव वनात मादी बिबट्या मृतावस्थेत; प्रादेशिक संघर्षातून मृत्यूचा प्राथमिक निष्कर्ष



**समुद्रपूर, (वर्धा) जनमाध्यम :** समुद्रपूर तालुक्यातील मंगरूळ येथील राखीव वन कक्ष क्रमांक ३२७ मध्ये तिन ते साडेतीन वर्षे वयोगटातील मादी बिबट्या मृतावस्थेत आढळून आल्याची घटना १० फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे वनविभागात तसेच वन्यजीव अभ्यासकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. प्राथमिक तपासात प्रादेशिक वादातून (टेरिटोरियल फायट) झालेल्या झुंजीत तिचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मंगळवारी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास वनरक्षक नियमित गस्त घालत असताना संबंधित बिबट्या मृत अवस्थेत दिसून आला. त्यानंतर घटनेची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. उपवनसंरक्षक हरविर सिंग, सहायक वनसंरक्षक हरीष सरोदे, मानद वन्यजीव रक्षक कौशल्य मिश्रा, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (ऱ्ऊर्ण) चे प्रतिनिधी आशीष गोस्वामी तसेच 'पिपल फॉर ॲनिमल'चे प्रतिनिधी कौस्तुभ गावंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. वनअधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. डी. के. बारापात्रे, डॉ. ज्योती चव्हाण आणि डॉ. अरुण तुराळे यांनी शवविच्छेदन केले. प्राथमिक निरीक्षणानुसार, बिबट्याच्या शरीरावरील जखमांवरून दुसऱ्या बिबट्याशी झालेल्या संघर्षाची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अंतिम अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

शवविच्छेदनानंतर NTCA च्या मार्गदर्शक तत्वांनुसार बिबट्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ही संपूर्ण कार्यवाही उपवनसंरक्षक हरविर सिंग व सहायक वनसंरक्षक हरीष सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी कु. वैशाली भलावी, वनपाल श्री. डेहनकर व वनरक्षक चौखे यांनी पार पाडली.

# खाकी साठी रणांगण सजले ५१३ जणांची धाव; उंची-छातीच्या चाळणीत अनेकांची स्वप्ने धुळीस



**वर्धा जनमाध्यम :** खाकी वर्दीचे स्वप्न डोळ्यांत घेऊन हजारो तरुण मैदानात उतरले आणि पहाटेपासूनच पोलिस भरतीचे रणांगण तापले जिल्ह्यातील १३४ रिक्त पदांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेत बुधवारी (११ फेब्रुवारी) ५१३ उमेदवारांनी मैदानी चाचणी दिली. मात्र उंची आणि छाती मोजणीच्या पहिल्याच चाळणीत अनेकांची स्वप्ने चिरडली गेली.

या भरतीसाठी तब्बल ७३१३ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यात ५३९९ पुरुष, १९१३ महिला आणि एक तृतीयपंथी उमेदवाराचा समावेश आहे. पहाटे ५ वाजताच कागदपत्र तपासणीला सुरुवात झाली. त्यानंतर उंची व छाती मोजणीची कडक अंमलबजावणी करण्यात आली. निकषांमध्ये न बसणाऱ्यांना तत्काळ बाद करण्यात आले. पात्र ठरलेल्या ५१३ उमेदवारांनी १०० मीटर धाव पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर दिली, तर ८०० व १६०० मीटर धाव इंदिरा गांधी उड्डाणपूल ते दत्तपूर टी-पॉईंट या सिमेंट रस्त्यावर घेण्यात आली. श्वास रोखून धावणारे उमेदवार, बाजूला टक लावून पाहणारे पालक आणि तणावाने भरलेले वातावरण खाकीसाठीची ही खरी झुंज ठरली. भरती प्रक्रिया पारदर्शक आणि निर्विघ्न पार पडावी यासाठी तब्बल ७० पोलिस अधिकारी आणि ४०० पोलिस अंमलदार तैनात करण्यात आले होते. कडेकोट बंदोबस्तात संपूर्ण प्रक्रिया पार पडली. खाकीचा सन्मान मिळवण्यासाठी तरुणाईची ही झुंज अजूनही सुरू आहे. पुढील टप्प्यांकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मृत्यूच्या तारांखाली' बांधकाम, ११ केव्ही लाईनचा घातक स्पर्श; तरुण मिस्त्रीचा जागीच अंत

### कोरी शिवारात निष्काळजीपणाचा बळी; विजेच्या धक्क्याने अमोल भस्मे ठार, कुटुंब उघड्यावर



**समुद्रपूर जनमाध्यम :** शेतात फार्महाऊसचे स्लॅब टाकण्याचे काम सुरू वरून थेट ११ केव्हीची विजप्रवाहित लाईन आणि क्षणार्धात काळाने झडप घातली! कोरी (काननकाटी) शिवारात घडलेल्या या भीषण घटनेत मिस्त्री अमोल महादेव भस्मे (वय ३८) यांचा जागीच मृत्यू झाला. निष्काळजीपणा आणि सुरक्षेचा पूर्ण अभाव यामुळे हा बळी गेला का, असा संतप्त सवाल परिसरातून उपस्थित होत आहे.

अशोक झिले (वय ४५) यांच्या शेतात फार्महाऊसचे बांधकाम सुरू होते. स्लॅबसाठी लोखंडी सळई बांधण्याचे काम अमोल भस्मे करत होते. घराच्या अगदी लगतून ११ केव्हीची उच्चदाब वीजवाहिनी गेली आहे. काम सुरू असताना सळईचा स्पर्श थेट विजप्रवाहित तारेला झाला आणि अमोल यांना जबरदस्त विजेचा धक्का बसला. धक्क्याची तीव्रता एवढी भीषण होती की ते क्षणात कोसळले. सहकाऱ्यांनी धाव घेतली मात्र तोपर्यंत सर्व काही संपले होते.

घटनेची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. पुढील तपास ठाणेदार रवींद्र रेवतकर यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल मानकर, प्रकाश मैद व चकोले करीत आहेत.

दरम्यान, उच्चादाब वीजवाहिनीजवळ बांधकाम करताना सुरक्षेची उपाययोजना का करण्यात आली नाही? वीज वितरण कंपनी आणि संबंधित बांधकामदार यांची जबाबदारी काय असे प्रश्न उपस्थित होत आहेत.अमोल भस्मे यांच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले आणि वृद्ध आई असा परिवार आहे. कष्टाच्या घामावर संसार उभा करणारा कर्ता पुरुष एका क्षणात हिरावला गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत्यूच्या तारां खाली सुरू असलेल्या बेफिकीरीचा हा आणखी एक बळी ठरला आहे.

# नागपूर जवळ, म्हणून गांधींच्या कर्मभूमीला उड्डाण नाकारले

## -वर्ध्याच्या स्वप्नांना सरकारचा 'नो एंट्री' बोर्ड

### नागपूर ५० मिनिटांवर असल्याचा दाखला; पालकमंत्री भोयर यांची स्पष्टोक्ती : जिल्ह्यात संतापाची लाट



**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांनी जगाला दिशा देणाऱ्या वर्धा जिल्ह्याला हवाई नकाशावर स्थान देण्याबाबत राज्य सरकारने सध्या तरी हात आखडता घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. नागपूर विमानतळ अवघ्या ५० मिनिटांच्या अंतरावर असल्याने वर्ध्यासाठी स्वतंत्र विमानतळाचा विचार नाही, अशी माहिती पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली. या वक्तव्याने जिल्ह्यात आश्चर्य आणि नाराजीचे वातावरण पसरले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्या कार्यकाळात राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला विमानसेवेशी जोडण्याचा संकल्प जाहीर केला होता. विदर्भातील काही जिल्ह्यांत विमानतळ उभारणीची प्रक्रिया गतीने पार पडली. मात्र, देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या केंद्रस्थानी असलेल्या वर्ध्याच्या वाट्याला अद्याप 'प्रतीक्षा'च आली आहे. सध्या राज्यात नव्या विमानतळांसाठी हालचाली सुरू असल्या तरी वर्ध्याचा त्यात समावेश नसल्याची माहिती समोर आली आहे. जिल्ह्यात कोणतेही अधिकृत सर्वेक्षणही झालेले नाही.

वर्धा म्हणजे केवळ एक जिल्हा नाही, तर तो विचारांचा दीपस्तंभ आहे. सेवाग्राम आश्रम, पवनार येथील परमधाम, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, राष्ट्रभाषा प्रचार समिती, गीताई मंदिर, विश्वशांती स्तूप, बोर व्याघ्र प्रकल्प अशी अनेक स्थळे देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करतात. गांधी-विनोबांच्या कार्याची साक्ष देणाऱ्या या भूमीला थेट हवाई जोडणी मिळाल्यास पर्यटन, शिक्षण, संशोधन आणि औद्योगिक गुंतवणुकीस नवे पंख लाभू शकतात, असा जाणकारांचा ठाम दावा आहे.

मात्र, सरकारचा युक्तिवाद वेगळाच आहे. नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ जवळ असल्याने स्वतंत्र विमानतळाची आवश्यकता नाही, असा सूर अधिकृत पातळीवरून उमटतो आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनीही विमानतळ उभारणीबाबत राज्य शासनाकडून कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत, असे स्पष्ट केले.

दरम्यान, या विषयावर मतमतांतरे तीव्र झाली आहेत. माजी जागतिक बँक सल्लागार श्रीकांत बारहाते यांनी सावध भूमिका घेत, लहान जिल्ह्यासाठी एवढी मोठी गुंतवणूक व्यवहार्य ठरेल का, पर्यटकांची खात्रीशीर संख्या काय, जिल्ह्याच्या प्राथमिक गरजा वेगळ्या असताना भांडवली प्रकल्पाचा मोह टाळला पाहिजे, असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या मते, वर्धा हे केवळ पर्यटनस्थळ नसून गांधी-विनोबांच्या विचारांचे चिंतनकेंद्र आहे आणि विकासाच्या प्राथमिकता वेगळ्या असल्या पाहिजेत.

परंतु, स्थानिक नागरिकांचा सूर वेगळाच आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांना विमानतळ, मग वर्ध्यालाच का दुजाभाव असा प्रश्न उपस्थित होत आहे. नागपूर जवळ असले तरी थेट जोडणीमुळे वेळ, खर्च आणि विकासाच्या संधी वाढतील, असा त्यांचा दावा आहे. औद्योगिक गुंतवणूक, परदेशी संशोधकांची ये-जा आणि पर्यटन वृद्धीसाठी विमानतळ महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो, असे मत व्यापारी व पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधी व्यक्त करीत आहेत.गांधींच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या वर्ध्याला 'उड्डाण' नाकारले जाणे हे केवळ पायाभूत सुविधांचे प्रकरण नाही, तर स्वाभिमानाचाही प्रश्न बनत चालले आहे. सरकारने नागपूरच्या जवळिकीचा दाखला देत निर्णय पुढे ढकलला असला, तरी जिल्ह्याच्या भवितव्यासाठी हा प्रश्न पुन्हा उभा राहणार, हे निश्चित.

वर्ध्याच्या आकाशात विमान कधी झेपावणार की स्वप्नांची धावपट्टी अशीच ओस पडणार हा प्रश्न आता जनतेच्या ओठांवर आहे.

# अंगणवाडीसमोर दारूचा अड्डा; सेलूतील महिलांचा संताप उसळला

## -पोलीस ठाण्यावर धडक, कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**सेलू जनमाध्यम :** शहरातील प्रभाग क्रमांक १, जैसवाल ले-आऊट परिसरात अंगणवाडीसमोरच अवैध दारूविक्री सुरू असल्याच्या आरोपामुळे स्थानिक महिलांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. लहान मुलांच्या शिक्षणाच्या ठिकाणासमोर मद्यपींचा वावर वाढल्याने परिसरातील वातावरण बिघडत असून, महिलांनी थेट पोलीस ठाण्यात जाऊन कारवाईची मागणी केली आहे. तातडीने अड्डा बंद न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

स्थानिकांच्या माहितीनुसार, अंगणवाडीच्या प्रवेशद्वाराजवळ काहीजण खुलेआम मद्यप्राशन करत असल्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. मद्यधुंद अवस्थेतील शिवीगाळ, भांडणे आणि धिंगाण्यामुळे पालक व ज्येष्ठ नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषत: अंगणवाडीत येणाऱ्या चिमुकल्यांवर याचा विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. आम्ही मुलांना शिक्षण व संस्कारासाठी पाठवतो. मात्र अंगणवाडीसमोर सुरू असलेला हा प्रकार अस्वस्थ करणारा आहे. अनेकदा तक्रारी करूनही ठोस कारवाई झालेली नाही, अशी भावना महिलांनी व्यक्त केली. परिसरातील नागरिकांच्या मते, संध्याकाळच्या वेळी मद्यपींची गर्दी वाढते आणि त्यामुळे महिलांना घराबाहेर पडणेही कठीण होते. महिलांनी आज पोलीस ठाण्यात लेखी निवेदन देत अवैध दारूविक्री तातडीने बंद करण्याची मागणी केली. जर प्रशासनाने दुर्लक्ष केले तर आम्ही रस्त्यावर उतरू, असा इशारा देण्यात आला. कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावरच असेल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, पोलीस प्रशासनाकडून या तक्रारींची दखल घेऊन तपास सुरू करण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे. अधिकाऱ्यांनी संबंधित भागात पाहणी करून आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. भरवस्तीत सुरू असलेल्या कथित अवैध दारूविक्रीमुळे सेलू शहरात पुन्हा एकदा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बालकांच्या सुरक्षेचा आणि महिलांच्या सन्मानाचा प्रश्न निर्माण झाल्याने प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ.श्यामराव मोगरे यांचे निधन



**वर्धा जनमाध्यम :** येथील साई मंदिर परिसरातील रहिवासी ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. श्यामराव महादेवराव मोगरे यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ३ च्या सुमारास नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं एक मुलगी स्नुषा जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय सेवेमुळे ते सर्वत्र परिचित होते, त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले, ते डॉ संजय मोगरे यांचे वडील होतं.

## महेश जैन यांचे निधन



**वर्धा-** रामनगर येथील पद्मावती मंदिर परिसर निवासी महेश गडेकर जैन (८१) मूळ निवासी मुलताई यांचे दिनांक ११ फेब्रुवारी सकाळी ९ च्या सुमारास निधन झाले. त्यांची अंतिमयात्रा आज गुरुवारी सकाळी १०, ३० वाजता पद्मावती मंदिर परिसरातून निघेल. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे.


जा, क्रं, ६११/२०२६
दि. ११/०२/२०२६
पत्ता : सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय राजेश नरहरशेट्टीवार यांची इमारत दुसरा माळा, हिरो शोरूमच्या मागे, मोहन नगर नागपूर रोड वर्धा,

## चौकशीची जाहीर नोटीस

**अर्ज कमांक २२/२६ कलम-१९**

**अर्जदार : विशाल प्रकाशराव देशमुख**

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोदणी क्रमांक **श्री विठ्ठल रूखमाई देवस्थान समिती नांदपुर ता.आर्वी ता. जि वर्धा**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त सहाय्यक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत,

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तिवात आहे काय ? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दीष्ठ केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकिची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत : **५५००/- विशाल प्रकाशराव देशमुख अध्यक्ष यांच्याकडे जमा आहे** स्थावर मिळकत (वर्णन)...........

-निरंक

सदरच्या चौकशी प्रकणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व नोंदणी अजचि निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

हि नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी दिली

**अधिक्षक**
**(न्याय शाखा) सार्वजनिक न्यास नोदंणी कार्यालय, वर्धा विभाग वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# सरकारी कार्यक्रमांमध्ये, शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर आता संपूर्ण 'वंदे मातरम्' वाजवणे अनिवार्य

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने वंदे मातरम् संदर्भात बुधवारी सकाळी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. नव्या निर्देशांनुसार, आता सरकारी कार्यक्रमांमध्ये, शाळांमध्ये आणि अनेक महत्त्वाच्या सोहळ्यांमध्ये वंदे मातरम् वाजवणे अनिवार्य असेल. राष्ट्रगीत जन गण मनप्रमाणेच सर्वांनी उभे राहून त्याचा सन्मान करणे बंधनकारक असेल. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या गीताचे संपूर्ण सहा कडवे वाजवले जाणार आहेत. यापैकी चार कडवी १९३७ मध्ये काँग्रेसने वगळली होती. स्वातंत्र्यलढ्यातील या गीताला त्याच्या मूळ स्वरूपात आणि ताकदीसह पुन्हा प्रतिष्ठा मिळवून देण्याचा हा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.केंद्रीय गृह मंत्रालयाच्या नव्या नियमांनुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर लगेच वाजवले जाईल. म्हणजे आधी जन गण मन आणि त्यानंतर वंदे मातरम्. हा नियम सर्व सरकारी कार्यक्रमांमध्ये आणि शाळांमध्ये लागू असेल. मात्र चित्रपटगृहांमध्ये चित्रपटादरम्यान हा नियम लागू होणार नाही. वंदे मातरम् आता पद्म पुरस्कारांसारख्या नागरी सन्मान सोहळ्यांमध्येही वाजवले जाईल. राष्ट्रपतींच्या कोणत्याही कार्यक्रमात त्यांच्या आगमन आणि प्रस्थानाच्या वेळी हे गीत वाजवणे आवश्यक असेल.




तसेच राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांच्या आगमन-प्रस्थानाच्या वेळी, त्यांच्या भाषणापूर्वी आणि नंतरही हा नियम लागू राहील. तिरंगा फडकावण्याच्या प्रसंगीही याचे पालन केले जाईल. गृह मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की हे गीत वाजवले किंवा गायले जात असताना उपस्थित सर्वांनी सावधान मुद्रेत उभे राहावे.१८७५ मध्ये बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी वंदे मातरम् लिहिले, जे १८८२ मध्ये त्यांच्या आनंदमठ या कादंबरीत प्रकाशित झाले. या गीतात एकूण सहा कडवी आहेत. प्रारंभीची कडवी भारतमातेचे वर्णन करतात. पुढील कडव्यांमध्ये दुर्गा, कमला (लक्ष्मी) आणि सरस्वती या हिंदू देवतांचा उल्लेख आहे. १९३७ मध्ये काँग्रेसने फैजपूर अधिवेशनात केवळ पहिली दोन कडवी स्वीकारली होती, कारण काही मुस्लिम सदस्यांनी देवतांच्या उल्लेखावर आक्षेप घेतला होता. आता सरकारने संपूर्ण सहा कडवी वाजवण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यांचा कालावधी सुमारे ३ मिनिटे १० सेकंद इतका आहे.

# राज्यातील प्रशासकीय सुधारणांचा लाभ थेट सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवावा-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील प्रशासकीय कामकाजात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी शासनाने जीपीआर २.० हा महत्त्वाकांक्षी प्रशासकीय सुधारणा उपक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्राच्या या अभिनव उपक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विशेष कौतुक करत देशातील इतर राज्यांनाही याच



## ■ प्रशासकीय सुधारणांचा जीपीआर २.० उपक्रम
## ■ प्रधानमंत्री मोदी यांनी केले महाराष्ट्राचे कौतुक

धर्तीवर कार्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या प्रशासकीय सुधारणांचा प्रत्यक्ष लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने व प्रभावीपणे काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणांबाबत आढावा बैठक पार पडली. या बैठकीस राज्यमंत्री डॉ. पंकज भोईर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागामार्फत जीपीआर २.० उपक्रमाच्या टप्पा एक व टप्पा दोनबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जीपीआर २.० च्या माध्यमातून प्रशासकीय सुधारणांची तर्कशुद्ध व एकात्मिक स्वरूपात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला असून सर्व विभागांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. दुसरा टप्पा १ मे २०२६ पर्यंत पूर्ण होणार असून या सुधारणा अंमलात आल्यानंतर नागरिकांना प्रशासकीय सेवा अधिक सुलभ, जलद व पारदर्शक पद्धतीने मिळतील यासाठी सर्वंकष काम करण्याची आवश्यकता आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या प्रशासकीय सेवा, यंत्रणा विकास, पायाभूत सुविधा तसेच साधनसामग्री यांना भविष्याभिमुख दृष्टीने सक्षम व सुदृढ करणे अत्यावश्यक आहे. जीपीआर २.० च्या माध्यमातून या दिशेने ऐतिहासिक कार्य होत आहे. आगामी पाच ते दहा वर्षे या बदलांसाठी निर्णायक ठरणार असून, त्यानंतरचा काळ या महत्त्वपूर्ण कार्यासाठी शासनाला निश्चितच लक्षात ठेवेल.

**प्रशासकीय सुधारणांच्या जीपीआर २.० उपक्रमाची वैशिष्ट्ये :**

राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांचे सक्षमीकरण :

- केंद्रित सक्षमीकरणाच्या कालबद्ध अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री कार्यालय, माहिती व तंत्रज्ञान विभाग तसेच राज्य माहिती आयुक्त कार्यालयामार्फत देखरेख.
- नागरिकांना प्रशासकीय सेवा सहज, सुलभ व सुव्यवस्थित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सक्षम प्रणालीची उभारणी.
- नागरिकांना सोप्या व दर्जेदार सेवा मिळाव्यात यासाठी नागरिकांची सनद निश्चित करणे.
- नागरिकांसाठी राबविण्यात येणा-या विविध शासकीय योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी.

**सेवा-सुविधांमध्ये सुधारणा :**

- महाडीबीटी आणि आपले सरकार पोर्टलवरील सेवा अधिक सुलभ करण्यासाठी सुधारणा लागू.
- महाडीबीटी २.० अंतर्गत असलेल्या २६३ योजना अंतिम करून जीपीआर २.० मध्ये समाविष्ट.
- आपले सरकार मधील १०७४ सेवांचे सुसूत्रीकरण, तसेच ४२४ प्रमाणित सेवांचे सुव्यवस्थापन.
- १७,६२४ आपले सरकार सेवा केंद्रांमधून उत्कृष्ट सेवा देणा-या केंद्रांची स्मार्ट केंद्र म्हणून निवड

# बारावीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट



## ■ पहिल्याच दिवशी 42 ठिकाणी गैरप्रकारांची नोंद
## ■ पुणे विभागात सर्वाधिक कॉपीची प्रकरणे आढळली

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नउ विभागीय मंडळांमार्फत परीक्षा घेण्यात येत आहेत. मंडळाकडून इयत्ता बारावीच्या प्रमाणपत्र लेखी परीक्षेला मंगळवारपासून सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार राज्यभरात एकूण ४२ कॉपीच्या गैरप्रकाराची नोंद करण्यात आली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत ही संख्या कमी आहे. विभागनिहाय आकडेवारी पाहता, पुणे विभागात सर्वाधिक २० प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. अमरावती विभागात १२, नाशिकमध्ये ४, नागपूरमध्ये १, छत्रपती संभाजीनगरमध्ये ३ आणि लातूर विभागात २ प्रकरणे आढळून आली आहेत. विशेष म्हणजे मुंबई, कोल्हापूर आणि कोकण विभागात एकही गैरमार्ग प्रकरण नोंदलेले नाही. मंडळाकडून परीक्षेदरम्यान कडक उपाययोजना राबवण्यात आल्या होत्या. केंद्र संचालक, पर्यवेक्षक, भरारी पथके तसेच व्हीडीओ निरीक्षण यंत्रणेमुळे परीक्षेतील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यात काही ठिकाणी यश आले पण काही ठिकाणी यश आले नाही.

**बीडमध्ये परीक्षा केंद्रावर कॉप्यांचा सुळसुळाट-**बीड तालुक्यातील चौसाळा येथील आर्टस् अँड सायन्स या परीक्षा केंद्रावर मोठ्या प्रमाणात कॉप्यांचा सुळसुळाट असल्याचे दिसून आले. तरुण मंडळींनी नातेवाईकांना कॉप्या पुरवण्यासाठी कॉलेजच्या बाहेर एकच गर्दी केली होती. एका दृश्यामध्ये परीक्षा केंद्राच्या बाहेरून मोठ्या प्रमाणात काही तरुण कॉलेजमधील विद्यार्थ्यांना कॉपी देत असल्याचे दिसत होते.

**उत्तर महाराष्ट्रात केसेस अधिक**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जैतापूर (ता.कन्नड) इथल्या राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयात सीसीटीव्हीसमोर मास कॉपीची, तर अहिल्यानगर नउ, तर जळगाव जिल्ह्यात चार कॉपीबहाद्दरांवर कारवाईची नोंद घेण्यात आली.

दक्षता समितीच्या आदेशानुसार केंद्रसंचालकासह तब्बल १९ जणांविरोधात कठोर कारवाई करण्यात आली असून, पहिल्याच पेपरला झालेली ही आजपर्यंतची सर्वांत मोठी परीक्षा-संबंधित कारवाई आहे.

**शिक्षणाधिका-यांचा सूचक इशारा**

जिल्ह्यातील गैरप्रकार करणा-या इतर केंद्रांसाठी शिक्षण विभागातून कडक इशारा देण्यात आला आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रत्येक परीक्षा केंद्रावरील हालचालीवर नजर ठेवली जात असून, परीक्षा प्रक्रियेत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे शिक्षण विभागाने म्हटले आहे.

**जळगावात चार कॉपीबहाद्दर**

नाशिक विभागात जळगाव जिल्ह्यात पाचोरा येथे कॉपीची चार प्रकरणे आढळली असून, उर्वरित जिल्ह्यांमध्ये शिक्षण मंडळाला कुठलाही गैरप्रकार आढळून आला नाही. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथे केंद्रावर चार कॉपीबहाद्दर आढळून आले असून, त्-यांच्-यावर कारवाई करण्यात आली आहे.

**अहिल्यानगरमध्ये नउ विद्यार्थ्यांवर कॉपी केस**

अहिल्यानगरमध्ये बारावीच्या परीक्षेत पहिल्या दिवशी जिल्ह्यात नउ विद्यार्थ्यांवर कॉपी केस करण्यात आल्या. पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यात कॉपी केसचे प्रकार आढळले. १ हजार १४३ विद्यार्थ्यांनी दांडी मारली. पाथर्डी तालुक्यात सात कॉपी केस आढळून आल्या. शेवगाव तालुक्यातील दोन विद्यार्थ्यांवर कॉपीप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.



# इंग्रजीच्या पेपरला शिक्षकांकडून कॉपी

## सीसीटीव्हीतून सामूहिक कॉपी उघड

**छत्रपती संभाजीनगर** -इंग्रजीच्या पेपरला शिक्षकांकडून कापी पुरवण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. सीसीटीव्हीतून सामूहिक कापी उघड झाली असल्याचा दावा करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावीच्या परीक्षा केंद्रावर इंग्रजी विषयाच्या परीक्षेदरम्यान धक्कादायक गैरप्रकार उघडकीस आला. पर्यवेक्षक व शिक्षकांनीच विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे पुरवल्याचे सीसीटीव्ही तपासणीत स्पष्ट झाले. अनेक विद्यार्थी एकाच बेंचवर बसून सामूहिक कापी करताना दिसले. तपासणीत एकसारखी उत्तरे असलेले नउ कागद आढळले. या प्रकरणी परीक्षा केंद्रावरील १९ शिक्षक व कर्मचा-यांवर निलंबन व गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका जप्त करण्यात आल्या आहेत.

## लाडकी बहीण योजना :
# ई-केवायसी दुरुस्तीसाठी 31 मार्चपर्यंत मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील ५२ हजार महिलांना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अर्जातील चुका दुरुस्त करण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक महिलांनी अर्ज भरताना कुटुंबातील सदस्यांच्या सरकारी नोकरीबाबत चुकीची माहिती निवडल्याने त्यांचे मानधन थांबले होते. या तांत्रिक चुकांमुळे नोव्हेंबरपासून अनेक लाभार्थींचे हप्ते प्रलंबित आहेत. शासनाने आता ही चूक सुधारण्याची संधी दिली असून, पात्र महिलांनी पोर्टल किंवा सीएससी केंद्रावर ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पूर्ण करणा-या महिलांना नोव्हेंबर ते जानेवारी या तीन महिन्यांचे एकत्रित ४,५०० रुपये मानधन मिळणार आहे. ३१ डिसेंबरची जुनी मुदत संपल्यानंतर आता नवीन मुदतवाढीमुळे जिल्ह्यातील हजारो महिलांना मोठा आधार मिळाला आहे. ही दुरुस्ती प्रक्रिया आधार ऑथेंटिकेशनद्वारे पूर्ण केली जाणार असून अर्जदारांनी अचूक माहिती भरण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




# गोदरेज बिझनेस डिस्ट्रिक्टमध्ये मुंबई कॅम्पस सुरू करण्यासाठी इलिनाय टेकचा सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :**तंत्रज्ञानाचे महत्त्व ओळखून त्यावर लक्ष केंद्रित करणा-या अमेरिकेतील अग्रगण्य संशोधन विद्यापीठांपैकी एक असलेल्या इलिनाय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालाजीने (इलिनाय टेक) आज मुंबईतील आपल्या नवीन कॅम्पसची घोषणा केली. विक्रोळी येथील गोदरेज बिझनेस डिस्ट्रिक्ट येथे हा कॅम्पस असणार आहे. भारतातील सर्वात शाश्वत आणि नावीन्यपूर्णतेवर आधारित विकसित होणा-या शहरी प्रकल्पांपैकी हा एक आहे. यंदाच्या शैक्षणिक सत्रात - ऑगस्ट/सप्टेंबर मध्ये विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचा प्रवेश होणार आहे. इलिनाय टेकचे भारतासोबतचे दीर्घकाळचे संबंध आणि शैक्षणिक उत्कृष्टतेद्वारे जागतिक प्रतिभेला सक्षम करण्याच्या आपल्या दृढ वचनबद्धतेचे प्रतिबिंब म्हणजे कॅम्पससाठी करण्यात आलेली मुंबईची निवड. उद्योगाशी संबंधित अभ्यासक्रम, पदव्या, तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांसह १००हून अधिक कंपन्यांच्या मध्यभागी प्रत्यक्ष कॅम्पस स्थापित करून अनुभवाधारित शिक्षणावर असलेल्या केंद्रावर हे विद्यापीठ जोर देते. भारतीय उद्योगातील एक दिग्गज व्यक्तिमत्व, माजी विद्यार्थी आणि गोदरेज अँड बाईसचे अध्यक्ष



तसेच व्यवस्थापकीय संचालक जमशेद एन. गोदरेज यांच्याशी असलेल्या संबंधांमुळे इलिनाय टेकच्या या निर्णयाला एक पर्सनल टचही आहे. भारतीय विद्यापीठ अनुदान आयोगाने या वर्षीच्या सुरुवातीला देशात पदवी-प्रदान करणारा कॅम्पस स्थापन करण्यासाठी पहिले अमेरिकन विद्यापीठ म्हणून इलिनाय टेकला अधिकृतरित्या ऐतिहासिक मंजुरी दिल्यानंतर, जागेची निवड हे एक महत्त्वपूर्ण पाउल आहे.२०२६च्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचे स्वागत करण्यास सज्ज असलेले मुंबईतील हे नवीन कॅम्पस, काम्प्युटर सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स आणि बिझनेस यांसारख्या जास्त मागणी असलेल्या क्षेत्रांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करून देईल. हे कॅम्पस शिकागोमधील इलिनाय टेकच्या शिक्षणाची ओळख असलेल्या त्याच शैक्षणिकदृष्ट्या कठोर, अनुभवात्मक, बहुविद्याशाखीय आणि उद्योगाशी जोडलेले असे शिक्षण देईल. तसेच भारताच्या गतिमान अर्थव्यवस्थेत विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरच्या संधी उपलब्ध करून देईल.कॅम्पसच्या ठिकाणी आयोजित उद्घाटन तसेच दीपप्रज्वलन समारंभानंतर ही घोषणा करण्यात आली. यात इलिनाय टेक आणि गोदरेज अँड बायस यांनी त्यांच्या सहकार्याला औपचारिक स्वरूप देण्यासाठी सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केली. समारंभानंतर, विद्यापीठातील प्रमुख व्यक्तींनी मुंबईतील एका माहिती सत्रात शाळांचे मुख्याध्यापक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या समुपदेशकांशी संवाद साधला. यावेळी इलिनाय टेक मुंबईतील शैक्षणिक अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया आणि जागतिक शिक्षण माडेलबद्दल माहिती दिली.

# सीबीसीएस पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना उन्हाळी-2026 मध्ये अंतिम परीक्षेची संधी

**मुंबई/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने सीबीसीएस पॅटर्नअंतर्गत शिक्षण घेत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवी अभ्यासक्रमांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० लागू झाल्याने, जुन्या सीबीसीएस पॅटर्नमधील रखडलेल्या विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी-२०२६ ही एक अतिरिक्त व अंतिम परीक्षेची संधी जाहीर करण्यात आली आहे.शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या बी.ए., बी.काम., बी.सि.ए., बी.सी.ए. तसेच बी. व्होक अभ्यासक्रमांच्या ज्या विद्यार्थ्यांच्या तीनही नियमित परीक्षेच्या संधी संपल्यानंतरही एक किंवा अधिक विषयांत अनुत्तीर्ण स्थिती राहिली आहे, अशा विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयामार्फत परीक्षा आवेदनपत्र सादर करणे बंधनकारक असून, नियमित शुल्कासह आवेदनपत्र सादर करण्याची अंतिम मुदत २० फेब्रुवारी ठेवण्यात आली आहे.

# जन्मदात्या आईनेच संपवला मुलगा

## जावयाच्या मदतीने केला खून

**छत्रपती संभाजीनगर-** रक्ताच्या नात्याला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना लासूर स्टेशन परिसरात उघडकीस आली आहे. मुलाच्या सततच्या त्रासाला कंटाळून एका आईनेच त्याच्या हत्येचा कट रचला आणि ३० हजार रुपयांची सुपारी देउन त्याचा काटा काढला. शहानवाजपूर येथील एका विहिरीत आढळलेल्या त्या बेवारस मृतदेहाचे गूढ शिल्लेगाव पोलिसांनी अत्यंत चाणाक्षपणे उकलले आहे. शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे. मुलीचे लग्न झाल्याने ती जमीन आता माझ्या नावावर करून दे असे तो सतत आईला म्हणत होता त्याची आई यासाठी तयार नसल्याने तो सतत आपल्या आईला खूप त्रास देत होता या त्रासाला कंटाळून आईने संजय चा मित्र आणि जावई यांना कुणाची सुपारी दिली त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह पडणे मध्ये बांधून विहिरीत फेकून दिला.जावई कमलसिंग सिंगल राहणार टाकळीवाडी, जावयाचा मित्र गोरख शेकू अहिरे राहणार एकभुर्जी वाघलगाव अशा आरोपींची नावे आहेत. या दोघांना पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.पोलीस अधीक्षक डाक्टर विनय कुमार राठोड अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह उपविभागीय पोलीस अधिकारी डाक्टर निलेश पालवे यांनी तपासाचे निर्देश दिले.


## जाहीर सुचना

**माझे पक्षकार** श्री.नंदकिशोर पु.गुंबळे, **रा.आझाद हिंद मंडळ बुधवारा चौक, अमरावती ता.जि.अमरावती यांनी मला दिलेल्या माहिती, अधिकारावरुन मी पुढीलप्रमाणे सार्वत्रिक जाहीर सूचना संपूर्ण लोकांना देण्यात येत आहे की,**

माझे पक्षकार यांनी वादांकित मालमत्ता मौजे बडनेरा, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.३०१/१ प्लॉट नं.४८/१ ज्याचे एकुण क्षेत्रफळ १३०.६६ चौ.मी.(१४०६ चौ.फुट) ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

**पुर्वेस - रोड**
**पश्चिमेस - सर्व्हीस लाईन**
**उत्तरेस - प्लॉट नं.४८/२**
**दक्षिणेस - प्लॉट नं.४७**

**सदरहू मालमत्तेबाबत मूळ मालक यांनी माझे पक्षकार यांच्यासोबत केलेल्या सौदा व ताबा तसेच भरणा पावतीच्या अधिकाराने माझ्या पक्षकार यांचीच मालकी व ताबा असून त्याबाबत वि.दिवाणी न्यायालय, अमरावती येथे नियमित दि.दावा नं.५८०/२०२२** नंदकिशोर गुंबळे **विरुध्द** जयवंताबाई अधिक ईतर **असा दावा प्रलंबित आहे.**

**करीता या मालमत्तेमध्ये माझे पक्षकार यांचाच ताबा असल्याने सर्व लोकांना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांचे पुर्व परवानगीशिवाय अथवा न्यायालयीन प्रकरण निर्णयांकित झाल्याशिवाय या मालमत्तेबाबत कोणीही कुणाशीही खरेदी-विकी, गहाण, बक्षीस, तसेच भाडेपट्टा व्यवहार अथवा इतर कोणतेही व्यवहार करु नये. असा कोणताही झालेला व्यवहार हा आपोआप पुर्वलक्षमी प्रभावाने गैरकायदेशीर होईल तसेच भविष्यात वर नमुद न्यायालयीन आदेश अशा तिऱ्हाईक व्यक्तीवर सुध्दा बंधनकारक होईल झालेला व्यवहार गैरकायदेशीर समजण्यात येईल. तसेच सदर मालमत्तेचे व्यवहार करणाऱ्यावर दिवाणी व फौजदारी कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी आणि सदर मालमत्तेचा व्यवहार कुणीही कुणाशीही करु नये. करीता जाहीर सुचना प्रकाशित करण्यात येत आहे.**

(ॲड.सागर द.अंजीकर)
**भूमिपुत्र कॉलनी, कॉंग्रेस नगर
अमरावती
मो.९४२३४२६०८९, ७०२०३८०११९**

## जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.५६/२०२६** **ने.ता.१३.०३.२०२६**

अर्जदार : १. **रंजना गजानन नागापुरे,
वय ७० धंदा - मजुरी
रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. अर्जदाराचे वडील नामे** लक्ष्मण श्रावण कंटाळे **रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवाशी होते. त्यांचा मृत्यू दिनांक** १६.०३.२०१५ **रोजी राहते घरी ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे वृध्दापकाळाने झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.५६/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.**

**आज दि.**०४.०२.२०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार**

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय

**आर.एम.जे.सी. क्र.३२३/२०२५** **ने.ता.१८.०२.२०२६**

जाहीरनामा

अर्जदार :
**१. चत्रभूज शामराव राऊत, वय ६९ वर्षे, धंदा - मजुरी
रा.नाय सावंग, पो.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
२. सौ.गुंफा भीमराव उगले, वय अं.७२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वलगांव, ता.जि.अमरावती
३. सौ.प्रमिला बाळासाहेब चतुर, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.सावंगा विठोबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. वंदना राजकुमार अघम, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा.ऋणमोचन, ता.भातकुली, जि.अमरावती
५. सौ.चंदा प्रकाश नितनवरे, वय ३६ वर्षे, धंदा - मजुरी
रा.प्रभू कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

**या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** चत्रभूज शामराव राऊत व ईतर -वि- निरंक **यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता** मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**अर्जदाराचे असे म्हणणे आहे की,** शामराव बागो राऊत **यांचा मृत्यू दिनांक** २५.०२.१९९१ **रोजी व** कौसल्या शामराव राऊत **यांचा मृत्यू दिनांक** १६.१०.२००९ **मौजा** नाय सावंगा, **ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.**

**वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.**

**आज दिनांक १६ माहे जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय,
चांदूर रेल्वे**

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय

**आर.एम.जे.सी. क्र.३१/२०२६** **ने.ता.१३.०३.२०२६**

जाहीरनामा

अर्जदार :
**१. श्रीकृष्ण गौतम मेश्राम, वय ५८ वर्षे, धंदा - मजुरी
रा.शास्त्री वार्ड, हिंगणघाट, ता.हिंगणघाट, जि.वर्धा
२. द्वारका विठ्ठल मेश्राम, वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.खरबी मांडवगड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

**या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** श्रीकृष्ण गौतम मेश्राम व ईतर -वि- निरंक **यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता** मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**अर्जदाराचे असे म्हणणे आहे की,** मनोरमा गौतम मेश्राम **यांचा मृत्यू दिनांक** २६.०५.२००८ **रोजी खरबी मांडवगड, ता.चांदूर रेल्वे जि.अमरावती व** गौतम झिंगुजी मेश्राम **यांचा मृत्यू दिनांक** ११.०१.२०२१ **रोजी मौजा** हिंगणघाट, जि.वर्धा **येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.**

**वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.**

**आज दिनांक १० माहे फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय,
चांदूर रेल्वे**

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## विरोधकांच्या बोंबा

'भारत आणि अमेरिका' यांच्यात व्यापार करार झाला आणि दोन्ही देशांनी संयुक्त पत्रक काढले. अर्थात काँग्रेस आणि विरोधकांनी कराराच्या अटी न वाचताच त्यावर टीका सुरू केली. येत्या काही आठवड्यांत या करारावर औपचारिक स्वाक्षऱ्या केल्या जातील अशी अपेक्षा आहे. अमेरिकेने करारानुसार टैरिफ १८ टक्के आणले आणि भारताने शेती क्षेत्र काही अपवाद वगळता परदेशांसाठी खुले केले. त्यामुळेच विरोधकांची बोंब सुरू झाली. पण केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी स्पष्ट केले, की संपूर्ण शेती क्षेत्र अमेरिकेला खुले केलेले नाही तर काहीच बाबी अशा आहेत, की ज्या अमेरिकन कंपन्या त्यात प्रवेश करू शकतील. एक बाब खरी आहे, की या करारामुळे चहा, कॉफी, मसाले आणि फळफळावळ यांच्या आयातीवर अमेरिका निर्यात शून्य टक्के टैरिफ लावत आहे; परंतु संपूर्ण शेती आणि पशु खाद्य बाजार अमेरिकेच्या हाती सोपवला हे म्हणणे खरे नाही हे पीयूष गोयल यांनी स्पष्ट केले. भारत आणि अमेरिका या ३० आणि ४ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्था आहेत आणि जगात त्यांच्यातील संबंध सर्वांत शक्तिशाली आहेत हे सार्थच आहे. पण जेव्हा भारत २०४७ मध्ये विकसित राष्ट्र होईल तेव्हा भारताची अर्थव्यवस्था ३० ते ३५ ट्रिलियन डॉलर इतक्या गतीने वाढेल आणि याचा अर्थ प्रचंड संधी भारताला आहे, पण हे जरी असले तरी विरोधकांनी ज्या शंका व्यक्त केल्या आहेत त्या अगदीच अनाठायी नाहीत हे सांगावे लागेल. सरकारने भारताच्या हिताबावत समझोता केला आहे, अशी टीका विरोधी पक्षांनी केली आहे. भारतीय शेतकरी, टैरिफ आणि तेल आयातीवर या कराराचा परिणाम होणार आहे हे म्हणजे विरोधकांचे अगदीच चूक नाही. रणदीप सिंग सुर्जेवाला यांनी म्हटले, की भारतातील ७२० दशलक्ष शेतकऱ्यांच्या पोटात या कराराने ठोसा लगादला, ही नाटकीय भाषा सोडली तरीही त्यांच्या म्हणण्यात एक तथ्य आहे आणि ते म्हणजे अमेरिकेच्या मालाने भारतीय बाजारपेठा भरून जातील. पण गोयल यांनी याला सडेतोड उत्तर दिले. वाणिज्य मंत्री गोयल यांनी म्हटले, की सरकार सोयाबीन आणि मका अशा शेतमालाच्या आयातीला परवानगी देणार नाही. शेतकऱ्यांचे नुकसान करणार नाही. पण कच्चा माल वापरून त्यावर प्रक्रिया करून, मूल्यवृद्धी करून पक्का माल बनतो तेव्हा त्या कच्च्या मालाला देशांतर्गत मागणी वाढते. म्हणजे कच्च्या शेतमालाची मागणी घटणार असते. या काही बारीक त्रुटी आहे ज्यावर सरकार मार्ग काढेल अशी आशा आहे. पण या करारामुळे अमेरिकन बाजारपेठेमध्ये भारतीय शेतक-यांच्या मालाला प्रवेश तर मिळेलच पण शेतकऱ्यांना आर्थिक मदतही होईल. काँग्रेसच्या काळात जेव्हा गॅट करार केला होता तेव्हा विकसित देशांच्या हवाली साऱ्या अर्थव्यवस्था केल्या होत्या. तसे तर आज होत नाही. गोयल म्हणतात, त्याप्रमाणे हा भारत-अमेरिका करार त्यांच्या दीर्घकालीन उद्दिष्टांना पुढे नेईल. भारत-अमेरिका कराराचा मत्स्यपालन क्षेत्रासाठी दुहेरी फायदा आहे आणि यामुळे भारतातील विकासाचे नवे मार्ग खुले होतील. जेव्हा सीफूड निर्यातीसाठी ५० टक्के आयात शुल्क होते तेव्हा सरकारने युरोपियन युनियन देशांचे दरवाजे त्यांच्यासाठी उघडले. आता भारताची मासे निर्यात २० टक्क्यांनी वाढली. यातील सर्वात वादग्रस्त मुद्दा आहे तो तेल खरेदीचा, अमेरिकेने रशियाकडून तेल खरेदी कमी करण्याच्या बोलीवरच भारताला ही सवलत दिली. मुळात हा विषय परराष्ट्र मंत्रालय हाताळत आहे. त्यामुळे अमेरिकेकडून कच्चे तेल आयात करणे हे भारताच्या हिताचे आहे. रशिया आणि भारत यांच्यात पूर्वी संबंध सौहार्दपूर्ण होते आणि आजही आहेत, पण प्रत्येक देशाला स्वतःचे हित पाहण्याचा हक्क असतो आणि तेच भारताने केले. रशियाकडून तेल आयात कमी करून, आता अमेरिकेकडून तेल खरेदी करून भारताने तेल आयात कमी केले, परंतु जर ट्रम्प यांनी पुन्हा तेलाचे निमित्त करून टैरिफचा फास आवळला तर भारताकडेही उपाय आहेतच. मोदी यांनी आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अशा योजना सुरू केल्या. त्यावर विरोधकांनी टीका करताना म्हटले, की अमेरिकेच्या हवाली भारतीय शेतकऱ्यांना करताना या योजनांचा बोजवारा उडाला. पण सरकारने यावर तिखट उत्तर दिले. अमेरिकन वस्तू भारतीय बाजारपेठेत येतील पण येथील वस्तूही अमेरिकेत जातीलच. शेतकऱ्यांच्या हिताचे सर्वच राजकीय पक्ष प्रश्न उपस्थित करतात. पण सरकारने त्यावर उपाय शोधला तर मात्र हेच पक्ष टीका करण्यात पुढे असतात, याही बाबतीत असेच आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे, की अमेरिकेने कित्येक भारतीय शेती निर्यातीवरील आयात मूल्य शून्यावर आणले. पंतप्रधान मोदी भारतीय शेतकऱ्यांना झुकू देणार नाहीत आणि अमेरिकेच्या हवाली करणार नाहीत हे स्पष्ट आहे. शेती उत्पादनात पाहिले तर भारताने कोणतेही शेती उत्पादन करारात असे समाविष्ट केले नाही, की ज्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना नुकसान होईल, त्याहीपेक्षा माजी परराष्ट्र सचिव निरूपमा राव यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. भारत-अमेरिका करारामुळे दिल्लीचा फायदा अनेक अर्थांनी होणार ही बाब निश्चितच दुर्लक्षणीय नाही. चीनची दादागिरी त्यामुळे थांबेल, हा करार भारतासाठी महत्त्वाचा आहेच तसे तो अमेरिकेसाठीही होता. या करारामुळे दोन लोकशाही देशांमधील संबंध मजबूत होत आहेत. या करारानंतर ट्रम्प यांनी २५ टक्के टॅरिफ रशियन तेलाच्या आयातीवर लावला होता तो रद्द केला आहे आणि त्यामुळे दोन्ही देशानी आता कराराची चौकट तयार केली. आता इतर वस्तूंवरील १८ टक्के टॅरिफमुळे भारताला व्हिएत्नाम, बांगलादेश आणि चीनसारख्या देशांसोबत स्पर्धात्मक निर्यातीचा फायदा होणार आहे, याचा अर्थ स्पष्ट आहे. हा करार भारताच्या लाभाचा आहे. भारतात या करारामुळे उत्साहपूर्ण वातावरण आहे; परंतु काही ग्रे एरिआ निश्चितच आहेत पण त्यावर येत्या काही आठवड्यात दोन्ही देश मार्ग काढतील.



# जागतिक व्यापारात भारताचा उदय

**जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरतेच्या काळात भारत हा मोठा बाजार राहिलेला नाही, तर तो विश्वासार्ह जागतिक पुरवठा केंद्र म्हणून पुढे आला आहे. ही ओळख अचानक मिळालेली नसून, दीर्घकालीन धोरणात्मक बदलांची ती फलश्रुती आहे.**

गेल्या काही वर्षांत भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेत मूलभूत बदल झाला आहे. एकेकाळी स्वस्त श्रम आणि उदयोन्मुख बाजार या चौकटीत अडकलेला भारत आज जागतिक पुरवठा साखळीतील निर्णायक घटक म्हणून पाहिला जातो आहे. अमेरिका, युरोप, जपान, आखाती देश या सर्वांच्या धोरणांमध्ये भारत हा पर्याय नाही, तर अपरिहार्य भाग बनत चालला आहे. व्यापार करार, कूटनीती, पायाभूत सुविधा, उत्पादन क्षमता आणि राजकीय स्थैर्य यांच्या एकत्रित परिणामातून भारताने ही नवी ओळख मिळवली आहे. आजचा भारत आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर वेगळ्या उंचीवर उभा आहे. ही उंची लोकसंख्या, भूगोल किंवा बाजाराच्या आकारामुळे प्राप्त झालेली नाही. तर ती भारताने सातत्याने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांमुळे मिळालेली आहे. जागतिक अर्थव्यवस्था अस्थिरतेत अडकलेली असताना, भारत हा स्थैर्याचा आधार ठरतो आहे. याच कारणामुळे भारताचे महत्त्व व्यापारापुरते मर्यादित न राहता, धोरणात्मक आणि भू-राजकीय पातळीवर वाढले आहे.

जागतिक पुरवठा साखळीतील ताणतणाव हा या बदलाचा केंद्रबिंदू. कोरोना महामारीनंतर एकाच देशावर अवलंबून असलेल्या उत्पादन साखळ्यांची मर्यादा जगासमोर उघडी पडली. चीनकेंद्रित उत्पादन मॉडेल जोखमीचे ठरू लागले. त्याचवेळी अमेरिका-चीन संघर्ष, युक्रेन युद्ध, तांबड्या समुद्रातील तणाव, यामुळे पुरवठा साखळी अधिकच अस्थिर झाली. अशावेळी जगाला सक्षम पर्याय हवा होता आणि तो पर्याय म्हणून भारत जागतिक नकाशावर पुढे आला. भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची विविधता आणि प्रमाण. उत्पादन क्षेत्रात भारत आज इलेक्ट्रॉनिक्स, औषधे, वाहन उद्योग, रसायने, अभियांत्रिकी वस्तू, संरक्षण उपकरणे अशा अनेक क्षेत्रांत जागतिक पुरवठादार म्हणून उभा राहत आहे. औषधनिर्मितीत भारत आधीच जगाची फार्मसी म्हणून ओळखला जातो. आता इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर क्षेत्रातही भारत दीर्घकालीन गुंतवणुकीचे केंद्र बनत आहे.

या बदलामागे निव्वळ उद्योगांचा प्रयत्न नाही, तर राज्यकर्त्यांची स्पष्ट दिशा आणि धोरणे आहेत. उत्पादनाशी जोडलेली प्रोत्साहन योजना, पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक, बंदरांची क्षमतावाढ, लॉजिस्टिक खर्चात घट या सगळ्यांचा एकत्रित परिणाम भारताच्या बाजूने आहे. जागतिक कंपन्यांसाठी भारत हा स्वस्त पर्याय नव्हे, तर सुरक्षित आणि दीर्घकालीन भागीदार ठरतो आहे. भारताचा वाढलेला आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा दुसरा पैलू म्हणजे कूटनीती. भारताने कोणत्याही एका गटाशी पूर्णतः बांधील न राहता, बहुपर्यायी संबंध जोपासले. अमेरिका, युरोप, रशिया, आशिया, आफ्रिका या सर्वांशी संवाद कायम ठेवत भारताने स्वतःला 'स्विंग पॉवर' म्हणून सिद्ध केले. त्यामुळे जागतिक निर्णय प्रक्रियेत भारताकडे दुर्लक्ष करणे आता कोणालाही परवडणारे राहिलेले नाही. याच पार्श्वभूमीवर भारत-अमेरिका व्यापार कराराकडे पाहावे लागेल. अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क कमी करणे हा आर्थिक निर्णय नव्हता. तो भारताच्या वाढत्या महत्त्वाची दिलेली अप्रत्यक्ष कबुली होती. युरोपशी करार करून भारताने अमेरिकेला स्पष्ट संकेत दिला की, भारताकडे पर्याय उपलब्ध आहेत. या बदललेल्या वास्तवामुळे अमेरिकेला माघार घ्यावी लागली.

युरोपसाठीही भारताचे महत्त्व झपाट्याने वाढले आहे. हरित संक्रमण, डिजिटल अर्थव्यवस्था, डेटा संरक्षण, उच्च दर्जाचे उत्पादन या सर्व क्षेत्रांत युरोपला विश्वासार्ह भागीदार हवा आहे. चीनवरील अवलंबन कमी करण्याचा युरोपचा प्रयत्न भारताच्या बाजूने गेला. त्यामुळे भारत-युरोप संबंध केवळ व्यापारापुरते न राहता, धोरणात्मक भागीदारीकडे झुकले आहेत. जागतिक आर्थिक संस्थांची आकडेवारीही या बदलाची साक्ष देते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार, जागतिकवाढीचा मोठा हिस्सा पुढील दशकात आशियातून येणार आहे आणि त्यात भारताची भूमिका निर्णायक असेल. अमेरिका आणि युरोप स्थिर वाढीच्या टप्प्यात असताना, भारत वेगवान वाढीचा केंद्रबिंदू ठरतो आहे. हीच बाब जागतिक गुंतवणूकदारांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलते आहे.

भारताचे जागतिक पुरवठा केंद्र म्हणून महत्त्व वाढत असताना, एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आणि ती म्हणजे, भारत हा उत्पादन करणारा देश म्हणून मर्यादित राहिलेला नाही, तर तो मूल्यनिर्मिती करणारा देश बनतो आहे. संशोधन, डिझाईन, सेवा, तंत्रज्ञान आणि उत्पादन यांचा संगम भारतात होत आहे. यामुळे भारताची भूमिका केवळ 'बॅकएंड'पुरती मर्यादित राहत नाही. अर्थात, या नव्या ओळखीबरोबर भारतासमोरील आव्हानेही वाढली आहेत. जागतिक पुरवठा केंद्र बनणे म्हणजे सातत्याने गुणवत्ता, वेळेची शिस्त, नियमपालन आणि पर्यावरणीय जबाबदारी पाळणे. भारताला हे आव्हान स्वीकारावे लागेल. सवलतींवर आधारित स्पर्धा दीर्घकाळ टिकत नाही; उत्पादकता आणि नवोन्मेष हाच खरा मार्ग आहे. तरीही, आजचा भारत आत्मविश्वासाने पुढे जात आहे. जागतिक व्यापारात भारताकडे आता 'मागणारा' म्हणून पाहिले जात नाही; तो 'अटी ठरवणारा' घटक बनतो आहे. हीच भारताच्या वाढलेल्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाची खरी ओळख आहे.

भारत आज केवळ उदयोन्मुख अर्थव्यवस्था राहिलेला नाही; तो जागतिक पुरवठा साखळीचा विश्वासार्ह कणा बनतो आहे. अमेरिका, युरोप आणि इतर शक्तींना भारताशी करार करावे लागत आहेत; कारण पर्याय कमी होत चालले आहेत. ही स्थिती भारताला मिळालेली संधी आहे. धोरणात्मक शहाणपण, स्थैर्य आणि दीर्घकालीन दृष्टिकोन राखला, तर भारत ही नवी ओळख टिकवू शकतो. जागतिक व्यासपीठावर भारताने आता फक्त उपस्थित राहायचे नाही; दिशा ठरवायची आहे आणि तो क्षण आता आलेला आहे. भारत-युरोप-अमेरिका या त्रिकोणात भारत आता केंद्रस्थानी आला आहे. जागतिक पुरवठा साखळीला स्थैर्य देणारा, पर्याय उभे करणारा आणि अटी ठरवणारा देश म्हणून भारताची ओळख पक्की होत चालली आहे.

**संजीव ओक**

# भाजपाच नंबर वन!

महाराष्ट्रातील जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपाने पुन्हा एकदा बाजी मारली आहे.शहरी आणि नीमशहरी भागातच भाजपाची ताकद असल्याचा आजवरचा समज, भाजपाने, जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत चांगली कामगिरी करून खोटा ठरवला आहे.जिल्हापरिषदेच्या एकूण ७३१ जागांपैकी २२५ जागा जिंकून भाजपाने आपण महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष असल्याचे सिद्ध केले आहेच शिवाय ग्रामीण भागातही आपली ताकद वाढल्याचे या निमित्ताने दाखवून दिले आहे.पंचायत समितीच्या एकूण १४६२ जागांपैकी ४५९ जागा जिंकून, भाजपाने आपली पाळेमुळे तळागाळापर्यंत पोहोचल्याचे सिद्ध केले आहे.

शिवसेनेनेही या निवडणुकीत चांगली कामगिरी केली आहे.शिवसेनेने जिल्हापरिषद निवडणुकीत १६२ जागा जिंकून, शिवसेना उबाठाला बरेच मागे टाकले आहे.शिवसेना उबाठाला जिल्हापरिषद निवडणुकीत फक्त ४३ जागा जिंकता आल्या आहे.त्या निमित्ताने शिंदेंची शिवसेना हीच खरी शिवसेना असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.पंचायत समिती निवडणुकीत शिवसेनेला ३०२ जागा मिळाल्या आहेत,तर त्या तुलनेत शिवसेना उबाठाला ८९ जागा मिळाल्या असून, पंचायत समितीच्या निवडणुकांतही शिंदेंच्या शिवसेनेने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादीने नेत्रदीपक कामगिरी केली आहे.जिल्हापरिषद निवडणुकीत राष्ट्रवादीने १६५ जागा जिंकल्या असून महायुतीमध्ये दुसरा क्रमांक पटकावला आहे,तर पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादीने ३०६ जागा जिंकून तेथेही दुसरा क्रमांक पटकावला आहे.राष्ट्रवादी आणि राष्ट्रवादी (शप) यांनी एकत्र येऊन वरील निवडणुका लढवल्या होत्या,त्याचा फायदा दोन्ही पक्षांना झालेला दिसत आहे.

राष्ट्रवादी (शप) ची महानगर पालिका निवडणुकीत झालेली घसरगुंडी, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही कायम राहिली आहे.जिल्हापरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (शप ) ला केवळ २६ जागांवर विजय मिळाला असून, आपल्या बालेकिल्ल्यांत पक्षाची धुळधाण उडाली आहे.पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी (शप) ला फक्त ४६ जागांवर विजय मिळाला असून, नजिकच्या भविष्यात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे विलिनीकरण झाले नाही तर राष्ट्रवादी (शप) चे भवितव्य धोक्यात येऊ शकेल.काँग्रेसला जिल्हापरिषद निवडणुकीत ५५ जागा मिळाल्या आहेत,तर पंचायत समितीच्या निवडणुकीत ९७ जागा मिळाल्या आहेत.काँग्रेसची ही कामगिरी पक्षाची चिंता वाढवणारी आहे.विशेषत: पश्चिम महाराष्ट्र,या आपल्या बालेकिल्ल्यात, काँग्रेसची कामगिरी चांगली झालेली नाही.लातूरमध्ये काँग्रेसने आपले प्रभुत्व कायम राखले आहे.

१२ जिल्हापरिषदांकरता झालेल्या निवडणुकीत, भाजपाने ७ जिल्हापरिषदांमध्ये वर्चस्व प्रस्थापित केले आहे.१२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपाने ५२ पंचायत समित्यांवर आपला झेंडा फडकावला आहे.त्या खालोखाल शिवसेना २६ , राष्ट्रवादी २५ , कॉंग्रेस ८ आणि शिवसेना उबाठाने ५ जागा जिंकल्या आहेत.जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचा आढावा घेतला तर एक गोष्ट ठळकपणे दिसून आली आहे,ती म्हणजे भाजपाने या निवडणुकीत सर्वंकष यश मिळवले आहे. विशेषत: पश्चिम महाराष्ट्र आणि इतरत्र सहकार क्षेत्रामध्ये असलेल्या आपल्या वर्चस्वाच्या जोरावर, राष्ट्रवादी आणि काँग्रेस हे पक्ष त्याठिकाणी आजवर निरनिराळ्या निवडणुकांत आपले वर्चस्व राखून होते, मात्र या खेपेच्या जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपाने त्यांच्या वर्चस्वाला सुरुंग लावलेला दिसत आहे.

शिवसेना उबाठाची, जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतील कामगिरी अतिशय निराशाजनक झाली असली तरी त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नव्हते.या निवडणुकांत शिवसेना उबाठाने आपल्या स्थानिक नेत्यांवर, निवडणुक प्रचाराची सारी जबाबदारी सोपवली होती.शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे हे तिकडे फिरकलेही नाहीत, यावरुन पक्षाने या निवडणुका गंभीरपणे घेतल्या नाहीत ही गोष्ट पुरेशी अधोरेखित झाली.महानगरपालिका निवडणुकीतही शिवसेना उबाठाने आपले लक्ष प्रामुख्याने मुंबई महानगरपालिका निवडणुकीवर केंद्रित केले होते, त्याचा तोटा त्यांना महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका निवडणुकीत सोसावा लागला



होता.महानगरपालिकांतील एकूण २८६९ जागांपैकी केवळ १५५ जागांवर शिवसेना उबाठाला विजय मिळाला होता.जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका गांभीर्याने लढवण्याबाबत शिवसेना उबाठाच्या नेतृत्वाने दाखवलेली उदासीनता एक दिवस पक्षाच्या मुळावर येऊ शकेल.गेल्या काही दिवसांत झालेल्या निरनिराळ्या निवडणुकांत विरोधी पक्षांनी जी खराब कामगिरी केली आहे ती विरोधी पक्षांच्या अस्तित्वाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.या निवडणुकांत खरी लढत ही महायुतीमधील घटक पक्षांमध्येच झाल्याचे प्रकर्षाने दिसून आले आहे.महाराष्ट्रातील विरोधी पक्षांसाठी ही बाब काळजी करण्यासारखी आहे.

**अभय गोखले**

# संवाद

## विश्वामित्राची प्रतिभा लाभलेले पू. गोळवलकर गुरुजी

१३ फेब्रुवारी हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक पूजनीय माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी यांचा जयंतीदिन. स्वातंत्र्योत्तर भारताच्या राष्ट्रीय जीवनाला दिशा देणाऱ्या या थोर विचारवंताने संपूर्ण आयुष्य राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले.ज्येष्ठ पत्रकार अरविंद विठ्ठल कुलकर्णी यांनी गुरुजींचे वर्णन करताना त्यांना 'विश्वामित्रांच्या प्रतिभेने आणि तपश्चर्येने हिंदू समाजाची नवी सृष्टी घडविणारा संन्यासी' असे म्हटले आहे. गुरुजी हे केवळ संघटक नव्हते, तर समाज, राष्ट्र आणि संस्कृती यांचा सखोल अभ्यास करणारे दूरदर्शी विचारवंत होते.राजधानी दिल्लीहून प्रकाशित होणाऱ्या 'मदरलॅण्ड' या नियतकालिकाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी राष्ट्रशक्तीचे मूलभूत सूत्र स्पष्ट केले. राष्ट्र एकसंध राहण्यासाठी एकविधता नव्हे, तर समरसता आवश्यक आहे, असे ते ठामपणे सांगतात. सर्वजण एकसारखे असणे ही भारताची संकल्पना नाही; विविधता स्वीकारून एकतेने नांदणे हीच आपल्या राष्ट्राची खरी ताकद आहे. निसर्गालाच एकविधता मान्य नाही; मात्र विविधता राष्ट्रविनाशाकडे नेणारी नसावी, हा त्यांचा ठाम विचार होता.पू. गोळवलकर गुरुजींचे विचार आजही तितकेच कालसुसंगत आहेत. समरसता, राष्ट्रनिष्ठा आणि निस्वार्थ सेवा या मूल्यांची आठवण करून देणारा त्यांचा जयंतीदिन प्रत्येक भारतीयाला आत्मचिंतनाची संधी देणारा आहे.

**रमा देशमुख,** नागपूर

## 'एआय'च्या गैरवापर

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आपल्या दैनंदिन जीवनात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान हे जितके सुखदायक आणि उपकारक ठरले आहे तितकेच 'एआय'च्या आक्षेपार्ह गैरवापरामुळे नवनवीन सामाजिक समस्यांना तोंड फुटले आहे. 'एआय'चा वापर करून सोशल मीडियावरून अश्लील आणि आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केला जातो. विशेषतः अशा मजकुराद्वारे महिला आणि लहान मुले यांना लक्ष्य केले जाते. यावर प्रतिबंध आणण्यासाठी केंद्र सरकारने कडक पावले उचलली असून माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ यामध्ये सुधारणा केली आहे आणि माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया नीतिमत्ता संहिता) सुधारणा नियम, २०२६ जारी केले आहेत. येत्या २० फेब्रुवारी २०२६ पासून ते अंमलात येणार आहेत. या नव्या नियमांनुसार आक्षेपार्ह मजकूर काढून टाकण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना आता केवळ ३ तासांची मुदत दिली जाणार आहे. 'एआय' निर्मित प्रत्येक छायाचित्र, ऑडिओ किंवा व्हिडिओवर स्पष्ट लेबल असणे अनिवार्य केले आहे. कोणताही आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध झाल्यास त्यासाठी संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला जबाबदार धरले जाईल.डिजिटल व्यवहारातील सुरक्षितता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी तसेच 'एआय'चा होणारा गैरवापर टाळण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेला निर्णय योग्य असून स्वागतार्ह आहे.

**-प्रदीप मोरे**

## देशाची सामाजिक व्यवस्था

एकीकडे देशाच्या सर्व भागांचा विकास होत असल्याच्या घोषणा केल्या जात असताना प्रदूषणावर लोकसंरक्षण होऊ शकणाऱ्या योजनांवर लक्ष आणि निधी खर्च केला जात नसल्याने प्रदूषणामुळे निर्माण होणारे श्वसन, फुफ्फुसांचे हृदयविकार, मेंदूंचे विकार इत्यादींवर आवश्यक असलेले उपचार करण्यात विलंब, चालढकल होत असते. स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठ्याच्या योजना अंमलात आणल्या जात नाहीत. अशा प्रकारच्या दुर्लक्षामुळे समाज घटक अधिक दुर्बल होऊन आरोग्याच्या दृष्टीने जास्त आरोग्य गमावून बसतात.शिक्षणाच्या विषयावर जेंव्हा विचार केला जातो तेव्हा मूल शिक्षण ग्रामीण भागात सहजासहजी उपलब्ध होऊ शकत नाही असे दिसून येते, मात्र त्याचवेळी ग्रामीण, भागात उच्च शिक्षण देणाऱ्या शाळा कॉलेजेसची उपलब्धता ,संख्या, वाढत असल्याची माहिती सर्वत्र उपलब्ध केली जाते. ग्रामीण भागात मूलभूत शिक्षण न मिळाल्याने ग्रामीण भागातील बालके मूलभूत शिक्षणापासून दूर राहतात सुधारित आणि उच्च ठिकाणी राहणारी बालके पुढील शिक्षणातून मूल ,उच्च पूर्ण करतात.अशाने समाजात शैक्षणिक दूरी निर्माण होते. हे होणारे दुर्लक्ष समाजात शिक्षणाची, उत्पन्नाची प्रगती असमतोल होत जात

**स्नेहा राज**

## मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष

देशात तसेच महाराष्ट्र राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात सर्वसामान्यांना शुद्ध हवा, शुद्ध पर्यावरण, उत्तम आरोग्य व्यवस्था, परवडणारे शालेय शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण, स्वच्छ परिसर, खेळ मैदान, सांडपाणी व्यवस्था आणि चांगल्या दर्जाचे उत्तम रस्ते, या मूलभूत सोयी उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु आज सर्वत्र ठिकाणी पाहिल्यास एकंदरीत चित्र समाधानकारक नाही आणि ही आजची वस्तुस्थिती आहे. महानगरातील किंवा मोठ्या शहरातील काही भाग सोडल्यास या मूलभूत सोयीची कमतरता मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात. महाराष्ट्रातल्या जवळपास प्रत्येक शहरामध्ये तसेच ग्रामीण भागात या मूलभूत समस्या विळखा घालून बसली आहे. राज्यात भरपूर पाऊस पडून देखील पुरेसे शुद्ध पुण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. आणि त्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्या त्या भागातल्या नद्यांच्या बाबतीत अक्षम्य उदासीनता दाखवली जात आहे. नद्यांचे संवर्धन करणे तर दूरच परंतु सद्य स्थितीत आहे त्या त्या नद्या प्रवाही राहतील, तिथला पाणीपुरवठा शुद्ध आणि पिण्यायोग्य राहील याचीदेखील संवेदनशीलतेने कधीच काळजी घेतली जात नाही. राज्यात ज्या ज्या वेळी नागरिकांच्या दैनंदिन समस्यांचा प्रश्न निर्माण होतो. त्यावेळी तात्पुरती उत्तरे देऊन वेळ मारून नेली जाते.

**प्रा. मधुकर चुटे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# जनतेचा पैसा उधळू देणार नाही..!

## अन्यथा काँग्रेसचा आदोलनाचा इशारा ; गटनेत्या वैशाली सवाई यांची सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : यवतमाळ नगरपरिषदेच्या ९ फेब्रुवारी रोजी झालेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेत जनहितापेक्षा ठेकेदारांच्या हिताला प्राधान्य देण्यात आल्याचा आरोप करत काँग्रेसने सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. जनतेच्या पैशाची उधळपट्टी खपवून घेतली जाणार नाही. आवश्यक असल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा काँग्रेस गटनेत्या वैशाली सवाई यांनी पत्रकार परिषदेत दिला.



तांत्रिक कारणांमुळे सभा केवळ दोन विषयांवर तहकूब करण्यात आली असली तरी सत्ताधाऱ्यांचा कल स्पष्टपणे ठेकेदार धार्जिणा असल्याचे दिसून येते. असा आरोप त्यांनी केला. शहरातील रस्ते, दिवाबत्ती, सांडपाणी निचरा, वाढती भटकी कुत्री समस्या, अल्पसंख्यांक वस्तीसाठीच्या निधीचा वापर, कंत्राटी सफाई कामगारांची नेमणूक, न.प. शाळा खाजगी संस्थांना देण्याचा निर्णय अशा मूलभूत प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे त्या म्हणाल्या. सभेपूर्वी मांडलेल्या विकास मुद्द्यांवर दोन महिने उलटूनही मुख्याधिकाऱ्यांकडून उत्तर मिळाले नसल्याची खंत व्यक्त करत त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नगरपरिषदेतील जुने सागवान फर्निचर विक्रीप्रकरणी परवानगी व निधीचा तपशील जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली. जांब रोडवरील 'नमो उद्यान' प्रकल्पासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असली तरी शहराच्या टोकाला उद्यान उभारण्याला काँग्रेसचा विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.उद्यान व्हावे, पण शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी, अशी भूमिका त्यांनी मांडली. दहा सुरक्षा रक्षकांसाठी दरमहा २८ हजार रुपये मानधनाचे टेंडर, सार्वजनिक शौचालय दुरुस्तीसाठी १ कोटी ८८ लाखांचा खर्च असूनही प्रत्यक्षात काम न झाल्याचा आरोप, तसेच कुत्रे पकड मोहिमेत केवळ एक कुत्रा पकडून ५० लाख खर्च दाखवल्याचा गंभीर आरोप त्यांनी पुराव्यासह केला.

### आंदोलनाचा इशारा

सत्ताधाऱ्यांनी विकास व जनहिताचे मुद्दे अजेंड्यावर न घेतल्यास आठ ते दहा दिवसांत नगरपरिषदेसमोर धरणे आंदोलन, आमरण उपोषण आदी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा गटनेत्या वैशाली सवाई यांनी दिला आहे.

"बहुमताच्या जोरावर विषय मंजूर करून घेणे वेगळे आणि जनतेच्या हिताचे निर्णय घेणे वेगळे," असा टोला लगावत काँग्रेस सत्ताधाऱ्यांना जाब विचारत राहील, असे त्यांनी ठामपणे सांगितले. पत्रकार परिषदेला प्रा.बबलू देशमुख, अमृता तिवारी, साधना शंभरकर, तबमुन शहा, वनिता बडे, शाईन मोहम्मद नईम, विलास पावडे आदी उपस्थित होते.

# टिपेश्वर ई.एस.झेड.पेटलं;आता जबाबदार कोण?

## बेकायदेशीर रिसॉर्ट्सवर गुन्हे दाखल करण्याची मागणी तीव्र

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा : यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातील टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यालगतच्या इको सेन्सिटिव्ह झोन (ई.एस.झेड.) क्षेत्रातील कथित बेकायदेशीर रिसॉर्ट्सचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सुन्ना गेटलगत एका रिसॉर्टला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर अंकित बबनराव नैताम (जिल्हा उपाध्यक्ष, यवतमाळ जिल्हा ट्रायबल फोरम तथा संचालक, पर्यावरण स्वास्थ संस्था) यांनी पांढरकवडा पोलीस स्टेशन येथे ठाणेदारांकडे अधिकृत लेखी तक्रार दाखल केली आहे. इको सेन्सिटिव्ह झोनमधील सर्व कथित बेकायदेशीर रिसॉर्ट मालकांवर फौजदारी गुन्हे नोंद करण्याची ठाम मागणी त्यांनी केली आहे.



तक्रारीत नैताम यांनी नमूद केले आहे की, केंद्र शासनाची दि. १७ जानेवारी २०१६ ची ई.एस. झेड. अधिसूचना तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचा दि. ३ जून २०२२ चा आदेश संरक्षित क्षेत्राभोवती एक किमी परिसरात विविध निर्बंध स्पष्ट करतो. अशा परिस्थितीत जर त्या क्षेत्रात व्यावसायिक रिसॉर्ट्स उभारले गेले असतील, तर ती कायद्याची सरळ पायमल्ली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, दि. ९ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडेही याच संदर्भात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी संबंधित रिसॉर्टला आग लागल्याची घटना घडली. त्यामुळे "तक्रारीनंतरही प्रशासनाने योग्य वेळी दखल घेतली का?" असा सवाल उपस्थित होत आहे.

इको सेन्सिटिव्ह झोन क्षेत्रातील सर्व रिसॉर्ट्सची तात्काळ व सखोल चौकशी करावी. आवश्यक पर्यावरणीय व प्रशासकीय परवानग्या नसलेल्या प्रकल्पधारकांवर गुन्हे नोंद करावेत. आगीच्या घटनेतील जबाबदारांवर कठोर कारवाई करावी. पर्यावरण व वन्यजीव सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या व्यावसायिक उपक्रमांवर तत्काळ स्थगिती द्यावी. नैताम यांनी पुढील मागण्या केल्या आहेत. "पर्यावरण, वन्यजीव आणि स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित प्रश्नांवर कुठलीही तडजोड होऊ शकत नाही. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे," असा स्पष्ट इशारा अंकित नैताम यांनी दिला आहे. टिपेश्वर ई.एस.झेड.प्रकरण आता कायद्याच्या कसोटीवर आले असून पांढरकवडा पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन पुढे कोणती भूमिका घेतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# • वेचक

## खुर्चीच्या वादातून कंत्राटी कर्मचाऱ्यांत फ्री-स्टाइल

दिग्रस : येथील पंचायत समितीच्या आस्थापना विभागात दोन कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये शुल्लक कारणावरून फ्री स्टाईल झाली. एका कंत्राटी ग्रामविकास अधिकाऱ्याने बाहेरील मित्र व नातेवाईकांना बोलावून सहकाऱ्याला कार्यालयाबाहेर मारहाण केली. यामुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दिग्रस पंचायत समिती येथे आस्थापना विभागात एक कंत्राटी ग्रामविकास अधिकारी खुर्चीवर बसून असताना, दुसऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याने मला संगणकावर काम करायचे आहे, खुर्चीवरून उठा, असे म्हटले. यावरून दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. उपस्थित कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून वाद शांत केला. मात्र, याचा राग मनात धरून संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्याने काही वेळातच आपले मित्र व नातेवाईकांना कार्यालयात बोलावून घेतले. बाहेरून आलेल्या टोळक्याने संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्याला कार्यालयाच्या बाहेर बोलावले आणि सर्वांसमोर बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. हा 'ऑन द स्पॉट' थरार पाहून पंचायत समितीमध्ये कामानिमित्त आलेल्या नागरिकांची पळापळ झाली. अखेर काही सुज्ञ नागरिकांनी मध्यस्थी करत भांडण सोडवले. या घटनेमुळे पंचायत समितीच्या शिस्तीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तो ग्रामविकास अधिकारी कार्यालयात मद्यपान करून येतो, अशीही चर्चा आहे. तसेच, आस्थापना विभागात खासगी कामासाठी कंत्राटी कर्मचारी ठेवण्यास कोणी परवानगी दिली, असाही सवाल उपस्थित केला जात आहे. या ग्रामविकास अधिकाऱ्यावर पं. स. प्रशासन काय कारवाई करणार, याकडे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचा जिल्हा दौरा

यवतमाळ - महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर हे गुरुवारी दि. १२ फेब्रुवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दुपारी ३ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन, दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या प्रश्नांबाबत आढावा बैठक, सायं ६ वाजता सफाई कर्मचाऱ्यांसमवेत भेट व चर्चा, त्यानंतर नागपूरकडे प्रयाण करतील.

## दराटी पोलिसांची अवैध धंद्यांविरोधात कारवाई

कुरळी : दराटी पोलिस ठाण्याच्या हद्दीत नव्याने रुजू झालेले ठाणेदार प्रसन्नजीत जाधव यांनी अवैध व्यवसाय व असामाजिक तत्वांच्या विरोधात धडक कारवाई सुरू केल्याने दराटी पोलीस अवैध धंद्यांविरोधात ॲक्शन मोडवर आले आहे. दराटी पोलिस ठाण्यांतर्गत २२ गावांचा समावेश असून यामध्ये दराटी, कुरळी, भवानी, कोरटा, वालतूर, बंदी टाकळी व खरबी या मोठ्या संख्येच्या तसेच संवेदनशील ओळख असलेल्या गावांचा समावेश आहे. गत काही दिवसापासून नियुक्त झालेले ठाणेदार प्रसेनजित जाधव यांनी पोलीस स्टेशन दराटी येथील ठाणेदारपदाचा कार्यभार घेताच पहिल्या दिवशी धाड टाकुन एकूण ११.७१७ कि.ग्रॅ. वजन असलेल्या गांजाचा एक लाख ८७ हजार ४७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीस अटक केली. बेकायदेशीररित्या धारदार शस्त्र लोखंडी तलवार बाळगणारा युवकास अटक केली. अवैध जुगार चालविणाऱ्या १५ जणांवर कारवाई केली. कोरटा येथे धाड टाकून सन २०२५ या काळात एकूण दोन कारवाया करीत दोन्ही गुन्ह्यात ७४.५२९ कि.ग्रॅ. वजन असलेल्या गांजाचा ११लाख ९२ हजार ४६४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यामुळे अवैध धंदे वाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

## पुन्हा वातावरण बदलणार, घ्यावी लागेल खास काळजी

यवतमाळ : उत्तर भारतासह देशातील अनेक भागांमध्ये वाऱ्यातील गारठा कायम आहे. या गारठ्यामुळे थेट आरोग्यावर परिणाम झाला आहे. आजाराचे प्रमाण वाढले आहे. फेब्रुवारी मध्यानंतर जिल्ह्यात उन्हाचा चटका वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. यावर्षी थंडीचा प्रकोप सतत कायम राहिला. यात सातत्याने चढउतार होत राहील. याचा परिणाम थेट मानवी आरोग्यावर झाला आहे. यामुळे आजाराचे प्रमाण वाढले आहे. सर्दी, खोकला, ताप या आजाराचे रुग्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढले, यातून रुग्णालय हाउसफुल्ल होते. थंडीचा जोर कमी होत आहे. फेब्रुवारी महिन्याच्या १५ तारखेच्या नंतर तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त केला जात आहे.

# विकास हिंदी विद्यालयातील शिक्षक भरती संशयाच्या भोवऱ्यात एस.आय.टी.चौकशीवर प्रश्नचिन्ह ; तक्रारदारावरच दबाव टाकण्याचा आरोप

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - येथील विकास हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक भरती,मान्यता व वेतन प्रकरणातील कथित अनियमिततेबाबत सुरू असलेल्या एस.आय.टी.चौकशीवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणातील तक्रारदार संतोष प्रभाकर पेंढारवार यांनी शिक्षण विभागाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार,भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष तसेच विकास हिंदी विद्यालय, पांढरकवडा (ता. केळापूर, जि. यवतमाळ) या संस्थेचे सचिव आनंद किशोर वैद्य यांनी शासनाकडून कोणताही भरती आदेश अथवा परवानगी नसताना सुमारे १० शिक्षक व कर्मचारी नियुक्त केले. या कर्मचाऱ्यांचे बोगस आयडी काढून त्यांचे वेतन सुरू करण्यात आल्याचा आरोप आहे. यामुळे शासनाची सुमारे १०-कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. तसेच शाळेच्या मुख्याध्यापक पदावर सौ. अनुश्री आनंद वैद्य (पत्नी) यांची सेवा ज्येष्ठता यादी डावलून नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप आहे. सन २०१२ नंतर राज्यात भरती बंद असतानाही शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या बॅकडेटने दाखवून २०२४ मध्ये मान्यता व आयडी मिळवण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रक्रियेस शिक्षण विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मदत केल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे. २०२४ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर २०१६ पासूनचे थकीत वेतन एकरकमी अदा करण्यात आल्याचा दावा करत, या संपूर्ण प्रकरणाची एस.आय.टी. मार्फत सखोल चौकशी करून शासनाच्या कोट्यवधी रुपयांची वसुली संबंधित संस्था चालकांकडून करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गेल्या एक वर्षापासून आमदार, शिक्षण मंत्री, मुख्यमंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने स्वतंत्र चौकशीची मागणी करण्यात येत आहे.

### तक्रारदारालाच नोटिसांचा मारा ; दबावाचा आरोप

चौकशीचा केंद्रबिंदू संस्था व संबंधित अधिकारी असताना, उलट तक्रारदारालाच वारंवार नोटिसा पाठवून सुनावणीस बोलावले जात असल्याचा आरोप संतोष पेंढारवार यांनी केला आहे. "उपस्थित न राहिल्यास एकतर्फी निर्णय" अशा शब्दप्रयोगांमुळे दबावाचे वातावरण तयार होत असल्याचे त्यांनी सांगितले.मूळ संचिका,सेवा पुस्तके,वेतन देयके,वरिष्ठता यादी,कार्यकारिणीचे इतिवृत्त यांसारखी महत्त्वाची कागदपत्रे संबंधित कार्यालयांकडे उपलब्ध असतानाही त्यांची तपासणी न करता जबाबदारी तक्रारदारावरच ढकलली जात असल्याचा आरोप आहे.विभागीय शिक्षण उपसंचालक,अमरावती यांच्या पत्रानुसार एस.आय.टी.चौकशी अपेक्षित असताना अद्याप स्वतंत्र पथक नेमण्यात आले नसल्याने ही चौकशी विभागाबाहेरील स्वतंत्र यंत्रणेकडून व्हावी,अशी ठाम मागणी तक्रारदारांनी केली आहे.

# जि.प उच्च प्राथमिक मराठी शाळा करंजखेड जुने शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा फक्त मराठी शाळेतच होऊ शकतो. याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा करंजखेड जुने ही शाळा तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यामध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात नेहमीच अग्रेसर असते.



दैनंदिन अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा म्हणून या शाळेच्या शिक्षकांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन केले. स्नेहसंमेलना चे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री सूर्यकांत भांगे कार्यक्रमाचे उद्घाटक श्री सिताराम काका ठाकरे जिल्हा नियोजन समिती सदस्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रसंगी व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या या कार्यक्रमातून शिक्षकांनी आपली मातृभाषा आपली संस्कृती आपले विचार जोपासण्यासाठी तसेच देशभक्ती, महापुरुषांची अशी अनेक गाण्यांचे सादरीकरण केले. करंजखेड येथील अतिशय उत्साही पालकांनी विद्यार्थ्यांना भरभरून असे पारितोषिके देण्यात आली. शाळेला गावचा आधार, गावाला शाळेचा अभिमान या उक्तीप्रमाणे करंजखेड येथील ग्रामस्थ नेहमीच शाळेला सहकार्य करतात. पालकांच्या सहकार्यामुळे व शिक्षकांच्या अथक परिश्रमामुळे या शाळेचे विद्यार्थी स्पर्धा परीक्षा,क्रीडा स्पर्धा,बुद्धिबळ स्पर्धा अशा अनेक स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य मिळवतात. शाळेचे मुख्याध्यापक श्री कांबळे सर यांनी स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मुंडे सर व श्री जाधव सर यांनी केले. शाळेतील पदवीधर शिक्षक श्री गुड्डा सर, श्री मुरकुटे सर, श्री पाटील सर यांच्या अथक परिश्रमाने हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

# मुख्यमंत्र्यांकडून जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - पुढच्या आर्थिक वर्षासाठीच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) च्या प्रारूप आराखड्यासंदर्भात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक घेवून आढावा घेतला.

या बैठकीला सह्याद्री अतिथीगृह येथे पालकमंत्री ना. संजय राठोड व जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, प्रकल्प संचालक अमित रंजन, जिल्हा नियोतजन अधिकारी सुधाकर आडे व विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी जिल्हा वार्षिक योजनेसह पूर संरक्षण भिंत बांधकाम अधिकार, आरोग्य सुविधेसाठी अत्याधुनिक उपकरण खरेदी, पंचायत समिती इमारत बांधकाम, पोलीस स्थानक आणि नाविण्यपूर्ण कामांसाठी निधी आवश्यक असल्याचे त्यांनी या बैठकीत सांगितले. तसेच जिल्हाधिकारी यांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मध्ये तरतूद करण्यात आलेल्या कामांची माहिती देवून निधी मंजुरीची मागणी केली.

# राज्य उत्पादन शुल्काची यवतमाळमध्ये मोठी कारवाई

## ३ वाहनांसह ६८३ बॉक्स दारू जप्त

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : राज्य उत्पादन शुल्क विभागाने यवतमाळ जिल्ह्यात अवैध दारू तस्करांविरुद्ध एक मोठी आणि धाडसी कारवाई केली आहे. १० फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, राळेगाव ते अल्लीपूर रोडवरील कमळेश्वर फाटा येथे पथकाने सापळा रचला होता.



या कारवाईदरम्यान संशयास्पद वाटणाऱ्या अशोक लेलँड कंपनीच्या एका १० चाकी कंटेनरची (MH 04 HD 0298) तपासणी केली असता, त्यात सुरुवातीला अंड्यांचे रिकामे बॉक्स दिसले. मात्र, त्याची सखोल झडती घेतली असता आतील बाजूस लपवून ठेवलेले गोवा आणि मध्य प्रदेश बनावटीच्या विदेशी दारूचे ६१३ बॉक्स मिळून आले. त्याच वेळी तपासणीत असलेल्या दुसऱ्या टाटा योद्धा वाहनातून (MH 30 BD 3881) देशी दारूचे ३० बॉक्स जप्त करण्यात आले. या कारवाईचा भाग म्हणून, पळून गेलेल्या एका 'किआ सेलटॉस' कारचा (MH 29 BV 7227) पथकाने वर्धा जिल्ह्यापर्यंत पाठलाग केला, ज्यामध्ये देशी दारूचे आणखी ४० बॉक्स सापडले. या संपूर्ण मोहिमेत एकूण १,०५,३५,६०५ रुपये किमतीचा मुद्देमाल, ज्यात विदेशी व देशी मद्याचे एकूण ६८३ बॉक्स आणि तीन वाहने समाविष्ट आहेत, जप्त करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान तीन अज्ञात आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले असून, त्यांच्या विरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना फरार घोषित करण्यात आले आहे. ही यशस्वी कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख आणि विभागीय पथकाच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक पी. एस. बोढारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पूर्ण केली.

# उपविभागीय अधिकारी यांचे अधिकार वापरून प्लॉट विभाजनाच्या परस्पर खरेदी-विक्री

## दुय्यम निबंधक यांनी दलाला मार्फत केले आर्थिक गैरप्रकार

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - येथील दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये उपविभागीय अधिकारी यांच्या परवानगीविना खरेदी-विक्री व मृत्युपत्र परस्पर करण्याबाबत पुसद येथील काही सामाजिक कार्यकर्ते तथा कामठा तालुका जिल्हा वाशिम येथील एका नातेवाईकांनी तक्रार केल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे.




सविस्तर वृत्त असे की पुसद येथील दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालय मधील दुय्यम निबंधक श्रीमती विद्या तळेगावकर यांनी मौजा काकडदाती येथील १३९.४० चौ.मी.व मौजा श्रीरामपूर येथील ७५० चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या भूखंडाची खरेदी-विक्री उपविभागीय अधिकारी यांच्या प्लॉट विभाजन परवानगीविना आपल्या आर्थिक लाभापोटी केल्याचे काही सामाजिक कार्यकर्ते यांनी उपविभागीय अधिकारी पुसद यांच्या कडे तक्रार करून नियमानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच महसूल मंत्री मुंबई, मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हाधिकारी यवतमाळ व जिल्हा निबंधक मुद्रांक जिल्हाधिकारी यवतमाळ यांना याबाबत तक्रारीची प्रत पाठवून उचित चौकशी करण्यासाठी पाठवली आहे. तसेच मौजा शेंबाळपिंपरी येथील भोगवटदार वर्ग-२ च्या शेतजमिनीच्या संदर्भात परस्पर मृत्युपत्र करण्यात आल्या या विषयाबाबत कामठा तालुका जिल्हा वाशिम येथील नातेवाईक यांनी सुद्धा उपविभागीय अधिकारी पुसद यांच्याकडे तक्रार दाखल करून कारवाईची मागणी केली आहे. पुसद येथील दुय्यम निबंध कार्यालयात गेल्या एक ते दीड वर्षापासून या कार्यालयात अनेक गैरप्रकार झालेले आहे. या ठिकाणी शासकीय कर्मचारी दुय्यम निबंध व्यतिरिक्त विलास चव्हाण तसेच ओम बोबडे हे दोन अधिकारी व कर्मचारी आहेत परंतु या ठिकाणी अनेक दलाल सक्रीय असल्यामुळे त्यांच्याकडून असे अनेक नियमाला डावलून गैरप्रकारचे कामे केल्याचे तक्रारदाराकडून आरोप करण्यात आले आहे. अत्यंत महत्त्वाचे की दुय्यम निबंधक श्रीमती विद्या तळेगावकर ह्या पुसद- यवतमाळत व यवतमाळ-पुसद रुजू झाले तेव्हापासून रोज ये-जा करत असतात मुख्यालय राहत नसून त्यांचा वाहनाचा रोज २ हजार रुपये गाडीचा खर्च असल्याचे आरोप सुद्धा तक्रारकर्त्या कडून करण्यात आले आहे. सदर तक्रार ३०/१०/२०२५ व ५ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आलेली असून याबाबत २ फेब्रुवारी २६ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. परंतु अद्याप पर्यंत कारवाई गुलदस्त्यात असल्याचे तक्रार कर्त्याकडून सांगण्यात आले आहे. सदर तक्रारीची दखल व नियमानुसार कारवाई न झाल्यास तक्रारकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे उपविभागीय अधिकारी पुसद हे

# गटई स्टॉल योजनेंतर्गत कामगारांना १०० टक्के अनुदानावर स्टॉल !

जनमाध्यम प्रतिनिधी

२८ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

यवतमाळ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या 'गटई स्टॉल योजना'अंतर्गत सन 2025-26 या वर्षासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. चर्मकार, ढोर, होलार, मोची आदी समाजघटकांचे आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक जीवनमान उंचावून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने ही योजना सन 1997 पासून सुरू आहे. या योजनेअंतर्गत महानगरपालिका, नगरपालिका, छावणी क्षेत्र व ग्रामपंचायत क्षेत्रात पात्र गटई कामगारांना 100 टक्के शासकीय अनुदानावर लोखंडी पत्र्याचे स्टॉल तसेच ५ हजार इतके रोख अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न 80 हजार रुपयांपर्यंत व शहरी भागातील एक लाख रुपयांपर्यंत असावे. अर्जदाराचे वय किमान 18 वर्षे पूर्ण असावे. तसेच ज्या जागेसाठी स्टॉलची मागणी आहे ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका किंवा छावणी बोर्डाकडून अधिकृतरित्या भाडे, करार, खरेदी किंवा मोफत ताब्यात दिलेली अथवा अर्जदाराच्या स्वमालकीची असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील पात्र व गरजू गटई कामगारांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, पळसवाडी कॅम्प, यवतमाळ येथून अर्ज विनामूल्य प्राप्त करून आवश्यक कागदपत्रांसह 28 फेब्रुवारीपर्यंत सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मंगला मून यांनी केले आहे.

भारत-अमेरिका व्यापार करारामुळे

# महाराष्ट्रातील सोयाबीन व कापूस उत्पादकांच्या अडचणी वाढणार -किशोर तिवारी

**नागपूर-** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यालयाने अमेरिका आणि भारत यांनी व्यापार करारासाठी एक अंतरिम मसुदा जारी केली आहे त्यामध्ये महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त विदर्भ ,मराठचाडा व उत्तर महाराष्ट्रातील सुमारे १ कोटी २० लाख शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम होणार असुन भारताचे वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी शेतकऱ्यांचे हित अमेरिका आणि भारत यांनी व्यापार करारामध्ये सुरक्षित असल्याचा दावा फोल ठरला असून यामुळे कापसाच्या सोयाबीनच्या व इतर तेलबियांची किमती पडतील अशी भीती विदर्भाचे कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये काम करणारे कार्यकर्ते किशोर तिवारी व्यक्त केली आहे.

शुल्क मुक्त कापसाच्या आयातीचा करारामुळे महाराष्ट्राचे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतील.अमेरिका आणि भारत यांनी व्यापार करारामध्ये विदर्भ मराठवाड्यातमध्ये उत्पादन होणाऱ्या लांब स्टेपल कापसाच्या आयातीला परवानगी दिली आहे शुल्क मुक्त आयातीची परवानगी दिली आहे.भारत सध्या कापसाच्या आयातीवर ११% शुल्क लादतो आणि अमेरिका जो जगातील सर्वात मोठ्या फायबर निर्यातदाराकडून शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिल्याने देशांतर्गत किमतींवर दबाव येऊ शकतो याचा परिणाम महाराष्ट्राचे कृषी संकटावर विहार असल्याची भीती व्यक्त करीत सध्या कापसाच्या आयातीवर निर्बंध टाकण्याची मागणी किशोर तिवारी केली आहे.

### अमेरिकेतून सोयाबीन तेलाच्या शुल्कमुक्त आयात महाराष्ट्रातील तेलबिया उत्पादकांना घातक



महाराष्ट्र,मध्यप्रदेश गुजरात हे प्रमुख सोयाबीन,भुईमूग सरकीचे तेलबियां उत्पादक राज्य आहेत. परंतु या राज्यातील उत्पादकता ही अमेरिकेपेक्षा प्रचन्ड प्रमाणात कमी आहे व पाम तेलाच्या आयातीमुळे अडचणीत आलेले शेतकरी या करारामुळे अडचणीत येतील. अमेरिकेतील तेलाची आयात वाढली तर देशांतर्गत तेलबिया प्रक्रिया करणारे उधोग आणि सोयाबीन उत्पादकांना तोटा होणार आहे यामुळे अमेरिका आणि भारत यांनी व्यापार करार रद्द करणे काळाची गरज आहे.

### इथिनेयुक्त डिस्टिलरी सुक्या धान्यांच्या सोल्युबल (डीडीजीएस) आयातीला परवानगी घातक

देशात डिस्टिलरी सुक्या धान्याच्या सोल्युबल (डीडीजीएस)चा पुरवठा या करारामुळे आणखी वाढणार आहे. भारतातील इथेनॉल उत्पादक-आधीच निष्क्रिय क्षमतेशी झुंजत आहेत आणि देशाने त्यांचे २०% जैवइंधन मिश्रण लक्ष्य गाठल्यानंतर मागणी कमी होत आहे - त्यांना देशांतर्गत बाजारात DDGS विक्रीतून कमी उत्पन्न मिळू शकते.अमेरिका आणि भारत यांनी व्यापार करारामध्ये भारताने अमेरिकेसमोर शेतकऱ्यांचे हित बाजुला ठेवले आहेत कारण भारतात आधीच DDGS चा अतिरिक्त पुरवठा आहे, ज्यामुळे सोयाबीन सारख्या तेलबियांची मागणी कमी होत आहे, तरी भारताने आपल्या तेलबियांची लागवड वाढवण्यासाठी आणि आयात रोखण्यासाठी कार्यक्रम लागू ठेवण्यासाठी अमेरिका आणि भारत यांनी व्यापार करार रद्द करण्याची मागणी किशोर तिवारी यांनी केली आहे.

## अचलपूर तालुक्यातील १८ केंद्रांवर विद्यार्थी देत आहे परीक्षा

**अचलपूर/वार्ताहर**



१० फेब्रुवारी रोजी अचलपूर येथील विविध केंद्रावर बारावी बोर्ड परीक्षा सुरू झाली असून १८ केंद्रांवर ४८३५ विद्यार्थी परीक्षा देत आहे. तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी शाळेत जाऊन पाहणी केली.बारावीच्या परीक्षेसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात आले असून गैरप्रकारास आळा बसण्याकरिता पथके सज्ज आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (बारावी) परीक्षेला मंगळवारपासून सुरवात झाली आहे. अचलपूर तालुक्यात १८ केंद्रांवर ४८३५ विद्यार्थी परीक्षेला बसले आहे. तालुक्यातील २९ व ३० या दोन्ही परीक्षक कार्यालयांतर्गत येत असलेल्या संवेदनशील केंद्रांवर बैठे पथकासह भरारी पथक स्थापन करण्यात आले आहेत.

## जिल्हाधिकारी कार्यालयात 'सुरक्षित इंटरनेट दिन'

### 'स्मार्ट टेक, सुरक्षित पर्याय' या संकल्पनेवर भर

**अमरावती/का.प्र.**

आजच्या वेगवान डिजिटल युगात इंटरनेट आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर सुरक्षितरीत्या व्हावा, या उद्देशाने 'सुरक्षित इंटरनेट दिन' जिल्हाधिकारी कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी हा दिवस 'स्मार्ट टेक, सुरक्षित पर्याय - आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा सुरक्षित आणि जबाबदार वापर' या संकल्पनेवर आधारित होता.



जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनातील जिल्हा माहिती विज्ञान अधिकारी मनीष कुमार आणि गाडगेनगर पोलीस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल ताहीर अली सय्यद यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, पासवर्डची सुरक्षितता आणि ओटीपी शेअर न करणे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर माहिती दिली.यावेळी आर्टिफिशियल इंटेलिजन्स या तंत्रज्ञानाचा वापरताना कोणती खबरदारी घ्यावी, डिजिटल हायजीनमध्ये डिजिटल अकाउंट्स आणि वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याच्या पद्धती, सोशल मीडियाचा वापर करीत असताना शासकीय काम आणि वैयक्तिक जीवनात सोशल मीडियाचा जबाबदार वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी गोविंद धनेज, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा आदींच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'इंटरनेट आणि एआयच्या सुरक्षित वापरा'ची सामूहिक शपथ घेतली. तसेच, कर्मचाऱ्यांच्या ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी एका विशेष प्रश्नमंजुषा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले.

## मनपास्तरीय 'नन्हे सितारे' चा सोहळा

### विजयी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्राचे मान्यवरांच्या हस्ते वाटप



**अमरावती/का.प्र**

स्पेलिंग बी ही स्पर्धा जगभरात आयोजित केली जाते आणि मुलांच्या भाषाशिक्षणाच्या पायाभरणीसाठी ती अत्यंत प्रभावी माध्यम ठरते. 'नन्हे सितारे' सारख्या उपक्रमातून महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना अशा दर्जेदार स्पर्धांचा अनुभव मिळतो, याचा मला विशेष अभिमान आहे, असे प्रतिपादन अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी केले. 'नन्हे सितारे' या जीवनकौशल्यांवर आधारित उपक्रमाच्या महानगरपालिका स्तरीय अंतिम फेरीच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या.

या सोहळ्याचे आयोजन नागपूर महानगरपालिका, जे. सी. फ्लावर्स आणि ओपन लिंक्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमास मनपा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, स्कूल इन्स्पेक्टर योगेश पखाले यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी तसेच तक्षशिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी फुले उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे उद्घाटन करताना मनपा उपायुक्त श्री नरेंद्र वानखडे यांनी सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व विनोबा टीमच्या सर्व सदस्यांना शुभेच्छा दिल्या.'नन्हे सितारे' या उपक्रमाचा उद्देश केवळ स्पर्धा आयोजित करणे इतकाच मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांच्या सर्जनशील अभिव्यक्तीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. उपक्रमाला महानगरातील शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शाळा व तालुका स्तरावरील प्राथमिक फेऱ्यांमध्ये महानगरातील एकूण ६३ शाळांनी सहभाग घेतला होता. त्यातून ६६ विद्यार्थ्यांची ग्रँड फिनालेसाठी निवड करण्यात आली. त्यापैकी २२ विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

## 'व्हॅलेंटाईन डे'निमित्त आयोजित 'कॉफी रेव्ह पार्टी' रद्द

**अमरावती/का.प्र.**

१४ फेब्रुवारी २०२६ रोजी 'व्हॅलेंटाईन डे'च्या निमित्ताने अहिल्यानगर शहरातील शॉर्ट ब्रेक कॅफे, जावा जंक्शन, टायटन शोरूमजवळ आयोजित करण्यात आलेल्या तथाकथित 'सनडाऊनर कॉफी रेव्ह पार्टी'या कार्यक्रमास हिंदू जनजागृती समितीसह विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला. या विरोधामुळे सदर कार्यक्रम रद्द करण्यात आला असून, पोलिसांनी याची माहिती समिती पदाधिकाऱ्यांना दिली आहे. तसेच संबंधित इंस्टाग्राम पेजवरील जाहिरात हटवण्यात आली आहे. हा हिंदूंच्या एकजुटीचा विजय आहे. अशा प्रकारे होत असलेले



समाजविघातक कार्यक्रम राखणे, हे संस्कृतीरक्षणच आहे, अशी भूमिका हिंदू जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक रामेश्वर भुकन यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी हिंदू जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक रामेश्वर भुकन, जिल्हा हिंदू संघटक बापू ठाणगे, भाजप महिला मोर्चा राज्य सचिव गीता गिल्डा, भाजप कार्यालय मंत्री मुकुल गंधे, बजरंग दलाचे नाना मोरे, हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे अजिंक्य गायकवाड, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे भरत शिंदे, सुनील शिंदे, रणरागिणी शाखेच्या सुरेखा विद्ये, सामाजिक कार्यकर्ते दिनेश जोशी, हिंदू टाईम्सच्या संपादिका स्नेहा जोशी, रवी गाली आदी उपस्थित होते. निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी योग्य कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. सर्व हिंदुत्ववादी संघटनांच्या सततच्या प्रयत्नांमुळे सदर रेव्ह पार्टी रद्द झाली, याबद्दल सर्व संघटनांचे आभार, तसेच ईश्वरचरणी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

## जागतिक कर्क रोग दिन विविध उपक्रमांनी साजरा

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग (बी.एस.सी. येथे जागतिक कर्क रोग दिन विविध उपक्रमानी उत्साहात साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेबा शाजी ह्यांनी स्वस्थ आणि आदर्श जीवनशैली ह्यावर विस्तृत माहिती दिली. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी स्त्री रोग व प्रसूती तज्ञ तथा कर्क रोगाच्या अभ्यासक व्याख्याता डॉ.शरयू गायकवाड यांचे विशेष व्याख्यान सत्र महाविद्यालयात आयोजित करण्यात आले.विद्यार्थ्यांनी कर्क रोगाची कारणे व लक्षणे आणि त्यासंबंधित उपाय तथा वैद्यकशास्त्राचे निकष-निदान जाणून घेत व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या रुग्णालयात पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. पथनाट्यासोबतच महाविद्यालय परिसरात जनजागृती फेरी काढून कर्करोगाबद्दल जनजागृतीचा प्रयास केला व यशस्वीपणे कर्करोग दिन साजरा केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी योगदान दिले. कार्यक्रमात प्राचार्या डॉ. शेबा शाजी, नम्रता ठाकरे,स्नेहल लकडे,कपिल रायबोले, मयुरी गायकवाड, पौर्णिमा पकडे,शुभांगी केळझरे,आशीष इंगळे,निखिल गेडेकर,वैशाली चांभारे,कोमल दावके,ग्रंथपाल शुभम ना. राऊत, श्रीकांत अळसपुरे,धीरज भागवतकर उपस्थित होते.



## जिल्हा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राज्यात तिसरा, विदर्भात अव्वल

### जिल्हाधिकाऱ्यांकडून बँकांना कडक तंबी

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्याने मोठी झेप घेतली असून, कर्ज मंजुरीमध्ये जिल्हा विदर्भात प्रथम तर राज्यात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत हा आढावा घेण्यात आला.

उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हाधिकारी 'ॲक्शन मोड' मध्ये आले आहेत. आर्थिक वर्ष



२०२५-२६ साठी जिल्ह्याला १६०० कर्ज प्रकरणांचे लक्ष्य देण्यात आले आहे. आतापर्यंत जिल्हा प्रशासनाने ३ हजार ७०४ प्रस्ताव बँकांकडे पाठवले असून, त्यापैकी ८०२ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे. जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

सरकारी योजनांच्या कर्ज मंजुरीबाबत खाजगी बँकांकडून दाखवण्यात येणाऱ्या अनास्थेबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आयसीआयसीआय, ॲक्सिस, एचडीएफसी आणि येस बँक या बँकांच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर ताशेरे ओढत, जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना भर सभेतून निघून जाण्याचे आदेश दिले.जिल्ह्यातील नवउद्योजक युवक-युवतींच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस अमरावती येथे 'स्वरोजगार महासंमेलन' आयोजित करण्यात येणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होईल. यात स्वयंरोजगारातून उत्पादित केलेल्या मालाच्या विक्रीसाठी विशेष स्टॉल्स उभारले जातील. यात नाविन्यपूर्ण उत्पादन करणाऱ्या उद्योगांना प्राधान्य दिले जाईल. बेरोजगार युवक-युवतींनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले.

## संक्षिप्त

### ग्रामीण भागात कलम ३७(१) व (३) लागू

**अमरावती-** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. २४ फेब्रुवारी २०२६च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कळविले आहे.

### 'ड्रॅगनफ्लाय' व 'कॅमेरा ट्रॅपिंग' विषयावर व्याख्यान




**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागामध्ये 'ड्रॅगनफ्लाय' व 'कॅमेरा ट्रॅपिंग' विषयावर नुकतेच व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख. डॉ. एच.पी. नांदुरकर उपस्थित होत्या.व्याख्याते डॉ. पवन राठोड, महसूल अधिकारी, अमरावती यांनी ड्रॅगनफ्लाय यावर व्याख्यान देतांना ड्रॅगनफ्लाय हे एक प्रकारचे किटक असल्याचे सांगून डासांसारख्या किटकांचे भक्षण करुन पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करीत असल्याचे सांगितले. ड्रॅगनफ्लायच्या प्रजननाविषयी देखील त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. ड्रॅगनफ्लायच्या जगभरात सहा हजाराहून अधिक प्रजाती आढळून येतात आणि त्या त्या परिसरातील पर्यावरणाची गुणवत्ता देखील त्यांच्या उपस्थितीवरुन ओळखता येत असल्याचे सांगून जैवविविधता संवर्धनासाठी त्यांचे खूप महत्व असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी व्याख्यात्यांनी ड्रॅगनफ्लायची काही छायाचित्रे सुध्दा विद्यार्थ्यांना दाखविली. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही विषयाची चांगली माहिती झाली.कॅमेरा ट्रॅपिंग या विषयावर व्याख्यान देतांना वन्यजीव संशोधक पंकज बांडाबुचे यांनी कॅमेरा ट्रॅप म्हणजे काय, त्याची कार्य पध्दती आदींबाबत माहिती दिली. वसाहतींमध्ये वाघ अथवा बिबट यासारख्या वन्य प्राण्यांची सुटका करणे, संख्या मोजणे, वर्तनाचा अभ्यास करणे, प्रजातींची नोंद ठेवणे, संवर्धनासाठी नियोजन यामध्ये कॅमेरा ट्रॅपिंगचे महत्व, कॅमेरा बसविण्याची योग्य पध्दत, ठिकाणे, डेटा संकलन आदींविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच प्रत्यक्ष कॅमेरामधून घेतलेली छायाचित्रे सुध्दा विद्यार्थ्यांना दाखविली.आभार प्रदर्शनाने व्याख्यान कार्यक्रमाची सांगता झाली. दोन्ही व्याख्यान कार्यक्रमाला विभागातील डॉ. नागले, डॉ. रजनी तायडे, डॉ. सीमा सावळे, अंकिता पानसरे, संपदा जोशी, निधी बजाज, विनय झटाले, रचना धुरे तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

### विराट हिंदू संमेलनासाठी जनुना सज्ज



**अमरावती-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त विराट हिंदू संमेलनासाठी हिंदूंना एकत्रित करण्याचा संकल्प जनुना येथे बैठकीत करण्यात आला.१ मार्च रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत टीमटाला -जनुना मार्गावरील पॉवर हाउसजवळ तृषांत तव्वर यांच्या शेतात हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाचे संयोजकपदी अर्जुनसिंह चौहान,सहसंयोजक पदी विश्वजित गिरी,कोषाध्यषपदी आकाश सैरिसे यांची एकमताने निवड झाली.पहिल्या बैठकीत संमेलनाचे विराट स्वरूप, वेगवेगळे प्रयोग, उपक्रम, अंदाजे खर्च, व्यवस्था व जबाबदारी विभागणी, संमेलनाची तारीख, वेळ, स्थान इत्यादी बाबत सकारात्मक चर्चा होवून एक्मताने निर्णय करण्यात आले.५०० तरुणांचे एकत्रित हनुमान चालीसा पठण, गावागावात महाआरती, बाल गोपाळांचे सांस्कृतिक कार्यक्रम, वेशभूषा स्पर्धा, भोजन व्यवस्था, यातायात व्यवस्था, गावोगावी बैठका, जनुना येथून दिंडी सोहळा आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आला.सुमारे २००० हिंदू एकत्रित करण्याचा संकल्प या प्रसंगी करण्यात आला.हिंदू संमेलन आयोजन समितीमध्ये दिलीप वानखेडे, राहुल भस्मेनंदकिशोर परिमल, विशाल गावंडे, शुभम जगताप, शंतनु मानकर, प्रथमेश खंडार, गौरव डोर्लीकर, अक्षय केवदे, प्रवीण नरखेडकर, पंकज ठाकूर, धीरज ठाकूर, तृषांत तव्वर इत्यादी हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

### राष्ट्रीय चर्मकार महासंघाची शाखा गठित



**अमरावती-** शाखा अध्यक्षपदी श्रीकृष्ण पंजाबराव तांबेकर तर सचिवपदी साहेबराव रा दायदार तसेच उपाध्यक्ष अरविंद जा. दहिकर ,सहसचिव महेंद्र रा जामठे,कोषाध्यक्ष गजानन मो श्रीवास यांची जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा संपर्कप्रमुख पी.बी.वनस्कर,मनोज बुंदीले,अनिल चांगोले ,सरपंच प्रीतीताई बुंदिले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनरावजी घोलप साहेब यांच्या आदेशानुसार गाव तिथे शाखा हा उद्देश ठेवून प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, प्रदेश निरिक्षक गजानन भटकर, विदर्भाचे नेते विदर्भ अध्यक्ष माधवराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनात ही शाखा कार्यकारणी तयार करण्यात आली. यावेळी संजय श्रीवास, दिलीप दायदार, योगेश हिरे, श्रीकृष्ण बुंदिले, संजय मोहकर, उत्तमराव श्रीवास, अरविंद विरुळकर, विजय तांबेकर, भीमरावजी वेरुळकर, प्रभाकर बुंदिले, विशाल बुंदिले, उमेश श्रीवास, बंडू भाऊ श्रीवास ,दत्तात्रय श्रीवास, रवींद्र बुंदिले, अजय श्रीवास, सतीश श्रीवास,रामदास श्रीवास,सुरेश श्रीवास , रामकृष्ण खंडारे, रॉबिन श्रीवास, गौरव श्रीवास, दत्ता श्रीवास, आशिष दहिकर, जगदीश वानरे आदिंनी शुभेच्छा दिल्या.

# प्रेमाचा बाजार की अर्थव्यवस्थेची उभारी?

समाजमाध्यमांपासून ते गल्ली-बोळांतील दुकानांपर्यंत सगळीकडे, फेब्रुवारी महिन्याची सुरुवात झाल्यापासून एकच चर्चा असते ती म्हणजे 'व्हॅलेंटाईन वीक'ची. एकेकाळी केवळ पाश्चात्त्य जगापुरता मर्यादित असलेला हा उत्सव आता आपल्याही तरुणांच्या संस्कृतीचा आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग बनला आहे. 'रोझ डे' म्हणून साजरा होणाऱ्या ७ फेब्रुवारीपासून सुरू झालेली ही प्रेमाची वारी १४ फेब्रुवारीच्या 'व्हॅलेंटाईन डे'पर्यंत जेव्हा पोहोचते, तेव्हा भारताच्या तिजोरीत काही हजार कोटींची उलाढाल झालेली असते. आज हा केवळ एक आठवडा राहिलेला नसून, तो भारतीय किरकोळ व्यापार, ई-कॉमर्स आणि कृषी क्षेत्रासाठी 'बूस्टर डोस' ठरत आहे.

'कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' आणि विविध रीटेल विश्लेषकांच्या मते, २०२४ मध्ये या आठवड्यात भारताने सुमारे २५,००० कोटी रुपयांची उलाढाल पाहिली होती. मात्र, २०२५ आणि २०२६ च्या सुरुवातीच्या कलानुसार, हा आकडा २८,५०० कोटी ते ३०,००० कोटी रुपयांच्या घरात जाण्याची दाट शक्यता आहे. जागतिक मंदीचे सावट आणि महागाईची चर्चा सुरू असतानाही भारतीय ग्राहकांची क्रयशक्ती या उत्सवाच्या निमित्ताने उसळी मारताना दिसत आहे. दिवाळीसारख्या सणाच्या वेळी किरकोळ भेटवस्तू बाजार ६.०५ लाख कोटी रुपयांवर गेला, त्याच्याशी व्हॅलेंटाइन डे निमित्त होणाऱ्या खरेदीच्या आकड्यांची तुलनाच नाही, हा युक्तिवाद बिनचूक असला तरी दिवाळीपेक्षा ही खरेदी निश्चितपणे निराळी आहे. हे केवळ बाजारीकरण नसून, एका नव्या ग्राहक-संस्कृतीचा उदय आहे.

'क्विक कॉमर्स'ची वाढ आणि बदलती बाजारपेठ यांचा संबंध जगभरच दिसून येतो. यावर्षीच्या व्हॅलेंटाइन अर्थकारणात सर्वात मोठा वाटा 'क्विक कॉमर्स'चा (झेप्टो, ब्लिंकिट, स्विगी इन्स्टामार्ट आदी) आहे. 'रेडसीअर' च्या अहवालानुसार, गेल्या काही वर्षांत ग्राहकांची मानसिकता बदलली आहे. आता ग्राहक आठवडाभर आधी भेटवस्तू घेऊन ठेवण्याऐवजी 'लास्ट मिनिट' खरेदीला पसंती देत आहेत. रोझ डे च्या दिवशी सकाळी १० वाजेपर्यंत या प्लॅटफॉर्म्सनी प्रति मिनिट ६०० हून अधिक गुलाबांच्या ऑर्डर्स पूर्ण केल्या. प्रेम अवघ्या १० मिनिटांत व्यक्त करण्याची ही सोय केवळ तंत्रज्ञानाचे यश नसून ती अब्जावधी रुपयांची 'इन्स्टंट इकॉनॉमी' निर्माण करत आहे. कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार व्हॅलेंटाईन वीकचा सर्वात मोठा फायदा भारतीय शेतकऱ्यांना, विशेषतः महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना होतो.

पुणे जिल्ह्यातील तळेगाव, चाकण आणि मावळ या पट्ट्यातील नर्सरी वा हरितगृहांमधून कोट्यवधी गुलाब जगभरात रवाना होतात. पुण्यातील मार्केट यार्ड हे या काळात आशियातील एक प्रमुख केंद्र बनते. आकडेवारीनुसार, भारतातून या काळात सुमारे २५ ते ३० कोटी रुपयांचे गुलाब निर्यात केले जातात. युरोप आणि आखाती देशांमध्ये भारतीय गुलाबांना मोठी मागणी असते. जेव्हा एखादा तरुण ५० रुपयांना गुलाब खरेदी करतो, तेव्हा त्यातील मोठा हिस्सा ग्रामीण भागातील मजूर, वाहतूकदार आणि शेतकऱ्यापर्यंत पोहोचतो. हा 'ट्रिकल



डाऊन इफेक्ट' अर्थशास्त्रातल्या 'झिरपा सिद्धांता'नुसारच अर्थव्यवस्थेच्या तळापर्यंत पैसा पोहोचवण्याचे काम करतो.

✍डॉ. महादेव आ. रिठे

केवळ वस्तूंची विक्रीच नाही, तर सेवा क्षेत्रातही या आठवड्यात मोठी भरभराट पाहायला मिळते. हॉटेलिंग आणि पर्यटन क्षेत्रासाठी हा हंगाम दिवाळीपेक्षा कमी नसतो. 'कॅन्डल लाइट डिनर'पासून ते 'स्टेकेशन'पर्यंतच्या सुविधांसाठी पंचतारांकित हॉटेलांनी ३०-४० टक्क्यांनी दर वाढवूनही 'बुकिंग फुल' असल्याचे चित्र असते. 'नील्सन'च्या सर्वेक्षणाप्रमाणे, २०२५ मध्ये हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील उलाढाल गेल्या वर्षाच्या तुलनेत १८ टक्क्यांनी वाढली आहे.

या अर्थकारणाचा एक नवा पैलू म्हणजे 'सेल्फ-लव्ह'. अलीकडच्या काळात जे तरुण रिलेशनशिपमध्ये नाहीत, ते स्वतःसाठी पैसे खर्च करताना दिसत आहेत. याला अर्थशास्त्राच्या भाषेत 'सोलो इकॉनॉमी' म्हणतात. सौंदर्य प्रसाधने, इलेक्ट्रॉनिक्स गॅजेट्स आणि पुस्तके यांच्या विक्रीत स्वतःसाठी खरेदी करणाऱ्यांचा वाटा आता १२ ते १५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. ब्रँड्सनी देखील आता 'स्वतःवर प्रेम करा' अशी जाहिरातबाजी सुरू केल्याने बाजारपेठेचा परीघ अधिक विस्तारला आहे.

या आठवड्यात होणारी हजारो कोटींची उलाढाल केवळ मोठ्या कंपन्यांपुरती मर्यादित नाही. या काळात 'इन्फ्लुएंसर मार्केटिंग'वर प्रचंड खर्च केला जातो. यंदा-२०२६ पर्यंत केवळ व्हॅलेंटाईन डेनिमित्त होणारा डिजिटल जाहिरात खर्च ७५ कोटी रुपयांच्या पुढे जाण्याचा अंदाज आहे.

याशिवाय, डिलिव्हरी बॉयपासून ते गिफ्ट पॅकिंग करणाऱ्यांपर्यंत हजारो हातांना तात्पुरता पण चांगल्या पगाराचा रोजगार मिळतो. ही 'गिग इकॉनॉमी' हे आज भारतीय तरुणाईला आर्थिक स्वातंत्र्य देण्यास मदत करणारे एक साधन ठरले आहे.

'व्हॅलेंटाईन वीक'ला पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण म्हणून नाकारणे सोपे आहे, पण त्यामागील अर्थशास्त्र दुर्लक्षित करून चालणार नाही.

भारतासारख्या विकसनशील देशासाठी, जिथे देशांतर्गत मागणी (डोमेस्टिक डिमांड) हा जीडीपीचा मोठा आधार आहे, तिथे असे उत्सव अर्थव्यवस्थेला गती देतात. जेव्हा पैसा खेळता राहतो, तेव्हाच विकास होतो. या सात दिवसांच्या उत्सवाने भारतीय बाजारपेठेत जी चैतन्यमय ऊर्जा निर्माण केली आहे, ती पाहता 'प्रेम' हे केवळ भावनिक राहिले नसून ते अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे चाक झाले आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

'प्रेमाची फुटली पेठ, लुटू या प्रेमाचा बाजार' हे तत्कालीन फिल्मी प्रेमाला कमअस्सल समजणारे, प्रेमभावना व्यक्त करण्यात संकोचच अधिक चांगला असे सुचवणारे गाणे १९३९ सालचे! तो संकोच राहिलेला नाहीच, फिल्मी प्रेमदृश्येही जुनी झाली आहेत. पण प्रेमभावना कायम आहे आणि ती बाजाराला फुलवते आहे!



## प्रेम की बाजारपेठेचा सापळा?

आज १४ फेब्रुवारी, व्हॅलेंटाईन डे, पाश्चात्य संस्कृतीनुसार प्रेम व्यक्त करण्याचा दिवस! आज अवघ्या तरुणाईला या दिवसाने अक्षरशः वेड लावले आहे. या दिवशी प्रेम व्यक्त करण्यासाठी जणू स्पर्धाच लागलेली दिसते. सोशल मीडियावर प्रेमाचे प्रदर्शन करण्याची स्पर्धा, महागड्या भेटवस्तू देऊन प्रेम सिद्ध करण्याची चढाओढ, मोठमोठ्या हॉटेलमध्ये जाऊन पैसा उडवण्याचे प्रकार सर्रास घडताना दिसतात. हा दिवस जवळ आला की बाजारपेठेत लाल रंगाची सजावट सुरू होते. हृदयाच्या आकाराच्या भेटवस्तू, फुले, ग्रीटिंग कार्ड्स, टेडी बेअर्स यांचा मोठा व्यवसाय सुरू होतो. तरुणांना आकर्षित करण्यासाठी मॉल्स, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स विविध सवलती आणि खास ऑफर्स जाहीर करतात. त्यामुळे हा दिवस केवळ प्रेम व्यक्त करण्याचा न राहता, हळूहळू व्यापाराचा उत्सव बनत चालला आहे.


ही झाली या दिवसाची एक बाजू! दुसरीकडे, या दिवशी सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर, उद्यानात, चौकाचौकांत दिसणारी काही दृश्ये मन सुन्न करणारी असतात.

सार्वजनिक ठिकाणी अश्लील वर्तन, शिस्तभंग आणि सामाजिक मर्यादांचे उल्लंघन होताना दिसते. आजच्या तरुण पिढीत प्रेम म्हणजे फक्त आकर्षण किंवा शारीरिक जवळीक अशी चुकीची समजूत पसरत चालली आहे. मात्र खरे प्रेम हे क्षणिक आकर्षण नव्हे. आपुलकी, जबाबदारी, विश्वास, निष्ठा आणि समर्पण हे खरे प्रेम! या खऱ्या प्रेमाची जाणीव तरुण वर्गाला होणे आज अत्यंत आवश्यक आहे. बाजारपेठेच्या सापळ्यात अडकून प्रेमाची किंमत न ठरवता, खऱ्या प्रेमाचे मूल्य समजून घ्यावे.

**प्रिया बागडदेव**

## व्हॅलेंटाईन डे पाश्चात्य विकृती!

व्हॅलेंटाईन डे या कूसंस्कृतीमुळे देशाची नासाडी होत आहे. एका माहितीनुसार मागील वर्षीचा डेटा घेतला तर भारतात ४३ लाख मुलींमध्ये वंध्यत्व निर्माण झाले आणि ३० लाख मुलींमध्ये कर्करोग आढळून आला. व्हॅलेंटाइन डे नंतर अवघ्या १० दिवसांत स्त्रीरोग तज्ज्ञांकडे मुलींची मोठी गर्दी लागते. का? टीव्हीवर जाहिरात येते फक्त एक कॅप्सूल घेऊन ७२ तासांत नको असलेली गर्भधारणा टाळा. अक्कल न वापरणाऱ्या मुली अशा गोळ्या घेतात, ज्यांचे ना घटकद्रव्य (म्दस्ज्देग्ग्दह) माहीत असते, ना त्याची संकल्पना; फक्त खातात. परिणामी स्वतःच्या जीवनाची नासाडी करून घेतात. बनावट गोळ्यांमध्ये आर्सेनिकसारखी घातक द्रव्ये असतात. या गोळ्यांमुळे ७२ तासांत केवळ तयार होत असलेला भ्रूणच नष्ट



होत नाही, तर संपूर्ण प्रजननसंस्थाच खराब होते आणि लग्नानंतर अशा स्त्रियांना आई होता येत नाही. एवढेच नव्हे, तर काहींना कर्करोग होतो किंवा अन्य काही रोग होतात.

सरकार दरवर्षी मातृत्व सुरक्षा, जननी सुरक्षा, बेटी बचाओ अशा योजनांच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करते. आज परिस्थिती अशी आहे की १३–१४ वर्षांच्या काही मुली पिशवीत आय-पिल घेऊन फिरतात. हे नसेल तर काय होईल? व्हॅलेंटाइन साजरा करणाऱ्यांनी थोडी तरी लाज बाळगावी. सनातन भारतीय संस्कृती फार निर्मळ, पवित्र आणि शुद्ध जीवन जगण्याची शिकवण देते. व्हॅलेंटाईन डे म्हणजे पूर्णपणे संस्कृतीची हानी आहे.

वेळ आली आहे की व्हॅलेंटाइन सारख्या कुकर्मांना प्रोत्साहन देणाऱ्या नीच मानसिकतेला रोखून देशाच्या तरुण पिढीला सक्षम बनविण्याची !


**आदिती देखणे**

## प्रेम की भ्रम?

आज खरे प्रेम हे एका विशिष्ट दिवसापुरते मर्यादित न राहता संपूर्ण आयुष्यभर जपले जाणारे मूल्य असायला हवे. प्रेम म्हणजे केवळ आकर्षण, जवळीक किंवा शारीरिक ओढ नसून त्यामागे जबाबदारी, आदर आणि निष्ठा असणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीत प्रेमाला संयम, त्याग आणि कर्तव्याची जोड दिली गेली आहे. मात्र आजच्या घडीला या सगळ्या मूल्यांकडे दुर्लक्ष करून क्षणिक भावना आणि भावनात्मक आवेगालाच प्रेम समजले जात आहे, ही चिंतेची बाब आहे.

युवक-युवतींनी समाजमाध्यमांवर दिसणाऱ्या चमकदार चित्रांमागील वास्तव ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येक नातं सोशल मीडियावर दाखवण्यासारखे किंवा प्रदर्शनासाठी नसते खरे नाते हे गुप्त, सुरक्षित आणि दोघांच्या सन्मानावर आधारलेले असते. त्यामुळे भावनांच्या भरात कोणताही निर्णय न घेता, विचारपूर्वक आणि सजगपणे वागणे हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे.

हल्लीच्या तरुण वर्गासाठी फेब्रुवारी महिना विशेष महत्त्वाचा मानला जातो. हा महिना 'प्रेमाचा



महिना' म्हणून ओळखला जातो. विशेष म्हणजे पाश्चात्त्य देशांनाही आश्चर्य वाटेल असा 'प्रेमाचा सप्ताह' भारतात ७ ते १४ फेब्रुवारीदरम्यान साजरा केला जातो. रोझ डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे आणि शेवटी व्हॅलेंटाईन डे. असा हा संपूर्ण आठवडा साजरा केला जातो. प्रत्यक्षात, एवढ्या प्रमाणात हे दिवस विदेशातही साजरे केले जात नाहीत. यावरून भारतीय तरुणाईवर पाश्चात्त्य संस्कृतीचा किती खोलवर प्रभाव पडलेला आहे, हे स्पष्ट होते. याला समाज माध्यमे आणि टी. व्ही. चॅनल्स द्वारे आणखी जास्त खतपाणी घातल्या जाते.

मात्र प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे साजरे केलेले प्रेम खरोखर टिकते का? प्रेम म्हणजे जिथे आपुलकी, विश्वास आणि समजूतदारपणा असायला हवा, तिथे आज बाजारूपणाची अंध स्पर्धा सुरू आहे. प्रेम व्यक्त करण्यासाठी चॉकलेट, महागड्या भेटवस्तू आणि आकर्षक शुभेच्छापत्रांनाच अधिक महत्त्व दिले जात आहे. आजच्या तरुण पिढीला आपले ऐतिहासिक दिवस आठवण करून द्यावे लागतात, पण हे विदेशी 'डे' मात्र मोठ्या उत्साहाने आणि न चुकता साजरे केले जातात, ही खेदाची बाब आहे.

व्हॅलेंटाईन डेच्या पार्श्वभूमीवर प्रेमाच्या नावाखाली अनेक आक्षेपार्ह आणि बीभत्स प्रकार घडताना दिसत आहेत. एकतर्फी प्रेमातून मुलींची छेडछाड, मानसिक त्रास, तसेच हिंसक कृत्यांचे प्रमाण वाढत आहे. 'लव्ह जिहाद'सारख्या गंभीर आणि संवेदनशील घटना समाजात घडत असताना देखील या दिवसाचे अंधानुकरण थांबताना दिसत नाही. त्यामुळे व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा दिवस नसून अनेक अर्थांनी 'काळा दिवस' ठरत असल्याचे म्हणणे गैर ठरणार नाही.

या दिवसांच्या निमित्ताने विदेशी कंपन्या मोठ्या प्रमाणावर आपला व्यवसाय वाढवत आहेत आणि भारतीय जनता मात्र भावनिक पातळीवर फसवली जात आहे. या फसवणुकीला बळी केवळ तरुणीच नाहीत, तर तरुणांनाही यामध्ये सावध राहण्याची गरज आहे. कारण या डेच्या आडून आमिष दाखवून लव्ह जिहाद, धर्मांतरण तसेच विविध प्रकारच्या फसवणुकीचे प्रकार वाढताना दिसत आहेत. म्हणूनच आता वेळ आली आहे की तरुणांनी स्वतः जागरूक राहून आपल्या मित्रमंडळींनाही जागरूक करावे. समाजात पसरत चाललेल्या या अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी सजगता आवश्यक आहे.

तेव्हाच प्रेमासारख्या पवित्र आणि सुंदर भावनेला लागणारा काळीमा दूर होईल आणि प्रेमाचा खरा अर्थ समाजासमोर पुन्हा उभा राहील.

**राधा पिंपळापुरे,**
उमरेड

# जगण्यातली खरी अमिरी शिकवणारा 'मुफ़लिस' प्रशांत जामदार

जीवन जगण्यासाठी काळजात जिंदादिली पाहिजे. तुमची परिस्थिती कशीही असो तुमची मनस्थिती मात्र सकारात्मक असायला पाहिजे. जीवनात आलेल्या प्रत्येक संकटाला जिद्दीने सामोरे जाणाऱ्या प्रशांत जामदार यांनी आयुष्य एका योद्ध्याप्रमाणे जगले. 'तेरा भाई फायटर है, तेरा भाई टायगर हैं' या त्यांच्या व्हॉट्स ॲप कोट प्रमाणे ते आयुष्यभर लढले. दोन्ही यकृत निकामी झाल्यामुळे बऱ्याच दिवसापासून डायलिसिसवर असलेल्या प्रशांत जामदार यांनी 'एका प्रशांत समयी' सोमवार ९ फेब्रुवारी रोजी जगाचा निरोप घेतला.

लहानपणापासून कलेची आवड असणाऱ्या प्रशांत जामदार यांनी नाट्य आणि साहित्य क्षेत्रात आपल्या कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटवला. मराठी कविता, गझल आणि नाट्य लेखन या साहित्य प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. 'मुफ़लिस' या टोपण नावाने त्यांनी हिंदी मध्ये सुद्धा लिखाण केले आहे. मुफ़लिसचा अर्थ एक गरीब माणूस... पण हा माणूस गरीब नव्हता. तो एक प्रतिभासंपन्न कलावंत होता. कला क्षेत्रातील इतरांना हेवा वाटेल अशी अमिरी त्याच्याजवळ होती.

प्रशांत जामदार यांनी अकोल्यामध्ये अद्ययावत नाट्यगृह व्हावे यासाठी विशेष प्रयत्न केले. नाट्य क्षेत्रात एक यशस्वी अभिनेता, दिग्दर्शक आणि लेखक म्हणून त्यांची उल्लेखनीय कारकिर्द राहिली आहे. रंगमंचावर पात्र जिवंत करताना त्यांचा नैसर्गिक अभिनय पाहून रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन जायचे. त्यांचा अभिनय रसिकांना केवळ खिळवून ठेवत नव्हता तर आपण सुद्धा या संहितेचा भाग आहोत ही भावना प्रेक्षकांच्या मनात निर्माण करण्यात ते यशस्वी व्हायचे. नाट्य क्षेत्रात एक प्रयोगशील कलावंत म्हणून त्यांचे नाव नेहमीच घेतल्या जाईल. त्यांची 'सत्यम शोधम सुंदरम' आणि 'शांडिल्य' ही प्रयोगशील नाटके नाट्य संहितेला वेगळी उंची प्रदान करणारी ठरली. राज्यभर अनेक स्पर्धा या नाटकांनी जिंकल्या. सुमारे २५० युवा कलावंतांसह त्यांच्या वेध युवा प्रतिष्ठानने केलेला व्यावसायिक प्रयोग 'रंगवेध ' आजही अकोलेकरांच्या स्मरणात आहे. या माध्यमातून अनेक कलावंत घडले. 'जिंदगी जिंदाबाद' हा त्याचा नाट्य प्रयोग सुद्धा प्रायोगिकसह व्यावसायिक रंगभूमी समृद्ध करणारा ठरला.



प्रशांत जामदार यांना दुर्धर आजाराने ग्रासले होते मात्र तरीही त्यांनी जगण्याच्या वृत्तीत किंचितही फरक पडू दिला नाही. ते त्याच्या एका हिंदी कवितेत म्हणतात,

**'क्या माजरा है मेरे साथ खुदा जाने,**
**दर्द तो बहोत है मगर, तकलिफ नहीं है !'**

हा माणूस आजारपणाच्या वेदनांच्या आहारी गेला नाही. त्यांनी कायम इतरांना जीवन जगण्यासाठी प्रवृत्त केले. प्रशांत जामदार यांच्या जगण्यात स्वाभिमानी बाणा होता. कुणाच्या अगदी वेदनेच्याही अटींवर ते जगले नाहीत. त्यांची हीच वृत्ती त्यांच्या शब्दात उतरली होती.

**'आले कधी न दुनियेशी, माझे जुळून येथे...**
**जे लोक भेटले ते, गेले छळून येथे...**
**'ते लोक ग्रेट आहेत, जे कापती गळे केसांनी...**
**आम्हीच दळभद्री जगतो... शब्द पाळून येथे...'**
**जीवनात त्यांनी कधीच तडजोड केली नाही.**
**'तुम्हास तुमची जगावयाची रीत मुबारक**
**तुम्हास तुमचे कीळसवाने गीत मुबारक'**

असे म्हणत स्वतःची वेगळी वाट चालण्यात त्यांनी धन्यता मानली.

प्रशांत जामदार यांचे 'एका प्रशांत समयी' आणि 'काही गुलाबी' सारखे काव्य वाचनाचे प्रयोग सुद्धा लोकप्रिय ठरले होते. काही मराठी चित्रपटांसाठी त्यांनी गीत लेखन सुद्धा केले होते. महाराष्ट्रातील अनेक नामवंत कवी संमेलन, गझल मुशायरे आणि अनेक नाट्य स्पर्धा त्यांनी गाजवल्या. नाट्य लेखनाचे आणि अभिनयाचे अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांच्या पुढील काव्यपंक्ती रसिकांच्या ओठांवर आजही रुंजी घालतात.

**'फुंकर तुझी मिळावी इतके नशीब कोठे,**
**माझ्याहुनी करंटे आहेत घाव माझे...'**
**'वागतो आहे अताशा सावकारासारखा जो**
**तो तुझा पाऊस तेव्हा केवढा दिलदार होता'**
**'तुझिया डोळ्यांमध्ये होती....हिरवी हिरवी 'स्वप्ने'....!!**
**माझ्या डोळ्यांमध्ये....नुसते 'मृगजळ' लिहिले होते...**
**'प्रेताच्या माथ्यावरती....लिहिले होते 'सुटका'...**
**माझ्या माथ्यावरती...'भोगणे' (जगणे) केवळ लिहिले होते...**

प्रशांत जामदार माझे शेजारी होते. मी लहानपणापासून त्यांचा प्रवास जवळून पाहिला आहे. चित्रपट दिग्दर्शक प्रा. निलेश जळमकर यांच्या अनेक महत्त्वाच्या प्रोजेक्टमध्ये त्यांच्यासोबत काम करण्याचा योग मला आला. ते उत्कृष्ट इव्हेंट मॅनेजर होते. नाटक असो वा इतर कुठलाही प्रयोग दर्जाच्या बाबतीत त्यांनी कधीच तडजोड केली नाही. शेवटपर्यंत त्यांनी कलोपासना केली. एका दुर्धर आजाराशी लढता लढता शेवटी 'एका प्रशांत समयी' प्रशांत जामदार यांनी घेतला जगाचा निरोप घेतला. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्रातील कलाक्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. प्रशांत जामदार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**निलेश कवडे,**
अकोला

# धनादेशावर बनावट स्वाक्षरीने २.१९ लाखांचा विड्रॉल ?

## आलेगाव ग्रामपंचायतीतील प्रकार ; तत्कालीन सचिवांची सीईओंकडे तक्रार

■ प्रतिनिधी | खेट्री ■

*पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या आलेगाव ग्रामपंचायतीत निधीच्या गैरवापराबाबतच्या तक्रारी सुरू असतानाच आता धनादेशावर बनावट स्वाक्षरी करून २ लाख १९ हजार रुपयांचा विड्रॉल केल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. याप्रकरणी तत्कालीन सचिव जे. पी. तायडे यांनी २ फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.*




तक्रारीनुसार, जे. पी. तायडे यांना ६ ऑक्टोबर २०२५ रोजी निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर ३ डिसेंबर २०२५ रोजी त्यांनी पदाचा प्रभार गणेश जाधव यांच्याकडे सुपूर्द केला. त्या वेळी जनसुविधा निधी खात्यात ८ लाख २ हजार १५४ रुपये शिल्लक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, कोणताही अधिकृत अर्ज, ठराव किंवा खाते बदलासंदर्भातील वैध कागदपत्र सादर न करता २२ डिसेंबर २०२५ रोजी त्यांच्या संमतीशिवाय खाते बदल करण्यात आले. त्यानंतर धनादेशावर बनावट स्वाक्षरी करून २ लाख १९ हजार रुपये अदा करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. संबंधित चेकबुक सरपंचांच्या ताब्यात असल्याचेही तायडे यांनी नमूद केले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच झालेल्या आर्थिक नुकसानीची रक्कम संबंधितांकडून वसूल करावी, अशी मागणी तायडे यांनी केली आहे.

**सरपंचांनी आरोप फेटाळला**

दरम्यान, आलेगावचे सरपंच गोपाल पाटील यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत.

'तत्कालीन सचिवांनी निलंबनापूर्वी ठराव व मंजुरीनंतर झालेल्या कामांची देयके अदा करण्यासाठी धनादेशांवर स्वाक्षरी करून ते ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमार्फत संबंधितांना दिले होते. धनादेश वटविण्याची मुदत तीन महिने असल्याने संबंधितांनी उशिरा रक्कम काढली. त्यामुळे सदर तक्रार बिनबुडाची असून त्यात तथ्य नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या आरोप-प्रत्यारोपांमुळे आलेगाव ग्रामपंचायतीतील कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाच्या चौकशीकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# झरंडी परिसरात गौण खनिजांचे सर्रास अवैध उत्खनन ; दंडात्मक कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम झरंडी परिसरात गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. स्मशानभूमी व पुलाजवळील परिसरातून जेसीबीच्या साहाय्याने मुरूम व मातीचे सर्रास उत्खनन करून त्याची बेकायदेशीर वाहतूक केली जात असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

झरंडी परिसर दुर्गम भागात असल्याने संबंधित महसूल विभागाचे अधिकारी येथे फिरकत नसल्याचा आरोप होत आहे. या परिस्थितीचा फायदा घेत गौण खनिज माफिया कोणत्याही भीतीशिवाय भरदिवसा उत्खनन करत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा फटका बसत असल्याचे सांगितले जात आहे.

ग्रामस्थांच्या मते, स्मशानभूमी व सार्वजनिक बांधकामांच्या परिसरात उत्खनन होत असल्याने भविष्यात पर्यावरणीय तसेच सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तरीही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. संबंधित महसूल विभागाने तातडीने घटनास्थळी पंचनामा करून अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरोधात कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वेळीच पावले उचलली नाहीत, तर अशा प्रकारांना अधिक बळ मिळण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली.

**स्मशानभूमी व पुलाजवळून मुरूम-मातीची बेकायदेशीर वाहतूक; महसूल विभागावर दुर्लक्षाचा आरोप**



**गौण खनिज माफियांना अभय कोणाचे?**

झरंडी परिसरातील स्मशानभूमी व पुलाजवळून मुरूम व मातीचे सर्रास उत्खनन सुरू असताना संबंधित यंत्रणा निष्क्रिय का, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. गौण खनिज माफियांना अभय कोणाचे, असा प्रश्नही ते विचारत आहेत.

# महिंद्रा गद्रे शोरूम अपहार प्रकरण : अटकेनंतर पाच दिवसांत चार आरोपींना नियमित जामीन

■ प्रतिनिधी | अकोला ■


शहरातील गाजलेल्या महिंद्रा गद्रे चारचाकी वाहन शोरूममधील कथित अपहार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या चार आरोपींना अटकेनंतर अवघ्या पाच दिवसांत नियमित जामीन मंजूर करण्यात आला आहे. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (क्र. ५) अकोला यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून हा आदेश दिला.

शिवणी येथील गद्रे ऑटोकॉन प्रा. लि. या ऑटोमोबाईल डीलरशिपच्या वाशीम शाखेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांविरुद्ध शोरूमच्या संचालिका प्राची अमोल गद्रे यांनी फिर्याद दिली होती.

त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात ४ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. शोरूममधील ५ लाख २९ हजार ८९९ रुपयांचा अपहार झाल्याचा आरोप असून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(४), ३१८(४), ३(५) अन्वये संगनमताने अपहार केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला होता.

या प्रकरणात ब्रँच मॅनेजर पंकज सरदार यांच्यासह अतुल अवचार, राहुल लांडगे व पियुष चौधरी यांना अटक करण्यात आली होती. बचाव पक्षातर्फे ॲड. आकाश हिवराळे, ॲड. विशाल धुंदले, ॲड. शुभम करडीले व ॲड. गगन वाकोडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. संबंधित आरोप हे कर्मचाऱ्यांनी राजीनामा दिल्यानंतर रागातून लावण्यात आल्याचा दावा करत आरोपींना खोट्या प्रकरणात अडकवण्यात आल्याचे न्यायालयासमोर मांडण्यात आले.

सरकारी पक्ष व बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी क्रमांक १ ते ४ यांना नियमित जामीन मंजूर केला. बचाव पक्षाच्या वतीने ॲड. अजय भारसाकळे, ॲड. अमित वाहूरवाघ, ॲड. महिंद्रा सोळंके, आदित्य अवचार व अमन घरडे यांनी सहकार्य केले.



# योगगुरू मनोहर इंगळे यांची केंद्रीय संशोधन परिषदेत अशासकीय सदस्यपदी नियुक्ती

■ प्रतिनिधी | अकोला ■

सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन योगा अँड नॅचरोपॅथी (ण्ऐंभ्=) या राष्ट्रीय संस्थेवर अकोल्यातील ज्येष्ठ योगगुरू मनोहर इंगळे यांची तीन वर्षांसाठी अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे अकोला जिल्ह्याच्या योग क्षेत्राला राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व मिळाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून आंतरराष्ट्रीय योग दिनाची सुरुवात झाल्यानंतर देशभर योगाबाबत जागरूकता वाढली आहे. त्याच प्रेरणेने आयुष मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या या राष्ट्रीय संस्थेवर मनोहर इंगळे यांची निवड झाल्याचे सांगण्यात येते.

इंगळे हे २००४ पासून अकोला जिल्ह्यात निशुल्क योगवर्ग घेत असून समाजात त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिवतेज प्रतिष्ठानच्या माध्यमातून ते विविध सामाजिक उपक्रम राबवितात. पोलीस प्रशिक्षण केंद्रात तसेच कारागृहातील बंदिवानांसाठी त्यांनी योग प्रशिक्षण देत आरोग्य जनजागृती केली आहे. त्यांच्या योग शिबिरांचा लाभ अकोला जिल्ह्यासह बाहेरील जिल्ह्यातील अनेक गरजू नागरिकांनी घेतला असून विविध व्याधींवर मात करण्यास मदत झाल्याचा अनुभव सहभागी व्यक्तींनी व्यक्त केला आहे.

नेहरू पार्क येथे ते नियमित ध्यान व योगाचे जाहीर वर्ग घेतात. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने २०१० मध्ये त्यांना 'गुणवंत कामगार पुरस्कार' प्रदान करून सन्मानित केले होते. माजी मंत्री संजय धोत्रे, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल तसेच रामप्रकाश मिश्रा यांच्या प्रयत्नांतून ही नियुक्ती झाल्याचे सांगितले जाते. मनोहर इंगळे यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८६/२०२६ — प्रोसेस नं.११३८/२०२६

चौ.ता. १०/०३/२०२६ — दिनांक : २७/०१/२०२६

**अर्जदार :** निर्मला वासुदेव घोगरे रा. मु. टाकळी खुरेशी, पो. खिरपुरी, ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. देविदास यशवंतराव मुरूमकार २. सुलोचना देविदास मुरूमकार ३. विनायक देविदास मुरूमकार

**पत्ता :-** रा. मु. पो. शिवर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क. १ देविदास यशवंतराव मुरूमकार यांचे दि. १९/१२/१९९९ रोजी व मयत क. २ सुलोचना देविदास मुरूमकार यांचे दि. ०७/०८/२०१० रोजी व मयत क. ३ विनायक देविदास मुरूमकार यांचे दि. २६/१२/२०१९ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २०७/२०२६ — प्रोसेस नं.१७५२/२०२६

चौ.ता. १६/०३/२०२६ — दिनांक : ०७/०२/२०२६

**अर्जदार :** १. शकीला बानो खालिद खान रा. नाल साहेब चौक जवळ, बैदपुरा, अकोला. ता. जि. अकोला २. हिना कौसर अनवर अहमद खान रा. मोहम्मद अली रोड, बैदपुरा, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : खालिद अहमद खान हाजी गुलाम करीम खान

**पत्ता :-** रा. नाल साहेब चौक जवळ, बैदपुरा, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत खालिद अहमद खान हाजी गुलाम करीम खान यांचे दि.१३/०१/२०१९ रोजी राहते घरी नाल साहेब चौक जवळ, बैदपुरा, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## फुटबॉल व क्रिकेट स्पर्धांनी रंगले मैदान

■ प्रतिनिधी | अकोला ■

म रा तंत्र शिक्षक मंडळ, मुंबई व आंतर अभियांत्रिकी पदवीका विद्यार्थी स्पोर्ट्स असो.अमरावती झोन अंतर्गत स्थानीय मानव स्कूल ऑफ पॉलिटेक्निक व्याळा येथे भव्य फुटबॉल व क्रिकेट स्पर्धा संपन्न झाल्यात.या स्पर्धेत अमरावती झोन मधील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी व प्रशिक्षक सहभागी झाले होते. मानव स्कूल ऑफ पॉलिटेक्निक, व्याळा येथे आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा व आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा पार पडल्या.

**Change In Name**

My old name was
**ABDUL SHARIK ABDUL RAFIK**
now my new name is
**Abdul Sharique Abdul Rafique**
Old passport no. H 8802504 Address : MOMIN PURAAR SWEET MART Akola dist akola 444001 Maharashtra

**Change In Name**

I have Changed My Name Form
**SHAIKH MOHAMMED TAHIR MOHAMMED SALIM**
TO
**MOHAMMAD TAHIR MOHAMMAD SALIM SHAIKH**
My residential Address in Near K N Collage Road, Fatema Masjid Anand 4, Karanja Dist Washim 444105

**Change In Name**

I Have Change My Name In My Passport No is (M5198667)
OLD NAME
**SYED JEELANI**
NEW NAME
**SYED JEELANI SYED KARIM**
My Residential Address is :- Huda Appartment F 1 First Floor Mankarna Plot Akola Maharashtra 4440011

# व्हॅलेंटाईन डेच्या पार्श्वभूमीवर हिंदू जनजागृती समिती आक्रमक

## ड्रग्ज, छेडछाड रोखण्यासाठी कडक कारवाईची मागणी; 'दामिनी पथक' तैनात करण्याची विनंती

**अकोला :** येत्या १४ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या 'व्हॅलेंटाईन डे'च्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच अमली पदार्थांचा वापर व महिलांची छेडछाड यासारखे प्रकार रोखावेत, या मागणीसाठी हिंदू जनजागृती समितीसह विविध हिंदुत्ववादी संघटनांनी प्रशासनाला निवेदने दिली. बुधवारी (११ फेब्रुवारी २०२६) जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयात जाऊन प्रतिनिधींनी ठोस उपाययोजनांची मागणी केली.

समितीच्या वतीने उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, काही ठिकाणी व्हॅलेंटाईन डेच्या नावाखाली आयोजित खाजगी पार्ट्यांमध्ये मद्य व अमली पदार्थांचा वापर होत असल्याच्या तक्रारी आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच तरुणींना फसविण्याच्या घटनांबाबतही सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले. शाळा-महाविद्यालयांमध्ये 'मातृ-पितृ पूजन दिन' साजरा करण्यास प्रोत्साहन द्यावे, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.




दरम्यान, पोलीस प्रशासनाकडे १४ फेब्रुवारी रोजी महाविद्यालय परिसर, उद्याने व पर्यटनस्थळांवर विशेष गस्त वाढविण्याची मागणी करण्यात आली. साध्या वेशातील पोलिसांसह 'दामिनी' व 'निर्भया' पथके तैनात करावीत, जेणेकरून महिलांच्या सुरक्षेची खात्री होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच बदल केलेल्या सायलेन्सरमुळे कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनचालकांवर आणि हुल्लडबाजी करणाऱ्यांवर वाहतूक शाखेने कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली.

हे निवेदन देताना हिंदू जनजागृती समितीचे अमोल वानखडे यांच्या नेतृत्वाखाली निकेश गुप्ता, योगेश अग्रवाल, उदय महा, अमोल पारीस, नंदकिशोर मेहेरे, प्रमोद अग्निहोत्री, अजय खोत, गिरीश कुलकर्णी, अश्विनी सरोदे, संजय निमखंडे, सुनील पाटील, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते. 'शहरातील शांतता व संस्कृतीचे जतन करण्यासाठी प्रशासन व समाजाने एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे,' असा सूर प्रतिनिधींनी व्यक्त केला. प्रशासनाने निवेदन स्वीकारून आवश्यक ती दक्षता घेण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले.

## सालासार बालाजी मंदिरात यंदा बाबा अमरनाथ दर्शन झाकी

■ प्रतिनिधी | अकोला ■

गंगानगर परिसरातील पवित्र सालासर बालाजी मंदिरात महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सालासर बालाजी सेवा समितीच्या वतीने महाशिवरात्री दि १५ फेब्रुवारी रोजी आयोजित या उत्सवात यंदा बाबा अमरनाथची शिवलिंग दर्शन झांकी साकार केली जाईल. उत्सवात दुपारी ४ वाजता पुरोहित हरीश गोगरकर व सहयोगी पुरोहितांकडून अखंड लघुरुद्रपाठ होईल. या वेळी देशभरातील विविध नद्यांच्या पाण्याने १००८ जलधाराचा अखंड सहस्त्रधारा जलाभिषेक शिवलिंगावर केला जाईल. मंदिर परिसरात अखंड 'ओम नमः शिवाय' चा जाप आयोजित केला गेला आहे. उत्सवात शिवलिंगाचा भव्य श्रृंगार करून सायंकाळी ७ वाजता सामूहिक महाआरती होईल. या भव्य महाशिवरात्री निमित्त मंदिरात रंगीत विद्युत रोषणाई व फुलांची सजावट केली जाईल.

# रमाई घरकुल योजनेतील १५७ उद्दिष्टांचा प्रश्न तापला

## बाळापुरात युवा आघाडीचा समाजकल्याण विभागाला घेराव

■ प्रतिनिधी | अकोला ■

रमाई घरकुल योजनेअंतर्गत बाळापुर तालुक्यासाठी प्राप्त झालेल्या १५७ घरकुलांच्या उद्दिष्टांचे एकाच गावात वाटप करण्याच्या शिफारशीविरोधात वंचित युवा आघाडी आक्रमक झाली. संपूर्ण तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना समसमान लाभ मिळावा, या मागणीसाठी युवा आघाडीचे प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी सहाय्यक आयुक्त मारोती वाट यांना घेराव घालत प्रश्नांची सरबत्ती केली. अखेर चुकीचे पत्र दुरुस्त करून तालुकास्तरावर समसमान वाटपाबाबत पत्र देण्याची कबुली दिल्यानंतर घेराव मागे घेण्यात आला.

रमाई घरकुल योजनेअंतर्गत प्रस्ताव मागवण्याची प्रक्रिया जिल्हा समाजकल्याण अधिकारी किंवा गटविकास अधिकारी यांच्या माध्यमातून राबविली जाते. जिल्हास्तरावरून तालुक्याला उद्दिष्ट दिल्यानंतर पंचायत समितीमार्फत ग्रामपंचायतींकडून प्रस्ताव मागवले जातात. ग्रामसभा घेऊन पात्र लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यात येतात व ते पंचायत समितीकडे सादर केले जातात. त्यानंतर तालुका स्तरीय समिती पडताळणी करून प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्ह्याकडे पाठवते.



मात्र बाळापुर तालुक्यात काही कर्मचारी व लाभ मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेल्या रॅकेटकडून वारंवार मागणी करूनही प्रस्ताव सादर करण्यात येत नसल्याचा आरोप करण्यात आला. दरम्यान, इतर तालुक्यांतील शिल्लक १५७ घरकुलांचे उद्दिष्ट बाळापुर तालुक्याकडे वळविण्यात आले होते. तथापि, माजी समाजकल्याण सहायक आयुक्त अनिता राठोड यांनी नियम डावलून संपूर्ण उद्दिष्ट एकाच गावात टाकण्याची शिफारस केल्याचा आरोप युवा आघाडीने केला. यावर वंचित युवा आघाडीने हरकत घेत आंदोलनाचा इशारा दिला होता.

या पार्श्वभूमीवर बुधवारी समाजकल्याण विभागात जिल्हा युवा पदाधिकाऱ्यांनी घेराव घालत शासन निर्णयानुसार दुरुस्तीपत्र देण्याची मागणी लावून धरली. सहाय्यक आयुक्त मारोती वाट यांनी बाळापुर गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आलेले पत्र दुरुस्त करून रमाई घरकुल योजनेचा निधी संपूर्ण तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांत समसमान वाटप करण्याबाबत पत्र देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी श्रीकांत घोगरे (युवा जिल्हाध्यक्ष), राजकुमार दामोदर (जिल्हा महासचिव), संतोष वनवे, सम्राट तायडे (पातूर तालुका अध्यक्ष), मिलिंद दामोदर (अकोला तालुका अध्यक्ष), सचिन शिराळे, नागेश उमाळे (शहर प्रसिद्धी प्रमुख), आकाश जंजाळ (तालुका प्रसिद्धी प्रमुख), युवराज डोंगरे, निशिकांत सदार, निखिल वाकोडे, कुणाल सरदार, अमोल वानखडे, अमोल तिरपुडे, विजय पातोडे, आनंद पातोडे, आनंद शिरसाट, शुभम नाईक, रवी वानखडे, विक्की कांबळे, सुरेश कलोरे, निकी डोंगरे आदी उपस्थित होते.

# घंटागाड्यांची अनियमितता स्वच्छता कर भरूनही वर्धेकर त्रस्त

## २० पैकी केवळ १० गाड्या कार्यरत; कंत्राटदारावर कारवाईची मागणी

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा नगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन योजनेतर्गत शहरातील २० प्रभागांमध्ये ओला-सुका कचरा संकलनासाठी २० घंटागाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. घरगुती व व्यावसायिक मालमत्तांवरून दरवर्षी ३०० ते ७५० रुपये स्वच्छता कर आकारला जातो. मात्र प्रत्यक्षात नागरिकांना नियमित सेवा मिळत नसल्याची तक्रार वाढत आहे.

नियमाप्रमाणे प्रत्येक प्रभागात दररोज एक घंटागाडी, दोन कर्मचारी आणि ध्वनीप्रणालीसह कचरा संकलन होणे अपेक्षित आहे. परंतु सध्या केवळ १० गाड्याच कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे काही भागांत एक-दोन दिवसाआड गाडी येते, तर काही ठिकाणी अनेक दिवस सेवा मिळत नाही. परिणामी नागरिकांना घराजवळच कचरा ठेवावा लागत असून शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे.कार्यरत गाड्यांची देखभालही अपुरी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गाड्यांची नियमित स्वच्छता व सर्व्हिसिंग होत नसल्याने दुर्गंधीची समस्या



निर्माण होत आहे. तसेच काही ठिकाणी कचरा संकलनासाठी वापरण्यात येणारे ट्रॅक्टर व लोडरही कचऱ्याने भरलेले दिसत असल्याची तक्रार आहे.दरम्यान, कंत्राटदाराने करारातील अटींचे पालन केले नाही तर दंडात्मक कारवाई का होत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. बिले मंजूर करताना सेवा तपासली जाते का, याबाबतही चर्चा सुरू आहे.सदर प्रकरणी तातडीने उपाययोजना करून प्रत्येक प्रभागात नियमित घंटागाडी पाठवावी, अशी मागणी नगरसेवक यशवंत झाडे यांनी केली आहे. प्रशासनाने या तक्रारींकडे गांभीर्याने लक्ष देऊन शहरातील स्वच्छता व्यवस्था सुधारावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

# गुन्हेगारी वार्ता

### ट्रॅक्टरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**समुद्रपूर** - तालुक्यातील निरगुडी फाटा येथे अज्ञात ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. हर्षल विशाल पावडे (२१) रा. चारगाव खूर्द, जि. चंद्रपूर असे मृतकाचे नाव आहे. तो एमएच-३४ सीएन-२६७८ क्रमांकाच्या दुचाकीने गावाकडे जात असताना भरधाव ट्रॅक्टरने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातात तो गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर ट्रॅक्टरचालक पसार झाला असून समुद्रपूर पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### बोलेरोच्या धडकेत पती-पत्नी जखमी

**आर्वी** - सावळापूर घाटात अज्ञात मालवाहू बोलेरोने दुचाकीला धडक दिल्याने पती-पत्नी जखमी झाले. किसना विशाल राठोड (४५) व पत्नी गीता राठोड रा. आगरगाव तांडा अशी जखमींची नावे आहेत. दोघे एमएच-२७ बीएम-२२४६ क्रमांकाच्या दुचाकीने परत येत असताना बोलेरोने जोरदार धडक दिली. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाला. जखमींना अमरावती येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. आर्वी पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

### दारूच्या नशेत मुलाकडून आई-वडिलांना मारहाण

**हिंगणघाट** - लग्नासाठी घर बांधले नाही, या कारणावरून दारूच्या नशेत मुलाने आई-वडिलांना मारहाण केल्याची घटना उघडकीस आली. गणेश गिरी (२८) याने वडील प्रभाकर गिरी (६०) व आई नलू गिरी (५०) यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दोघे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आरोपीला दारूचे व्यसन असून तो नेहमीच घरात वाद घालत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### घरफोडीत ५३ हजारांचा सोन्याचा ऐवज लंपास

**कारंजा (घा.)** - घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने ५३ हजार रुपये किमतीचा सोन्याचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघड झाली. राजेंद्र वंजारी हे दुकानात असताना चोरट्याने घरात प्रवेश करून सोन्याची पोत, कानातील टाप्स व लॉकेट असा ऐवज लंपास केला. घटना उघडकीस येताच पोलिसांना माहिती देण्यात आली. कारंजा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

### शेताच्या वादातून परस्परांविरोधात गुन्हे

**सेवाग्राम/सेलू** - शेतातील पाणी व जमिनीच्या वादातून मारहाणीच्या घटना घडल्या. सेवाग्राम येथे पांदण रस्त्यावर पाणी सोडल्याच्या कारणावरून दोन शेतकऱ्यांमध्ये वाद होऊन परस्परांविरुद्ध तक्रारी दाखल झाल्या. तर सेलू तहसील कार्यालय परिसरात शेती हडपल्याचा आरोप करत दोन जणांनी दांपत्याला शिवीगाळ व मारहाण करण्याची धमकी दिल्याची तक्रार आहे. संबंधित पोलिस ठाण्यांत गुन्हे नोंदविण्यात आले असून तपास सुरू आहे.

# मसाले पिक उत्पादनासाठी अनुदान योजना

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रगत शेतीकडे वळविण्यासाठी कृषि विभागाने योजनांचे अभिसरण धोरण स्विकारले आहे. या धोरणांतर्गत आता खरीप हंगामात हळद, आले आणि मिरचीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ लागवडीसाठी नव्हे तर आधुनिक तंत्रज्ञानासाठी विविध योजनांचा लाभ एकाचवेळी घेता येणार आहे. यासाठी हळद, आले, मिरची लागवडीकरीता मजूर खर्च, खड्डे खोदणे, बी-बियाणे, रोपे खरेदी, खते शेणखत, रासायनिक खत, पिक संरक्षण, जैविक रासायनिक फवारणी खर्चासाठी अनुदान देण्यात येणार आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत बी वर्गीय मसाले पिक मिरची करीता ५० हजार रुपये हेक्टर मर्यादेनुसार सर्वसाधारण क्षेत्राकरीता प्रती लाभार्थी २० हजार रुपये हेक्टर, कंदवर्गीय मसाले हळद व आले पिकासाठी १ लाख रुपये हेक्टर मर्यादेनुसार सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० हजार रुपये हेक्टर, प्लास्टीक मल्चींग, जुट, ॲग्रो टेक्सटाईल, बायोवड ग्रेडेबल आच्छादनाकरीता ४० हजार रुपये हेक्टर मर्यादेनुसार खर्चाच्या ५० टक्के मर्यादेत प्रति लाभार्थी २० हजार रुपये हेक्टर, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत ठिंबक सिंचनाकरीता १ लाख २७ हजार ५०१ रुपये व तुषार सिंचन प्रति संचाकरीता २४ हजार १९४ रुपयाच्या मर्यादेत अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना ८० टक्के व इतर शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. अभिसरणाचे फायदे : ठिंबक सिंचनामुळे पाण्याची ४० ते ५० टक्के बचत होते आणि खत व्यवस्थापनामुळे पिकाची जोमदार वाढ होते. प्लास्टीक मल्चिंग पेपरमुळे तण वाढत नाही, परिणामी मजूरीच्या खर्चात बचत होते. प्लास्टीक मल्चिंग, ठिंबक सिंचन व फारटीगेशन या तिन्ही बाबींचा एकत्रित वापर केल्यास उत्पादनाची गुणवत्ता सुधारते आणि बाजारात भावात वाव निर्माण होते. योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.gov.in या एकाच ठिकाणी फलोत्पादन आणि सिंचन या दोन्ही घटकांतर्गत अर्ज करावा. किंवा घरबसल्या महाविस्तार एआय ॲप द्वारे फार्मर आयडी मार्फत अर्ज करता येतो. अर्ज करतांना हळद, आले, मिरची लागवडीसोतबच मल्चिंग आणि ठिंबक सिंचन या बाबीची निवड करावी. योजनेच्या अधिक माहितीसाठी गावातील सहाय्यक कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी यांचे संपर्क साधावा, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

# अमृत संस्थेची गोवा येथील सरकारी अधिकाऱ्यांकरीता प्रशिक्षणासाठी निवड

**वर्धा/ जनमाध्यम**

महाराष्ट्र शासनाच्या अमृत या स्वायत्त संस्थेकडून राबविल्या जाणाऱ्या दर्जेदार ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रमाची किर्ती गोव्यापर्यंत पोहोचली आहे. गोवा सरकारच्या ३० अधिकाऱ्यांना अमृत संस्थेने प्रशिक्षण द्यावे, अशी मागणी गोवा सरकारने केली आहे. या अधिकाऱ्यांना संस्थेच्या वतीने प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून तिचे मुख्यालय पुण्यात आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी, त्यांच्यातून उद्योजक घडवण्यासाठी ही संस्था विविध योजनांसह वेगवेगळ्या प्रकारचे उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमही राबवते.त्यामध्येच ड्रोन पायलट बनण्यासाठीच्या प्रशिक्षणाचाही समावेश आहे. त्यासाठी अमृत ड्रोन मिशन या नावाने मोहीम राबवली जाते. हा प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत दर्जेदार असून, लक्षित घटकांसाठी तो मोफत राबवला जातो. या प्रशिक्षणाचा कार्यक्रमाचा लाभ आजपर्यंत १०० हून अधिक लाभार्थ्यांनी घेतला असून, त्यातील काही जणांनी यातून प्राप्त केलेल्या कौशल्याच्या आधारे चांगली कमाई करण्यासही सुरुवात केली आहे. राज्यात ८ ठिकाणी संस्थेतर्फे प्रशिक्षण दिले जाते.

ड्रोनच्या वापराची क्षेत्रे आज विस्तारली असून, शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, भूमापन (सर्व्हे), व्हिडिओग्राफी व फोटोग्राफी, सरकारी प्रकल्प निरीक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर केला जातो. त्यामुळे या क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे. हे नेमके ओळखून अमृत संस्थेने ड्रोन मिशनची सुरुवात केली. अमृत संस्थेच्या या दर्जेदार अभ्यासक्रमाची कीर्ती ऐकून गोवा सरकारने आपल्या ३० अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्याचा प्रस्ताव अमृत संस्थेकडे ठेवला आहे.गोवा सरकारच्या नियोजन, सांख्यिकी आणि मूल्यांकन संचालनालयाचे संचालक विजय सक्सेना यांनी या संदर्भात अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना पत्र पाठवले आहे. 'अमृत संस्थेच्या अमृत ड्रोन मिशनबद्दल आम्हाला कळले. यासाठी अमृत संस्थेने तयार केलेला अभ्यासक्रम अत्यंत उच्च दर्जाचा आहे. तसेच यातील प्रशिक्षकही अत्यंत अनुभवी आणि सक्षम आहेत. गोवा सरकारच्या तीस अधिकाऱ्यांना स्मॉल रिमोट पायलट सर्टिफिकेट प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव असून, हे प्रशिक्षण अमृत संस्थेच्या माध्यमातून देण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे,' असे सक्सेना यांनी त्या पत्रात लिहिले आहे.दरम्यान, अशा या दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ राज्यातील लक्षियत गटातील जास्तीत जास्त जणांनी घ्यावा, असे आवाहन जोशी यांनी केले आहे.

# गजाननगरात संत गजानन महाराज प्रकटदिन महोत्सव

**आर्वी/ जनमाध्यम**

श्री संत गजानन महाराज मंदिर, गजानन नगर येथे प्रकटदिन महोत्सव भक्तिभावात आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला. परिसर दोन दिवस 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

श्रींची पालखी गजानन नगर, एकविरा नगर, मुडे लेआउट, चव्हाण लेआउट परिसरातून काढण्यात आली. नागरिकांनी रांगोळ्या व फुलांच्या सजावटीने पालखीचे स्वागत केले. महिला भजन मंडळाच्या सहभागामुळे सोहळ्याला भक्तिरस लाभला. लहान मुलांनी विविध वेशभूषा करून पालखी परिक्रमेतील सहभागाने वातावरण रंगतदार केले.प्रवचन व कीर्तन कार्यक्रमांनी उपस्थितांना संत विचारांची प्रेरणा दिली. सकाळी अभिषेक व तीर्थस्थापना पार पडली. मान्यवरांच्या उपस्थितीत सेवेकरी व रांगोळी स्पर्धेतील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. महाप्रसादाचा लाभ मोठ्या संख्येने भक्तांनी घेतला.महोत्सव यशस्वी करण्यासाठी गजानन नगरवासी व समस्त भक्तगण यांनी परिश्रम घेतले.

# ओबीसी जनगणना नसेल तर नगरपरिषदेने पुढाकार घ्यावा

**वर्धा/ जनमाध्यम**

केंद्र सरकारने आगामी जनगणना प्रक्रियेत ओबीसींचा स्पष्ट उल्लेख न केल्याचा आरोप करत, सरकार ओबीसी जनगणना करणार नसेल तर स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वतः पुढाकार घ्यावा,अशी ठाम मागणी राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाने केली आहे. या मागणीसंदर्भात मोर्चाच्या शिष्टमंडळाने वर्धा नगरपरिषद अध्यक्ष सुधीर पांगुळ यांना निवेदन सादर केले.

केंद्रीय गृह विभागाने २२ जानेवारी रोजी प्रसिद्ध केलेल्या जनगणना २०२७ संदर्भातील



राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाचे नगरपरिषदेला निवेदन

राजपत्रात अनुसूचित जाती व जमातींचा उल्लेख आहे; मात्र ओबीसी वर्गासंदर्भात स्पष्ट शब्दयोजना नसल्याचा मुद्दा मोर्चाने उपस्थित केला. आगामी जनगणना ही जातजनगणना असेल, अशी घोषणा यापूर्वी करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष सूचना पत्रकात ओबीसींचा उल्लेख नसल्याने सरकार आपल्या भूमिकेपासून मागे सरकल्याचा आरोप करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर मोर्चाने ८ जुलैपासून ओबीसी जनगणना अभियान सुरू केले असून, जनगणना प्रक्रियेदरम्यान 'अन्य' या स्तंभासमोर ओबीसी व संबंधित जात नमूद करण्याबाबत स्थानिक प्रशासनाने सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदनात नगरपरिषदेत ओबीसी विशेष घटक योजना सुरू करण्याचाही प्रस्ताव आहे. विद्यार्थ्यांपासून कारागीर, बलुतेदार व गरजू महिलांसाठी सामाजिक सुरक्षा व विकास सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी अभ्यास समिती गठीत करावी, असे सुचविण्यात आले. तसेच मोफत माहिती व सेवा केंद्र, संतभवन उभारणी, ओबीसी गणना समिती स्थापन, विकास योजनांची माहिती देणारे इलेक्ट्रॉनिक फलक, इनडोअर क्रीडा केंद्र, वार्षिक सांस्कृतिक महोत्सव, सामाजिक अंकेक्षण, गांधी-विनोबा जीवनकार्यावरील लाईट शो आदी उपक्रमांचे प्रस्तावही सादर करण्यात आले.निवेदन सादर करताना सामाजिक कार्यकर्त्या नुतन माळवी, ॲड. अशोक यावले, दिलीप सुरकार, अस्लम खातमी, वसीम शेख आदी उपस्थित होते.



# एकाच नंबरच्या दोन स्कूट्या!

### वाहतूक पोलिसांचा दणका, निष्पाप मालकाला १ हजारांचा दंड;

### बनावट नंबर प्लेटमुळे वाहनमालक अडचणीत

**सेलू/ जनमाध्यम**

कायद्याचा धाक गुन्हेगारांवर की निष्पापांवर वाशीम जिल्ह्यात उघड झालेल्या एका धक्कादायक प्रकाराने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. एकाच नोंदणी क्रमांकाच्या दोन वेगवेगळ्या स्कूट्या रस्त्यावर धावत असल्याचे समोर आले असून, या गोंधळात केळझर (ता. सेलू) येथील शशिकांत (बंटी) माधव इरुटकर या निष्पाप वाहनमालकाला तब्बल १ हजार रुपयांचा दंड भरावा लागला आहे.

एमएच ३२ ११५५ क्रमांकाची लाल रंगाची होंडा स्कूटी इरुटकर यांच्या नावावर अधिकृतरीत्या नोंदणीकृत आहे. मात्र याच क्रमांकाची काळ्या रंगाची दुसरी स्कूटी वाशीम शहरात फिरताना दिसली. दि. १६ जानेवारी रोजी हेल्मेट न घातल्यामुळे त्या अज्ञात वाहनचालकावर ई-चलानद्वारे कारवाई झाली. परंतु चलानातील क्रमांकाच्या आधारे दंडाची नोटीस थेट इरुटकर यांच्या घरी पोहोचली.त्या दिवशी माझी स्कूटी वाशीमला गेलीच नव्हती, असे स्पष्ट सांगूनही प्रणालीतील नोंदीसमोर त्यांचा आवाज क्षीण ठरला. कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकालाच प्रशासनाच्या यंत्रणेतील त्रुटींची किंमत मोजावी लागल्याने संताप व्यक्त होत आहे.

बनावट नंबर प्लेटचा 'काळाबाजार' सुरू वाहनांवर बनावट किंवा समान क्रमांकाच्या नंबर प्लेट लावणे हा केवळ नियमभंग नाही, तर गंभीर गुन्हा आहे. अशा वाहनांचा वापर एखाद्या अपघातात किंवा गुन्हेगारी कृत्यात झाल्यास मूळ वाहनमालक अडचणीत सापडू शकतो. मग जबाबदारी कोणाची इरुटकर यांनी संबंधित वाहनधारकाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

पोलिसांनी चौकशी सुरू केली असली तरी नागरिकांच्या मनात प्रश्न कायम आहे, ई-चलान प्रणालीतील पडताळणीची जबाबदारी कोण घेणार,नागरिकांनो, सावध रहा तज्ज्ञांच्या मते, वाहनमालकांनी नियमितपणे ई-चलानची माहिती तपासावी. अनोळखी दंड आल्यास तत्काळ पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवावी.

एकाच क्रमांकाच्या वाहनांचा वाढता प्रकार ही धोक्याची घंटा आहे. प्रशासनाने बनावट नंबर प्लेटच्या टोळीवर लगाम घालला नाही, तर उद्या कोणत्याही निष्पाप नागरिकाला अशाच प्रकारे दंडाची झळ बसू शकते.

कायदा कागदावर नव्हे, तर रस्त्यावरही समानतेने लागू व्हायला हवा अन्यथा नागरिकांचा संताप उफाळून येईल, यात शंका नाही.

# जिल्हाधिकारी कार्यालयात सुरक्षित इंटरनेट दिन साजरा

**वर्धा**- सुरक्षित, जबाबदार आणि सकारात्मक इंटरनेट वापराचा संदेश देणारा सुरक्षित इंटरनेट दिन दरवर्षीप्रमाणे यंदाही फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमास प्रभारी अपर जिल्हाधिकारी श्रीपती मोरे, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमामध्ये ऑनलाइन सुरक्षितता, वैयक्तिक गोपनीयता, सायबर गुन्हे, सायबर छळ तसेच डिजिटल साक्षरता याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान एनआयसीचे अतिरिक्त जिल्हा सूचना अधिकारी सारंग बन्सोड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना इंटरनेटचा सुरक्षित वापर,सायबर घटनांची तक्रार नोंदविण्याच्या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देत जनजागृती केली.

**नावात बदल**

माझे पूर्वी ISMAIL ALLI RAMZAN ALLI असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील ISMAIL RAMJAAN SAYYAD ALI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता:-
टाकळी पोस्ट सिरसगाव बाजार
ता.हिंगणघाट जिल्हा वर्धा
४४२३०१

**नावात बदल**

माझे पूर्वी GULAM MURTUZA GULAM NABI असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील GULAM MURTUZA GULAM NABI SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता:-
जाकीर हुसेन कॉलनी वर्धा
४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी GULAM MUSTAFA SHEKH SATTAR MIYA असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील GULAM MUSTAFA SATTAR SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता:-
हनुमान नगर चितोडा वर्धा
४४२००१

# वित्तीय साक्षरता सप्ताहाचे उद्घाटन

**वर्धा/ जनमाध्यम**

भारतीय रिझर्व्ह बँक व राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या दिशानिर्देशानुसार ९ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत जिल्ह्यात विविध ठिकाणी वित्तीय साक्षरता सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाचे उद्घाटन बँक ऑफ इंडियाचे आंचलिक व्यवस्थापक कुश गणहोत्रा यांच्या हस्ते संत गाडगेबाबा स्मारक सभागृह, कृष्णनगर येथे करण्यात आले.

यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चेतन शिरभाते, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नागपूर येथील सहायक प्रबंधक महेश थुल, आर्थिक व्यवस्थापन कक्षाचे जिल्हा व्यवस्थापक सुरज बोबडे, बँक ऑफ इंडियाच्या ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेचे संचालक श्याम अत्यालगडे आदी उपस्थित होते.यावेळी कुश गणहोत्रा यांनी री-केवायसी बाबत मार्गदर्शन केले. चेतन शिरभाते यांनी सायबर फसवणूक, डिजिटल फसवणूक, मनीम्युल अकाऊंट व त्यापासून बचावाचे उपाय याबाबत मार्गदर्शन केले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ७८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

# आज श्री हव्याप्रमध्ये सैनिकांना स्वराजंली

## -राज्यस्तरीय आतंरमहाविद्यालयीन स्पर्धा

**अमरावती/प्रतिनिधी:-** शेकडो वर्षांच्या गुलामीला छेद देत भारतभुमीवर स्वातंत्र्याचा सुर्य उगवण्याकरीता असंख्य देशभक्त, हुतात्मांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्याकरीता वंदे मातरम हे गीत प्रत्येक देशभक्ताला नवचेतना देत होते. स्वातंत्र्यानंतर भारतभुमीच्या सैनिकांनी देशाच्या रक्षणाकरीता आपले बलिदान दिले आहे आणि देत आहेत. या नररत्नांच्या बलिदानाची प्रेरणा वर्तमान समाजाला प्रामुख्याने युवा पीढीला मिळावी याकरीता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे नवअभियंते विद्यार्थी आज स्वरांजली वाहणार आहेत.

श्री हव्याप्र मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभारकराव वैद्य यांची प्रेरणा व वंदे मातरम गीताला १५० वर्ष वर्धापनच्या निमित्याने आज गुरूवार दि.१२ फेब्रुवारी रोजी ११ वाजता मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृह येथे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन देशभक्तीपर गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एस दाळू यांचे मार्गदर्शन व विद्यार्थी विकास कक्ष (स्टूडंट डेव्हलपमेंट सेल) चे विभाग प्रमुख प्रा. शुभम ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. सदर स्पर्धा खुली स्वरूपाची असून इच्छुक विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने या स्पर्धेत सहभाग घेत नवपीढीला प्रेरणा द्यावी असे आवाहन प्रा. शुभम ठाकरे यांनी केले आहे.

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१०५/२०२६ ने.ता.१८.०३.२०२१६

**अर्जदार -**
१. शरद अंबादास भागवत, वय ५० वर्षे, धंदा - शेती
२. रविंद्र अंबादास भागवत, वय ४८ वर्षे, धंदा - शेती
३. उमेश अंबादास भागवत, वय ४६ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.बऱ्हाणपूर, पो.रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. सूर्यकांता रविंद्र काचरे, वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेलोरा, पो.आलोडा, ता.वरुड, जि.अमरावती
५. सुनंदा भीमरावजी गोहत्रे, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.माधान, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. संगीता प्रकाशराव शेकार, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बोराळा, ता. चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ ते ६ यांचे वडील **नामे अंबादास बळीरामजी भागवत** हे दि.**०६.१२.२०२४** रोजी पी.डी.एम.सी.हॉस्पीटल अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झालले आहे. तसेच अर्जदार नं.१ ते ६ यांची आई नामे **शांता अंबादासराव भागवत** हिचा दि.०५.०१.२०२५ रोजी पी.डी.एम.सी.हॉस्पीटल अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८०/२०२६ ने.ता.१७.०३.२०२१६

**अर्जदार -**
१. श्रीमती कोकीळा ज्ञानेश्वर खैरकर, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.सागर ज्ञानेश्वर खैरकर,, वय ३३ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.संकेत ज्ञानेश्वर खैरकर, वय २७ वषे, धंदा - शेती
सर्व रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ३ चे वडील **नामे ज्ञानेश्वर यशवंतराव खैरकर** हे दि.**०२.११.२०२५** रोजी High-tech Critical Multispeciality Hospital & Research Centre, Amravati, जि.अमरावती येथे मयत झालली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १०.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१०४/२०२६ ने.ता.२३.०३.२०२१६

**अर्जदार -**
१. न्याज बी राजे खॉं, वय ७७ वर्षे, धंदा - घरकाम
२. फिरोज खान राजे खान, वय ४६ वर्षे, धंदा - मजुरी
दोघेही रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ चे वडील **नामे राजे खॉं हयात खॉं** हे दि.**१५.१०.१९८७** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८९/२०२६
**निवृत्ती व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१७.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Nivrutti Dnyaneshwar Jhingale
Age 45 Yrs. Occu.: Labour
R/o Near Tisara Nagoba, Ratanganj, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **ज्ञानेश्वर जानराव झिंगळे आणि कांता ज्ञानेश्वर झिंगळे** हे अनुकमे दिनांक 08.03.2020 व 11.08.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निवृत्ती व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निवृत्ती व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.शे.रशीद शे.सुभान**, पत्ता नौबागपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२९ संगणक मालमत्ता क्र.२५५१९, जुना मालमत्ता क्र.२९०००४१५ नझुल शिट क्र.... प्लॉट नं..... ही कर आकारणी नोंदवहीनुसार श्री.शे.सुभान शे.महेबुब या नावाने असून वरील अर्जदार यांनी **श्री.शे.रशीद शे.सुभान** या भोगवटदाराच्या नावाने फेरफार घेण्याकरीता प्रतिज्ञापत्राद्वारे या न्यायालयामध्ये दिनांक ११.०२.२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतु:सिमा -

**पुर्वेस** - सै.हनीस सै.रसूल यांचे घर
**पश्चिमेस** - रशिदाबी शे.महेमुद हिचे घर
**दक्षिणेस** - उमरखॉं यांचे घर
**उत्तरेस** - सरकारी रोड

शिक्का

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८०/२०२६ ने.ता.१७.०३.२०२१६

**अर्जदार -**
१. श्रीमती शांता श्रीरामजी कथीलकर, वय ८७ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.संतुराम श्रीरामजी कथीलकर वय ६७ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.शंकर श्रीरामजी कथीलकर, वय ६२ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.काटपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. निर्मला रामकृष्ण अमृते, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. प्रमिला प्रल्हादराव सदाफळे, वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ५ चे वडील **नामे श्रीराम नथ्थुजी कथीलकर** हे दि.**०४.०३.२००३** रोजी काटपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## वैद्यकीय प्रशासन अधिकारी

### (महाराष्ट्र शासन)

### महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मोती नगर, अमरावती

दुरध्वनी क्र.०७२१-२९९२९४९, ई-मेल amravati.amo@gmail.com

**अमरावती विभागातील अमरावती शहरा नजीकच्या विमा धारकांच्या आरोग्य तपासणीकरीता संलग्नित प्रयोगशाळा (Tic-Up) करणेकरीता**

**१०० दिवस कार्य**क्रमा अंतर्गत विमा धारकांच्या HB, Lipid Profile, HbA1c, Sr.Creatinine या रक्त तपासणी करावयाच्या असून अमरावती विभागा अंतर्गत अमरावती शहर व शहरानजिकच्या इच्छुक उमेदवारांनी खालील निवेदन पत्र भरुन दिनांक १३.०२.२०२६ पर्यंत मा.वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महा-राकावी सोसायटी, मुकेश शिरभाते २ रा माळा शिरभाते मार्केट, अमरावती-४४४६०६ या पत्त्यावर पोस्टाने अथवा हात बटवाड्याने पाठवावेत.

**वैद्यकीय प्रशासन अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी,**
**अमरावती**

**आवेदन पत्राचा नमुना खालीलप्रमाणे**

प्रति,
वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
राज्य कामगार विमा सोसायटी, अमरावती

**विषय - पॅथॉलॉजी लॅब टाय-अप करण्याबाबत**
**संदर्भ -**

**मा.महोदया,**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी जाहीर केलेल्या १०० दिवस कार्यकमाचे औचित्य साधून १० लाख विमा कामगारांसाठी IP Awareness Camp and Preventive Health check-up Camp for Detection of Occupational and Non-Communicable Disease अंतर्गत खालील CGHS दरानुसार विमेदारांची वैद्यकीय तपासणी करण्याकरीता माझी NABL/Non NABL Lab (प्रयोगशाळा) CGHS दरात संलग्नित (टाय-अप) करण्यास इच्छुक आहे.

| Sr.No. | Test | Non NABL | NABL |
| --- | --- | --- | --- |
| 1 | HB | 38 Rs. | 45 Rs. |
| 2 | Lipid Profile | 375 Rs. | 441 Rs. |
| 3 | HbA1C | 230 Rs. | 270 Rs. |
| 4 | Sr.Creatinine | 77 Rs | 90 Rs. |

तरी, माझी NABL/Non NABL Lab CGHS दरानुसार संलग्नित करण्यात यावी ही नम्र विनंती.

(क्र./अम/जाही/१०५८/२०२५-२०२६) **सही व शिक्का**

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५३१/२०२५ ने.ता.१७.०३.२०२६

**अर्जदार :**
१. गजानन बळवंतराव ढोबळे, वय ६५ धंदा - शेती
२. अशोक बळवंतराव ढोबळे, वय ६९ धंदा - शेती
दोघेही रा.रतनखेडा सायखेडा, पो.कारंजा बहीरम, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक सुभद्रा बळवंतराव ढोबळे** यांचा मृत्यू दिनांक **१७.०१.२०११** रोजी तसेच **मृतक बळवंतराव आत्मारामजी ढोबळे** यांचा मृत्यू दिनांक **०५.१०.२००६** रोजी रतनखेडा सायखेडा, पो.कारंजा बहीरम येथे राहत्या घरी झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५३१/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

प्रो.क्र.६९/२०२६
दिनांक २२.०१.२०२६

**नमुना कमांक ७**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**
**श्रीमती पी.एम.चव्हाण याचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

**अंमलबजावणीचा आदेश का देण्यात येऊ नये, याचे कारण दाखविण्याविषयी नोटीस (आज्ञावली २९, नियम १६)**

**नियमित दरखास्त २६/२०२४**
**अजय विनायकराव राऊत --वि-- विजय ज्ञानेश्वरराव तायवडे**
**पुढील ता.२३.०२.२०२६**

प्रति,
विजय ज्ञानेश्वरराव तायवडे,
प्रो.प्रा.भवानी ट्रेडींग कंपनी, प्रभाग नं.६, शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती (महाराष्ट्र)

ज्याअर्थी **अजय विनायकराव राऊत** यांनी दावा कमांक यामाधील हुकूमनामा त्यांच्याकडे अभिहस्तांकित करुन (किंवा अभिहस्तांकित न करता) हस्तांतरित करण्यात आला आहे. या सबबीवरुन उक्त हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे. म्हणून अंमलबजावणीचा आदेश का देण्यात येऊ नये, याचे कारण दाखविण्यासाठी तुम्हाला तारीख **२३.०२.२०२६** रोजी या सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, चांदूर बाजार न्यायालयासमोर हजर व्हावे लागेल याची तुम्ही यावरुन दखल घ्यावी.

आज **२१.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**चांदूर बाजार, जि.अमरावती**

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५४/२०२६ ने.ता.१२.०३.२०२६

**अर्जदार :**
१. रंजना गजानन नागापुरे, वय ४८ धंदा - घरकाम
२. शुभम गजानन नागापुरे, वय १२ धंदा - शिक्षण
३. दुर्गा गजानन नागापुरे, वय १८ धंदा - शिक्षण
४. रतनाबाई सहदेवराव नागापुरे, वय ७५ धंदा - घरकाम
अर्जदार नं.२ अज्ञान तर्फे अ.पा.क.अर्जदार नं.१
सर्व रा.गोविंदपूर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक गजानन सहदेवराव नागापूरे** यांचा मृत्यू दिनांक **१६.०१.२०१८** रोजी गोविंदपूर करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे वृध्दापकाळाने झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

प्रो.नं.४२२/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०९.०२.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./६४/२०२६ दिनांक ११.०३.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. रत्नकला बळीराम कोल्हे, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्रीकृष्ण बळीराम कोल्हे, वय ४६ वर्षे, धंदा - शेती
३. गोविंद बळीराम कोल्हे, वय ४५ वर्षे, धंदा - शेती
४. कांता बजरंग कोल्हे, वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
५. आरती बजरंग कोल्हे, वय २५ वर्षे, धंदा - घरकाम
६. पूजा बजरंग कोल्हे, वय २३ वर्षे, धंदा - घरकाम
७. कुलदीप बजरंग कोल्हे, वय २१ वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा.हिंगणी मिर्झापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **बळीराम चिंतामण कोल्हे** हे दिनांक **३०.०५.२०१०** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **बळीराम चिंतामण कोल्हे** यांचे नांवे मौजा हिंगणी मिर्झापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट क.२१८ हे होते. सदरची शेती घुगशी बॅरेज मध्यम प्रकल्प, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला यांचेकरीता मा.नियामक मंडळ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी धरण/बुडीत क्षेत्राकरीता संपादित केली आहे.

आज दि.०९.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.७९/२०२६ ने.ता.१६.०३.२०२१६

**अर्जदार -**
१. श्री.गोकुल महादेवराव निस्वादे, वय ५१ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.विजय महादेवराव निस्वादे, वय ५४ वर्षे, धंदा - शेती
३. विमल नामदेवराव लांडगे, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. कमलाबाई बाबाराव गायकवाड, वय ७४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.साहुर, ता.आष्टी, जि.वर्धा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांची आई **मिराबाई महादेवराव निस्वादे** हे दि.**३१.०७.२०२३** रोजी पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०७.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक २२९/२०२५ ने.ता.११.०३.२०२६

**पिटीशनर - रेशमा गुलाबराव पवार**

**-- वि --**

**रिस्पांडंट - शुभम सुनील भोसले व ईतर**

**गैरअर्जदार- १. शुभम सुनील भोसले**
**२. सतीश सुनील भोसले**
**रा.भगोरा. पो.अनभोरा, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला**

Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation

ज्याअर्थी वरील पिटीशनर **रेशमा गुलाबराव पवार** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०२ अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार नं.**१ शुभम सुनील भोसले व नं.२ सतीश सुनील भोसले,** यांना पेपर प्रसिध्दीद्वारे न ोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक ११.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०.०२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

अमरावती
दिनांक १०.०२.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक २३०/२०२५ ने.ता.११.०३.२०२६

**पिटीशनर - देवानंद श्रावण शिरसाठ**

**-- वि --**

**रिस्पांडंट - शुभम सुनील भोसले व ईतर**

**गैरअर्जदार- १. शुभम सुनील भोसले**
**२. सतीश सुनील भोसले**
**रा.भगोरा. पो.अनभोरा, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला**

Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation

ज्याअर्थी वरील पिटीशनर **देवानंद श्रावण शिरसाठ** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०२ अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार नं.**१ शुभम सुनील भोसले व नं.२ सतीश सुनील भोसले,** यांना पेपर प्रसिध्दीद्वारे न ोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक ११.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०.०२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

अमरावती
दिनांक १०.०२.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक २२८/२०२५ ने.ता.११.०३.२०२६

**पिटीशनर - हरिभाऊ रामभाऊ कुकडकर**

**-- वि --**

**रिस्पांडंट - शुभम सुनील भोसले व ईतर**

**गैरअर्जदार- १. शुभम सुनील भोसले**
**२. सतीश सुनील भोसले**
**रा.भगोरा. पो.अनभोरा, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला**

Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation

ज्याअर्थी वरील पिटीशनर **हरिभाऊ रामभाऊ कुकडकर** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०२ अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार नं.**१ शुभम सुनील भोसले व नं.२ सतीश सुनील भोसले,** यांना पेपर प्रसिध्दीद्वारे न ोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक ११.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०.०२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

अमरावती
दिनांक १०.०२.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक २२७/२०२५ ने.ता.११.०३.२०२६

**पिटीशनर - वंदना देवानंद शिरसाठ**

**-- वि --**

**रिस्पांडंट - शुभम सुनील भोसले व ईतर**

**गैरअर्जदार- १. शुभम सुनील भोसले**
**२. सतीश सुनील भोसले**
**रा.भगोरा. पो.अनभोरा, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला**

Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation

ज्याअर्थी वरील पिटीशनर **वंदना देवानंद शिरसाठ** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०२ अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार नं.**१ शुभम सुनील भोसले व नं.२ सतीश सुनील भोसले,** यांना पेपर प्रसिध्दीद्वारे न ोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक ११.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०.०२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

अमरावती
दिनांक १०.०२.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## संक्षिप्त



### जि प प्राथ. कन्या शाळा येथे बाल आनंद मेळावा

**पूर्णानगर-** पंचायत समिती भातकुली अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा पूर्णा नगर येथे बाल आनंद मेळावा झाला. या मेळाव्याचे अध्यक्षपद शा. व्य. स. अध्यक्षा छाया दंडे तर प्रमुख अतिथी म्हणून पूर्णानगरच्या सरपंच ज्योत्स्ना गहरवाल, शा.व्य. स. उपाध्यक्ष" साधना राजस व सागर तायडे सदस्य ग्रामपंचायत हे होते. तर उद्घाटक म्हणून डॉ. विकास फटकाळे हे होते. बालआनंद मेळाव्यात मुलांनी छान छान पदार्थांचे स्टॉल लावले आणि त्या स्टॉलच्या माध्यमातून त्यांना खरेदी-विक्री नफा तोटा, बेरीज, वजाबाकी याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. डॉ.विलास फटकाळे यांनी महिला पालकांना आहाराबाबत जागृत केले आणि आपल्या मुलांना पौष्टिक आहार कसा दिला जावा याबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका शीला मसराम सहा, शिक्षिका माधुरी वाईन्देशकर,अण्णा अघम,अश्विनी बोबडे,माला देशमुख, माधुरी ठोंबरे यांनी अथक परिश्रम घेतले.



### राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबीर

**आसेगाव पूर्णा-** येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने दत्तक ग्राम कृष्णापूर येथे ३ ते १० फेब्रुवारी दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला.उद्घाटनप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. रवींद्र इचे यांनी रासेयोचे महत्त्व स्पष्ट केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. भारत कल्याणकर यांनी रासेयोच्या स्थापनेची माहिती देत व्यक्तिमत्त्व विकासात रासेयोची भूमिका अधोरेखित केली. प्रमुख अतिथी म्हणून सरपंच रूपाली रेखे उपस्थित होत्या.यानंतर झालेल्या बौद्धिक सत्रात डॉ. मुकेश सरदार यांनी संत साहित्य व संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीवर मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान योग प्रात्यक्षिक, प्रभात फेरी, स्वच्छता अभियान तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष काळे यांनी केले. शिबिरास रासेयो स्वयंसेवक, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बालिका दिनानिमित्य कायदेविषयक शिबीर

**खल्लार -** दर्यापूर तालुका विधि सेवा समिती व दर्यापूर वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दर्यापूर येथिल प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात नुकतेच कायदेविषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीराच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधिश सत्यवान डोके उपस्थित होते.शिबीराचे प्रास्ताविक ॲड. जगदीश विल्हेकर यांनी केले. त्यांनी सदर शिबीर घेण्याचा उद्देश सांगितला. तसेच शिक्षण घेवुन व अभ्यास करून मोठ्या पदावर जावे असे सांगितले. शिबीरामध्ये ॲड. उषा अग्रवाल यांनी आजच्या काळातील बालिकांसमोरील आव्हाने व शिक्षणाचा प्रसार या विषयावर मार्गदर्शन केले. ॲड. लिना गहेरवाल यांनी लैंगिक असमानता संपुष्टात आणने कसे गरजेचे आहे. या विषयावर मार्गदर्शन केले.ॲड.आम्रपाली चौरपगार यांनी समाजातील स्त्रियांचे स्थान व कायद्यातील तरतुदी या विषयावर मार्गदर्शन केले. शिबीरासाठी दर्यापूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. धर्मेंद्र आठवले, गटविकास अधिकारी सी. जे. ढवक, जेष्ठ विधिज्ञ अड. संतोष धर्माधिकारी, ॲड. दिलीप अग्रवाल, ॲड. संतोष कोल्हे, ॲड. जे. व्ही. नळकांडे, ॲड. एस. पी. गाडे व ॲड. आदित्य धर्माधिकारी हे उपस्थित होते. विद्यालयाचे अध्यापक निखिल बुंदेले यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. या कायदेविषयक शिबीरामध्ये विद्यालयाचे सर्व अध्यापक वृंद तसेच दोनशेहून अधिक विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. सदर शिबीराचे यशस्वीतेसाठी न्यायालयीन कर्मचारी विनोद गवई, अभिजीत धांडे व आकाश कौलकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



### प्राथमिक शिक्षक समितीचे निवेदन

**अमरावती-** संचमान्यता सन २०२५-२६ ही केवळ आधारकार्ड वैध विद्यार्थी संख्येवर आधारित केल्यामुळे अनेक शाळांमधील शिक्षक अतिरिक्त ठरत असून, विद्यार्थी संख्या असतानाही शिक्षकांच्या पदांवर गदा येत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष प्रवेशित व उपस्थित विद्यार्थी संख्या विचारात घ्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, जिल्हा अमरावतीच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत जिल्हा परिषद अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात अतिरिक्त शिक्षक ठरविताना व समायोजन करताना आधारकार्ड वैध संख्येऐवजी शाळेतील प्रत्यक्ष प्रवेशित व उपस्थित विद्यार्थी संख्या ग्राह्य धरावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.तसेच फेब्रुवारी २०२६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांच्या जागा समायोजनासाठी रिक्त दाखवाव्यात, तसेच जिल्हास्तरावर समायोजन करताना अतिरिक्त शिक्षकांना जिल्ह्यातील सर्व रिक्त जागा उपलब्ध करून द्याव्यात,अशीही मागणी करण्यात आली.या निवेदनाच्या वेळी जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार, तालुकाध्यक्ष तुळशीदास धांडे (दर्यापूर),उमेश चुनकीकर (भातकुली),तालुका सरचिटणीस संतोष राऊत व जिल्हा सरचिटणीस शैलेंद्र स. दहातोंडे उपस्थित होते. शिक्षकांना योग्य न्याय देण्यात यावा, अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे.

# अचलपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करा

## आ.प्रविण तायडे यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाची निर्मिती करण्यात यावी या मागणीचे निवेदन अचलपूर मतदार संघाचे आ. प्रवीण वसंत तायडे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिले.

या निवेदनात नमूद करण्यात आले की, अचलपूर मतदारसंघाला लागून मेळघाट हा दुर्गम व भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण भाग येतो. तसेच दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, धारणी, चांदूर बाजार आदी तालुक्यांतील नागरिकांची विविध शासकीय कामांसाठी मोठ्या प्रमाणावर अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयात ये-जा सुरू असते. अचलपूर शहर व परिसरातील लोकसंख्या सुमारे २ ते ३ लाखांच्या दरम्यान असून महसूल व इतर प्रशासकीय कामकाजाचा ताण लक्षणीय प्रमाणात वाढत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.सध्या संबंधित नागरिकांना अमरावती येथे कामानिमित्त जावे लागत असून सुमारे १०० ते १३० किलोमीटर अंतराचा प्रवास करावा लागतो. दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांसाठी हा प्रवास वेळखाऊ व खर्चिक ठरत असून एका शासकीय कामासाठी दोन ते तीन दिवस लागतात. यामुळे सामान्य नागरिकांवर आर्थिक व मानसिक ताण निर्माण होत असल्याचेही या निवेदनता नमूद करण्यात आले आहे.तसेच अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयावरील कामाचा ताण कमी होऊन प्रशासकीय कार्यक्षमता वाढेल, निर्णयप्रक्रिया जलद होईल आणि नागरिकांना दिलासा मिळेल, असे आमदार प्रवीण तायडे यांनी निवेदनात उल्लेख केला आहे.या पार्श्वभूमीवर शासनाने सदर मागणीचा सकारात्मक व तातडीने विचार करून अचलपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी द्यावी अशी मागणी आ. प्रवीण तायडे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कडे केली आहे.



## मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची नॅशनल ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**



जिल्हा क्रीडा संकुल अकोला येथील मैदानावर सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था, ता. चांदूरबाजार अंतर्गत कार्यरत असलेल्या निवासी मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांची नॅशनल ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाल्याने संस्थेच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याचा गौरव झाला आहे.

सदर विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय/विभागीय स्तरावरील ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवली.या विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे प्रणेते राज्यमंत्री बच्चू कडू यांनी सर्व विजयी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केल, त्याचप्रमाणे संस्थेचे अध्यक्ष डॉ.नयना कडू, संस्था सचिव राहुल म्हाला, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी चंद्रशेखरजी मोहोड यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केल.तसेच संचालक मंडळ, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, विशेष शिक्षक, शिक्षिका,तसेच सर्व कर्मचारी वर्गाने मोलाचे मार्गदर्शन, सहकार्य व परिश्रम केले. विशेषतः मूकबधिर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असून क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली जाते.त्यांच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला आहे.

## जळका येथे गजानन महाराज प्रगटदिन उत्साहात

**चांदूर रेल्वे –** श्री संत गजानन महाराज यांच्या प्रगटदिनानिमित्त चांदूर रेल्वे तालुक्यातील जळका (जगताप) येथे भोपे परिवाराच्या वतीने गायक सागर ठाकरे यांच्या भक्तिगीतांचा कार्यक्रम भक्तिभावपूर्ण वातावरणात उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात ‘गण गण गणात बोते’, ‘पुण्य घ्या पुण्य घ्या पदरात’ यांसह विविध भक्तिगीतांनी करण्यात आली. मुख्य गायक सागर ठाकरे यांच्यासह सहगायक सचिन घारफळकर, सतीश राऊत, प्रफुल्ल महाले व प्रज्वल गुल्हाने यांनी अभंग, आरती व नामस्मरण सादर करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात चिंब केले.

वाद्यसंगतीत बासरीवादक प्रमोद भेंडे, तबलावादक मंगेश वानखडे तसेच ऑक्टोपॅडवर सुनील वानखडे यांनी सुरेल साथ दिली.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सुरज भोपे यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या भक्तिगीतांच्या कार्यक्रमास भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित भाविकांनी भोपे परिवाराचे मनःपूर्वक कौतुक केले.

## ‘मेनी व्हॉईसेस, वन सायन्स’ विषयावर ग्लोबल विमेन्स ब्रोकफास्ट कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभाग व मुलींचे वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने व इंडियन वुमन सायंटिस्टस् असोसिएशन, अमरावती शाखेच्या सहकार्याने आणि असोसिएशन ऑफ केमिस्ट्री टीचर्स, मुंबई यांच्या प्रोत्साहनातून आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र संघटना प्रेरित ‘मेनी व्हॉईसेस, वन सायन्स’ या विषयावर ग्लोबल विमेन्स ब्रोकफास्ट - २०२६ कार्यक्रम मोठया उत्साहात झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, प्रमुख वक्ते म्हणून हैदराबाद येथील आयआयसीटीच्या प्रिन्सिपल सायंटिस्ट डॉ. वसुंधरा मुत्ता, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्कुल ऑफ केमिकल सायन्सेसच्या संचालक डॉ. संगिता माकोने, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे व माजी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार यांची उपस्थिती होती.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्कुल ऑफ केमिकल सायन्सेसच्या संचालक डॉ. संगिता माकोने यांनी विषयाची मांडणी करतांना आजच्या काळात मुलींनी विज्ञान क्षेत्रात पुढे येणे आवश्यक असल्याचे सांगितले. हैदराबाद येथील आयआयसीटीच्या प्रिन्सिपल सायंटिस्ट डॉ. वसुंधरा मुत्ता यांनी ‘फंक्शनल नॅनोमटेरियल्स फॉर अ सस्टेनेबल फ्युचर’ या विषयावर व्याख्यान देतांना कार्यक्षम नॅनोमटेरियल्सच्या माध्यमातून शाश्वत विकास व जागतिक समस्यांवरील उपायांची सविस्तर माहिती दिली. माजी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग आवश्यक आहे. महिलांनी प्रगती केली तर राष्ट्राची प्रगती होते, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. डॉ. प्रशांत गावंडे यांनीही याप्रसंगी आपले विचार मांडले. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, अशा कार्यक्रमांमुळे सहकार्याची भावना वाढीस लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना उच्च शिक्षणासाठी यातून प्रेरणा मिळत असल्याचे सांगून उपक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.प्रास्ताविक डॉ. जागृती बारब्दे, स्वागतपर भाषण राष्ट्रीय समन्वयक डॉ. विजेंद्र सिंह, पाहुण्यांचा परिचय शुभम क-हाडे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन प्रांजली चव्हाण, तर आभार श्रावणी ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संबंधित प्रतिनिधी, वसतिगृहातील विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

## वेब डेव्हलपर कार्यालयाचे उद्घाटन

**अमरावती-** शहरातील प्लॉट नं ३३,चांदनी नगर ०२ अत्याधुनिक सुविधांनी सज्ज अशा नवीन वेब डेव्हलपमेंट कार्यालयाचे फॅब्रिकेशन सरदार पाटील नगर रोड, अकोली येथे चि. अनिरुद्ध सतके यानी मायर्स सरनाइक्स कार्यालयाची सुरवात केली आहे. आईने आजवर केलेले कष्ट पाहता सतके यांनी कार्यालयाचे उद्घाटन आई गौरी सतके यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत अरेबियन रीबिन कापून केले.हे कार्यालय एआय (AI) तंत्रज्ञान, वेबसाइट डिझाइन आणि डिजिटल मार्केटिंग सेवा पुरवणार असून, स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणार आहे. डिजिटल क्रांतीमध्ये योगदान देण्याचा संकल्प यावेळी चि.अनिरुद्ध सतके यांनी व्यक्त केला तसेच मला मिळालेले यश पूर्णतः माझ्या आईचे यश असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले.स्थानिक व्यवसाय आणि स्टार्टअप्सना आधुनिक वेब सोल्युशन्स, ई-कॉमर्स आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेवा प्रदान करणे,कार्यालयात हाय-स्पीड इंटरनेट, प्रगत संगणक प्रणाली आणि आयटी तज्ज्ञांची टीम उपलब्ध आहे.कार्यालयाचे वैशिष्ट्य म्हणजे वेबसाइट्स, मोबाइल ॲप्स, आणि डिजिटल मार्केटिंगच्या क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरण्यावर भर देण्यात येणार आहे.

# समर्थाचा वैचारिक वारसा जपणारी संस्था म्हणजे समर्थ विद्यालय

## दासनवमीच्या कार्यक्रमात मान्यवरांचे प्रतिपादन

**अमरावती/का.प्र.**

श्री समर्थ रामदास स्वामी यांचा वैचारिक वारसा जपणारी संस्था म्हणून नावलौकिक असलेल्या श्री समर्थ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात परम रामभक्त,सज्जनगड निवासी व वैराग्य मूर्ती समर्थ रामदास स्वामी यांची पुण्यतिथी अर्थात ‘दासनवमी’ अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

श्री समर्थ शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. मोहन पुरोहित,ज्येष्ठ सदस्य प्रा.डॉ.प्र.ना.वडोदकर ,संस्था कार्यकारिणी सदस्य रमेशपंत डांगे, सदस्य संदीप गोडबोले, सदस्य सचिन मुळे,माजी मुख्याध्यापक मच्छिंद्रनाथ मुळे, शालेय व्यवस्थापन व विकास समिती अध्यक्ष परशराम राठोड,शाळेचे मुख्याध्यापक धनंजय पाठक, उपमुख्याध्यापक सचिन देवळे तसेच शालेय विद्यार्थी पियुष सत्यजित राठोड व मैत्री नितिन लांडोरे यांनी श्री समर्थांचा श्रीमत् दासबोध हा ग्रंथ मंचावर आणून विराजित केला. मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री समर्थ रामदास स्वामी व श्रीमत् दासबोध ग्रंथ यांचे पूजन तसेच हारार्पण करण्यात आले. दासनवमी



निमित्य श्री समर्थ विद्यालयात विद्यार्थ्यांची श्रीमत् दासबोधातील समास दुसरा,दशक दुसरे; मनुष्याची ‘उत्तम लक्षणे’ यावर आधारित लेखी परीक्षा घेण्यात आली.या परीक्षेत क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना रोख बक्षीसं व प्रमाणपत्रं देऊन गौरव करण्यात आला. वर्ग ५ ते ७ मधून पियुष सत्यजित राठोड (प्रथम क्रमांक), चि.पार्थ अरुण भगत(द्वितीय क्रमांक),ज्ञानदा अनंत बाराहाते(तृतीय क्रमांक) तसेच वर्ग ८ ते १० मधून अनुश्री योगेश सोनवणे (प्रथम क्रमांक), चि. प्रथमेश अमित तुपकरी (द्वितीय क्रमांक), चि.आनंद सुधाकर चौधरी (तृतीय क्रमांक) क्रमांक प्राप्त केले.

गायनक्षेत्रात दिग्गज मानले जाणारे शाळेचे पर्यवेक्षक मधुसूदन वटक यांनी गायिलेले ‘नादातूनी या नाद निर्मिता’ हे गीत, त्यांना उपस्थित विद्यार्थ्यांनी दिलेली ‘श्रीराम जयराम जय जय राम’ तसेच ‘जय जय रघुवीर समर्थ’ च्या जयघोषाची साथ यासह ‘कल्याणकारी रामराया’ या प्रार्थनेने’ वातावरणाला मांगल्याच्या वेगळ्या उंचीवर पोहोचवले. दासनवमी कार्यक्रमाला शाळेचे माजी उपमुख्याध्यापक दिलीप फाले उपस्थित होते.कार्यक्रमाचे उद्घोषक असलेले सहा. शिक्षक पुरुषोत्तम जिचकार आणि राजेश पवार यांच्या यथोचित व ओघवत्या संचालनामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली संस्था व शाळेचे पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन व विकास समितीचे पदाधिकारी तसेच शाळेचे विद्यार्थी - विद्यार्थिनींची बहुसंख्य उपस्थिती, शाळेच्या पदाधिकाऱ्यांसह सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे सांघिक परिश्रम तथा उत्साही सहभाग यामुळे कार्यक्रम सुसंगत व यशस्वी झाला.

## राज्यस्तरीय घरगुती शिवजयंती सजावट स्पर्धा १९ फेब्रुवारीला प्रारंभ

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

आम्ही सारे शिवप्रेमी, क्षात्रवीर संभाजी महाराज क्रीडा व युवक प्रतिष्ठान आयोजित व जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड तसेच युवराज संभाजी राजे मित्र मंडळ संयोजित राज्यस्तरीय घरगुती शिवजयंती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण राज्यात प्रसिद्ध असलेल्या या अभिनव उपक्रमाचे हे अकरावे वर्ष असून ‘वर्ल्ड ग्रेटेस्ट रेकॉर्ड’मध्येही या स्पर्धेची नोंद करण्यात आली आहे. दि. १९, २० व २१ फेब्रुवारी रोजी स्पर्धा पार पडणार आहे. राज्यस्तरीय प्रथम क्रमांकासाठी २१ हजार रुपयांचे बक्षीस जिजाऊ बँक व आयोजन समितीच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये (हॉटेल व-हाडी बैठक, परतवाडा), तृतीय क्रमांकासाठी ५ हजार रुपये (हॉटेल स्वामी, चांदूरबाजार) तर चतुर्थ क्रमांकासाठी २,५०० रुपये (जिजाऊ फोटो आर्ट्स, चांदूर बाजार) देण्यात येतील. तसेच कै. इंजि. सचिनदादा चौधरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ११ हजार रुपयांची विशेष प्रोत्साहनपर बक्षिसेही जाहीर करण्यात आली आहेत.या वर्षी स्पर्धेचा विषय ‘स्वराज्य संकल्पिका राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या जीवनातील एक प्रसंग किंवा पावनखिंड’ असा आहे. सजावटीचे तीन फोटो कुटुंबीय व मित्रांसह काढून आपले संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांकासह संयोजकांच्या व्हॉट्सॲपवर पाठवावेत. उत्कृष्ट सजावटींचे परीक्षण करण्यासाठी परीक्षक घरी भेट देणार आहेत.स्पर्धा दोन गटांत होणार असून अ गट (वय ५ ते १६) व ब गट (वय १७ ते ३०) असा विभाग आहे. विषयाची मांडणी, कौटुंबिक सहभाग, वेशभूषा, सामाजिक संदेश, प्रसार-प्रचार व मागील वर्षातील सहभाग या निकषांवर गुणांकन होईल.या स्पर्धेची संकल्पना व मुख्य संयोजक डॉ. तुषार देशमुख (मो. ९७३००१५८९९) असून सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. समितीच्या सीमा बोके, प्रा. विजय देशमुख, प्रा. मनार्ली तायडे, डॉ. हर्षा ढोक, डॉ. अंजली जवंजाळ, निखिल काटोलकर, रिद्धेश ठाकरे, अजय इंगळे, ज्ञानेश तुरखडे, अक्षय पांडे, मृत्युंजय आवारे, श्रेयस बर्वे आदींच्या सहकार्याने स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती प्रसिद्धीप्रमुख संतोष शेंडे यांनी दिली.

## टाकरखेडा शंभू येथे हळदी-कुंकू निमित्त महिलांना ‘महाविस्तार ॲप’ची माहिती

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**



ग्रामपंचायत कार्यालय टाकरखेडा शंभू यांच्या वतीने महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सरपंच रश्मीताई देशमुख व ग्रामपंचायत सदस्यांच्या पुढाकारातून पार पडलेल्या या कार्यक्रमात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. याच निमित्ताने कृषी विभागाच्या ‘महाविस्तार ॲप’ची प्रचार-प्रसिद्धी करण्यात आली.

तालुका कृषी अधिकारी, भातकुली यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी रूपाली ठाकरे यांनी उपस्थित महिलांना ‘महाविस्तार ॲप’ विषयी सविस्तर माहिती दिली. शेतीविषयक अद्ययावत माहिती, पिक व्यवस्थापन, हवामान अंदाज, बाजारभाव आदी बाबी या ॲपच्या माध्यमातून सहज उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य सोनालीताई जामठे यांनी केले, तर प्रास्ताविक प्रीती पाटील यांनी मांडले.

मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या कृषी अधिकारी वैशाली वानखेडे यांनी हरभरा पिकाविषयी सविस्तर माहिती देत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रूपाली ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाला अध्यक्षा म्हणून इंदुताई देशमुख उपस्थित होत्या.

यावेळी सरपंच रश्मी देशमुख, सदस्य प्रीर्ती पाटील, सोनार्ली जामठे, सुप्रिया बांबोडे, शिल्पा लांडगे, बचत गटाच्या सीआरपी, अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच गावातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# वडाळी व काँग्रेस नगरात अवैध सावकारांवर धाड

## सहायक निबंधक कार्यालयाच्या पथकाने जप्त केले कागदपत्र



**अमरावती/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील सहाय्यक निबंध सहकारी संस्था कार्यालयाला प्राप्त तक्रारीच्या आधारावर जिल्हा उपनिबंधक शंकर कुमार यांच्या निर्देशाने शहरातील वडळी व काँग्रेस नगर येथील अवैध सावकारांच्या घरी धाड मारून १९ संशयित कागदपत्र जप्त करण्यात आले. माहितीनुसार सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या पथकाने वडाळी येथील गगलानी नगर मध्ये शक्ती सिंग वीरेंद्र दीक्षित आणि काँग्रेस नगर मध्ये सुमंत अरविंद पाटील यांच्या घरी बुधवारी दुपारी कारवाई केली. ३ तासापर्यंत ही कारवाई चालली. दर्यापूर येथील सहाय्यक निबंध किशोर बलिंगे यांच्या नेतृत्वात चंद्रशेखर मुले, सुस्मिता सुपले, अमोल लोमटेच्या पथकाने फ्रेजरपुरा पोलिसांच्या मदतीने शक्तीसिंह दीक्षित यांच्या घरी बुधवारी सकाळी ११.५५ वाजता छापा मारला. घराच्या तपासणी दरम्यान तिथून ५ कागदपत्र जप्त करण्यात आले. या व्यतिरिक्त दोन ☞(पान २ वर)

# जुन्या वैमनस्यातून तरुणावर चाकुने हल्ला

### मसानगंज येथील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-**

महानगरपालिका निवडणुकीदरम्यान झालेल्या जुन्या वैमनस्यातून एका तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना बुधवारीं मध्यरात्री नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत मसानगंज परिसरात समोर आली आहे. या हल्ल्यात अजय परमानंद अहरवार (मसानगंज) हा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. अजय अहरवारच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी निर्मळ अहरवार,आदर्श अहरवार, जयंत अहरवार (सर्वे रा. मसानगंज ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार अजय अहरवार मंगळवारी रात्री १२.३० वाजता सुमारास जुनी हिंदी शाळा क्रमांक २ जवळ असलेल्या एका गाडीवर अंडा राईस खात उभा होता. त्यावेळी तिथे आलेल्या आरोपी आदर्श अहरवार ,जयंत अहरवार आणि त्यांचे वडील निर्मळ अहरवार यांनी अजयशी मनपा निवडणुकीतील जुने राजकारणवरून वाद केला आणि त्याला थापड मारली. आरोपी एवढ्यावरच नाही थांबले तर त्यांनी अजयवर चाकूने सपासप वार केले. यामध्ये तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले ,जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहे. घटनेची ☞(पान २ वर)

# लग्न पत्रिका वाटण्यासाठी गेलेल्या वडिलांचा अपघातात मृत्यू

### ब्राह्मणवाडात मेसरकर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर





चांदूरबाजार/प्रतिनिधीः-

मुलीच्या लग्नाची पत्रिका वाटण्यासाठी ब्राह्मणवाडा थडी वरून अकोट येथे आलेल्या वडिलांचा टिप्परच्या धडकेत अपघाती मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली. या अपघातात अन्य एक जखमी असून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. मधुकरराव मेसरकर (वय ५८, ब्राह्मणवाडा थडी, चांदूरबाजार) अपघातात मृत वडिलांचे नाव आहे तर निहाल मेश्राम (२१, ब्राह्मणवाडा थडी ) असे जखमीचे नावे आहे.

माहितीनुसार ब्राह्मणवाडा थडी येथील मधुकरराव मेसरकर यांच्या मुलीचे लग्न ठरले होते. मुलीच्या लग्नाची पत्रिका वाटण्यासाठी ते परिचित निहाल मेश्राम सोबत दुचाकी (एम एच २७ सीएम ०३७१) ने मंगळवारी सकाळी अकोटसाठी निघाले होते. येथे काही नातेवाईकांना पत्रिका दिल्यानंतर उर्वरित पत्रिका☞(पान २ वर)

# जिल्ह्याच्या विकासासाठी ३०० कोटींची अतिरिक्त मागणी



### -मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद
### -राज्य नियोजन समितीची बैठक

**अमरावती/प्रतिनिधीः-**राज्य नियोजन समितीच्या बैठकीला जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथून जिल्हाधिकारी आशिष येरेकर दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तीनशे कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

आमदार सुलभा खोडके यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, उपवनसंरक्षक अजुर्ना के. आर, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे तसेच संबंधित विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी यावेळी जिल्ह्यातील विविध विभागांची माहिती, त्यांची चालू कामे, सद्यास्थिती तसेच भविष्यकालीन नियोजनाबाबत अभ्यासपूर्ण☞(पान २ वर)

# महसूल विभागाची अवैध गौण खनिजावर कारवाई

### -निंभोरा येथे रेतीचा ट्रॅक्टर जप्त



**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** स्थानिक महसूल विभागाने अवैध गौण खनिज उत्खनन व अवैध वाहतुक विरोधात, आपली धडक कारवाई तीव्र केली आहे. दिनांक १० फेब्रुवारीच्या रात्री मौजा निंभोरा येथे, अवैध रेतीची वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर महसूल पथकाने रंगेहात पकडला.

सदर कारवाई उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव अचलपूर तथा तहसीलदार मनोज सोनारकर चांदूर बाजार , यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पथकाने सापळा☞(पान २ वर)

# २२ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा

## अमरावती केंद्रातून 'दप्तर' प्रथम



**मुंबई/प्रतिनिधीः-** २२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत अमरावती केंद्रातून विश्वास प्रतिष्ठान, अकोला या संस्थेच्या दप्तर या नाटकाला प्रथम पारितोषिक तसेच जे. आर.डी. टाटा स्कूल ॲण्ड एडूलॅब, खडकी, अकोला या संस्थेच्या वाढदिवस या नाटकास द्वितीय पारितोषिक, अ.ब.क नाट्य मल्टीपर्पज फाऊंडेशन, अमरावती या संस्थेच्या आदिबांच्या बेटावर या नाटकास तृतीय पारितोषिक, भारवी कला अकादमी, अचलपुर या संस्थेच्या अबोलांचे बोल या नाटकास चतुर्थ पारितोषिक तसेच कलाविष्कार बहुउद्देशिय संस्था, अमरावती या संस्थेच्या बुध्दाची गोष्ट या नाटकास पाचवे पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या पाचही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे☞(पान २







